# मुद्रित प्रसारमाध्यमांत प्रसिद्ध झालेल्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास
# विशेष संदर्भ : किशोर आणि छावा मासिक
# (कालावधी–२००८ ते २०१८)

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## आधुनिकशास्त्रे आणि व्यावसायिक कौशल्ये या विद्याशाखेंतर्गत पत्रकारिता आणि जनसंवाद विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

**संशोधक**
**अशोक मारुती बांगर**
पीआरएन : ०३३१३००७५९३

**मार्गदर्शक**
**डॉ.नामदेव पी.सानप**
प्राचार्य,वसंतराव काळे पत्रकारिता व संगणकशास्त्र महाविद्यालय,बीड
**पत्रकारिता व जनसंज्ञापन विभाग**
**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.**

## सप्टेंबर २०२०

## मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, अशोक मारुती बांगर यांनी वृत्तपत्र विद्या विषयातील पीएच.डी. पदवीसाठी ''मुद्रित प्रसारमाध्यमांत प्रसिद्ध झालेल्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास. विशेष संदर्भ : किशोर आणि छावा मासिक (कालावधी २००८ ते २०१८)'' या विषयावरील संशोधन कार्य माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

सदर संशोधनातील काम त्यांचे स्वतःचे असून संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या संदर्भ स्त्रोतांचा योग्य रितीने प्रबंधात निर्देश करण्यात आला आहे.

**मार्गदर्शक**

**प्राचार्य डॉ.नामदेव पी. सानप**

स्थळ : बीड

दिनांक :

## प्रतिज्ञापत्र

मी अशोक मारुती बांगर प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, ''मुद्रित प्रसारमाध्यमांत प्रसिद्ध झालेल्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास. विशेष संदर्भ : किशोर आणि छावा मासिक (कालावधी २००८ ते २०१८)'' हा शोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये वृत्तपत्र विद्या शाखेच्या विद्यावाचस्पती पदवीसाठीसादर करीत असून संशोधन कार्य मी स्वतः केले आहे. प्रस्तुत संशोधन हे इतर कोणत्याही पदवीसाठी यापूर्वी सादर केले नाही याची मी खात्री देतो. संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या संदर्भ स्त्रोतांचा निर्देश प्रस्तुत संशोधनामध्ये केला आहे.

**संशोधक**

**अशोक मारुती बांगर**

स्थळ : बीड

दिनांक :

# ऋणनिर्देश

मुद्रित प्रसारमाध्यमांत प्रसिद्ध झालेल्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास. विशेष संदर्भ : किशोर व छावा मासिक(कालावधी–२००८ ते २०१८) या संशोधन विषयाचे संशोधन करण्याची संधी टिळक महाराष्ट्र विद्यापिठ पुणे यांनी उपलब्ध करून दिली. त्याबद्दल मी टिळक महाराष्ट्र विद्यापिठ पत्रकारिता विभागाच्या प्रमुख डॉ. गिताली टिळक–मोने ,पी.एच. डी. विभागाच्य प्रमुख डॉ. यादव मॅडम यांचा आभारी आहे.

संशोधनासाठी मार्गदर्शक प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांचे अनमोल मार्गदर्शन प्रस्तुत संशोधनासाठी लाभले. वेळोवेळी संशोधनात येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी मार्गदर्शकांनी मदत केली. नाशिक विभागातील सर्व शासकीय कार्यालयीन अधिकारी, किशोर मासिकाचे कार्यकारी संपादक किरण केंद्रे यांचे खूप सहकार्य लाभले. वाडिया वाचनालय, केसरी मराठा ग्रंथालय व वसंतराव काळे पत्रकारिता महाविद्यालयचे ग्रंथालयीन कर्मचारी यांनी वेळोवेळी मदत केली. त्याबद्दल त्यांचा ऋणी आहे. मुद्रित लेखनासाठी मदत करणाऱ्या सौ. नंदिनी नागरगोजे, आनंद डोंगरे यांचा आभारी आहे. यासह अनेकांनी मला प्रस्तुत संशोधनासाठी मदत केली त्या सर्वांचा ऋणी आहे

**संशोधक**

**अशोक मारुती बांगर**

स्थळ : बीड

दिनांक :

# सारांश

# १. संशोधन विषयाची ओळख

'संशोधन विषयाची ओळख' हे प्रस्तुत संशोधन विषयातील पहिले प्रकरण असून यामध्ये संशोधन विषय, संशोधनातील महत्त्वाच्या सज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या, संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधन उद्दिष्टे, प्रसार माध्यमे, पुर्वकालीन भारतीय प्रसारमाध्यमे, नाशिक विभाग : एक दृष्टीक्षेप, मासिक छावा, मासिक किशोर इत्यादी उपप्रकरणे आहेत.

लोकशाही शासन प्रणालीमध्ये प्रसारमाध्यमांना लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून ओळखले जाते. मुद्रित प्रसारमाध्यम, श्राव्य प्रसार माध्यम, दृकश्राव्य प्रसार माध्यम नव इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यम, सामाजिक प्रसारमाध्यम (सोशल मीडिया) इत्यादी प्रसार माध्यमाचे प्रकार आहेत. मुद्रित प्रसारमाध्यमामध्ये ग्रंथ, नियतकालिक, दैनिक यांचा समावेश होतो. मुलांचे मुद्रित प्रसार माध्यमामध्ये मुलांचे मासिक, साप्ताहिक, मुलांसाठी प्रसिद्ध झालेल्या दैनिकांच्या पुरवण्या इत्यादीचा समावेश होत असतो. आजची मुले हे उद्याचे देशाचे नागरिक असतात. आधारस्तंभ असतात हे लक्षात घेऊन ''मुद्रित प्रसारमाध्यमात प्रसिद्ध झालेल्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास. विशेष संदर्भ : किशोर आणि छावा मासिक (कालावधी २००८ ते २०१८)'' संशोधन विषयाची ओळख करुन देण्यात आली. मुद्रित प्रसार माध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या साहित्यामध्ये कथा, चित्रकथा, कोडे, लेख, कविता इत्यादी प्रकारच्या साहित्याचा समावेश होतो. ६ ते १४ वयोगटातील आणि इ.१ ली ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना प्रस्तुत संशोधनात मुले म्हणून संबोधले आहे.

विविध प्रसारमाध्यमे मुलांचे कार्यक्रम प्रसिद्ध करीत असतात. या कार्यक्रमाकडे मुले आकर्षित होतात. मुद्रित प्रसारमाध्यमेही मुलांसाठी विविध प्रकारचे साहित्य प्रकाशित करतात. मुलांची जीवनाची कक्षा रुंदावत जाते. मुले विविध बाबीमधून, घटनांमधून ज्ञान अनुभव आत्मसात करतात. मुद्रित प्रसार माध्यमातील विविध प्रकारच्या साहित्यामधून मुले ज्ञान, माहिती मिळवत असतात. मुलांचा वयोगट, मुलांची शब्दसंपत्ती, भाषा प्रभुत्व, विषयाची समज इत्यादी घटक विचारात घेवून मुलांचे साहित्य मुद्रित प्रसार माध्यमात प्रसिद्ध होणे गरजेचे आहे. म्हणून मुलांच्या मुद्रित प्रसारमाध्यमातील साहित्य निवडतांना कोणते निकष लावले जातात, याचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केलेला आहे. मुलांच्या साहित्य निवडीमागचे निकष माहिती होण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे. मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या

साहित्याचा परिणाम मुलांवर होत असतो. ज्या प्रकारचे साहित्य मुले वाचतात त्या प्रकारचा संस्कार मुलांवर होत असतो. मुलांवर योग्य संस्कार व्हावेत म्हणून योग्य साहित्याला मुलांच्या मुद्रित प्रसारमाध्यमातून प्रसिद्धी मिळणे गरजेचे आहे.

मुलांचे सर्वाधिक वाचले जाणारे साहित्य आणि सर्वाधिक आवडते साहित्य वेगवेगळे असू शकते. कारण सर्वाधिक आवडणारे साहित्य सर्वच मुद्रित प्रसारमाध्यमात असेलच असे नाही. प्रस्तुत संशोधनातून  किशोर व छावा मधील मुलांच्या सर्वाधिक आवडत्या साहित्याचा शोध घेण्यात आला आहे. त्याप्रमाणे मुलांच्या शालेय अभ्यासक्रमातील विविध विषयांना किशोर व छावा मुद्रित प्रसारमाध्यमात स्थान मिळते का? सर्वाधिक स्थान कोणत्या विषयास मिळते याचा शोध प्रस्तुत संशोधनातून घेण्यात आलेला आहे.

बालमानसशास्त्रानुसार ६ ते १४ वयोगट मुलांच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा असतो. या वयोगटामधील मुलांवर योग्य संस्कार होणे गरजेचे आहे. आजची मुले भविष्यात आदर्श नागरिक व्हावेत म्हणून मानवी व सामाजिक मुल्ये रुजवणे गरजेचे आहे. किशोर व छावा मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य मूल्याधिष्ठीत असते का, याचा शोध प्रस्तुत संशोधनातून घेतला आहे. मुलांच्या भाषिक कौशल्य विकसनात किशोर व छावा मुद्रित प्रसारमाध्यमातील साहित्याचा उपयोग होतो का? कोणते भाषिक कौशल्य (क्षमता) विकसित होण्यासाठी मुद्रित प्रसारमाध्यमातील मुलांच्या साहित्याची सर्वाधिक मदत होते? याचा शोध प्रस्तुत संशोधनातून घेण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधनात एकूण पाच प्रकरणे आहेत. पहिल्या प्रकरणामध्ये संशोधन विषय, संशोधनातील महत्त्वाच्या सज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या, संशोधन विषयाचे महत्त्व. संशोधनाची उद्दिष्टे स्पष्ट करण्यात आलेले आहेत. प्रसारमाध्यमाचे विविध प्रकार, मासिक छावा व मासिक किशोर यांच्यावर विशेष दृष्टीक्षेप टाकण्यात आला आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये ''मुद्रित प्रसारमाध्यमात प्रसिद्ध झालेल्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास. विशेष संदर्भ : किशोर आणि छावा मासिक (कालावधी २००८ ते २०१८)'' प्रस्तुत संशोधनाचे उद्दिष्ट स्पष्ट करण्यात आलेली आहेत. प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. किशोर व छावा या मुद्रित माध्यमातील मुलांसाठी साहित्य निवडतांना कोणते निकष लावले जातात याचा शोध घेणे.

२. किशोर व छावा या मुद्रित माध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या साहित्याचा साहित्य प्रकारानुसार अभ्यास करणे आणि सर्वाधिक स्थान मिळालेल्या साहित्य प्रकाराचा शोधे घेणे.

३. शालेय अभ्यासक्रमातील कोणकोणत्या विषयास किशोर व छावा ही मुद्रित प्रसारमाध्यमे स्थान देतात याचा अभ्यास करुन सर्वाधिक स्थान मिळणाऱ्या विषयाचा शोध घेणे.

४. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमातील साहित्यामुळे भाषिक कौशल्ये (क्षमता) (श्रवण, भाषण, वाचन, लेखन इ.) विकसित होतात का? याचा अभ्यास करुन, कोणती क्षमता मुद्रित प्रसारमाध्यमातील साहित्यामुळे सर्वाधिक विकसित होते याचा शोध घेणे.

५. किशोर व छावा या मुद्रित माध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य मुले का वाचतात याचा अभ्यास करुन मुलांच्या आवडीच्या साहित्याचा शोध घेणे.

६. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमातील साहित्य मूल्यांवर आधारित असते का? याचा शोध घेणे.

याबरोबरच पुर्वकालीन भारतीय प्रसारमाध्यमाचा सखोल अभ्यास पहिल्या प्रकरणात केला आहे. यामध्ये पूर्वीची प्रसार माध्यमे, पारंपारिक प्रसारमाध्यमे, तमाशा, लावणी, कीर्तन, ऐतिहासिक पत्रे यांचा आढावा घेण्यात आला. काळानुरुप वेगवेगळे शोध माणसाने लावले. या शोधानुसार प्रसारमाध्यमाचे स्वरुप बदलत गेल्याचे आढळून येते.

प्रस्तुत संशोधन विषयाचे कार्यक्षेत्र नाशिक विभाग आहे. संशोधनाचे कार्यक्षेत्र नाशिक विभाग असल्यामुळे नाशिक विभागाचा अभ्यास करणे गरजेचे होते. संशोधन करीत असतांना अभ्यास क्षेत्राची संपूर्ण व सखोल माहिती संशोधकास असणे खूप गरजेचे आहे. म्हणून नाशिक प्रशासकीय विभागाचा संपूर्ण अभ्यास करुनच संशोधन कार्य पुढे नेण्यात आले. नाशिक विभागाच्या इतिहासाचा अभ्यास सातवाहन काळापासून नाशिक प्रशासकीय विभागाच्या निर्मितीपर्यंत करण्यात आला. नाशिक विभागाच्या प्राकृतिक रचनेचा सखोल अभ्यास

केल्यानंतर नाशिक विभागाच्या प्राकृतिक रचनेमध्ये विविधता आढळून आली. महाराष्ट्र पठार, सह्याद्री पर्वतरांग, सातपुडा पर्वत, तोरणमाळ पठार इत्यादी प्राकृतिक रचनेमध्ये नाशिक विभाग सामावलेला आहे.

नाशिक विभागातील नद्यांमध्ये ही विविधता आढळून येते. पूर्व व पश्चिम वाहिनी नद्या नाशिक विभागात आहेत. प्राकृतिक रचनेच्या विविधतेमुळे नाशिक विभागातील हवामान, पर्जन्यमानातही विविधता व अनियीमीतता आढळते. नाशिक विभागात शेतीवर आधारित उद्योगधंदे व व्यवसाय आढळतात. साखर कारखाने, शेती व्यवसाय, नाशिक विभागातील वाहतुक, महत्त्वाची ठिकाणे, शिक्षण व्यवस्था, लोकजीवन यांचा आढावा प्रस्तुत संशोधनात घेण्यात आला.

प्रस्तुत संशोधन विषयाचे अभ्यासक्षेत्र नाशिक प्रशासकीय विभाग असल्यामुळे नाशिक विभागातील मुद्रित प्रसारमाध्यमांचा इतिहास याचा अभ्यास करणे गरजेचे होते. नाशिक विभागातील मुद्रित प्रसारमाध्यमांचा इतिहासाच्या अभ्यासावरुन नाशिक विभाग मुद्रित प्रसार माध्यमांची मुहूर्तमेढ इ.स.१८५७ च्या उठावापूर्वी रोवल्याची स्पष्ट होते. नाशिक विभागात मुद्रित प्रसार माध्यमाची सुरुवात धार्मिक हेतू डोळ्यासमोर ठेवून झाली. अहमदनगर येथे नाशिक विभागातील पहिले मुद्रित प्रसारमाध्यम ज्ञानोदय च्या रुपाने सुरु झाले. त्यानंतर न्यायसिंधू, खानदेशातील खानदेश वैभव, नाशिक येथील नाशिक वृत्त इत्यादी मुद्रित प्रसार माध्यमाचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात आला आहे.

**२. संशोधन विषयाशी संबंधीत साहित्याचा आढावा**

संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा हे प्रस्तुत संशोधनातील दुसरे प्रकरण आहे.

समाजशास्त्रीय संशोधनामध्ये पूर्व संशोधन व विषयाशी संबंधित साहित्याचा अभ्यास करणे खूप गरजेचे असते. प्रस्तुत संशोधनात संशोधन विषयाशी संबंधीत पूर्व संशोधनाचा आणि संशोधन विषयाशी संबंधीत साहित्याचा अभ्यास करण्यात आला. पूर्व संशोधनाचा अभ्यास केल्यामुळे संशोधन विषयाशी संबंधीत झालेल्या संशोधनाची माहिती मिळाली. संशोधनाचे विविध पैलू समजून संशोधनाची दिशा ठरवता आली.

पूर्व संशोधन अभ्यासामध्ये प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधीत एकूण पाच संशोधन झाल्याचे आढळून आले. यामध्ये सौ.पुरंदरे ली.ना. यांचे 'मराठीतील मुलांची मासिके (संदर्भ– आनंद) एक अभ्यास. १८५५ ते १९८० या संशोधनामध्ये मुलांच्या बालमासिका संदर्भात संशोधन केले आहे. शिंदे सु.भा. यांचे 'बालबोधमेव्या'चे बालसाहित्य विषयक कार्य (इ.स.१८७३ ते १९१०)' संशोधन हे 'बालबोधमेवा' मधील बालसाहित्याशी संबंधित आहे.

प्रा.टिळक विद्यागौरी यांचे 'दे.ना.टिळक संपादित : बालबोधमेवा मासिकाचे वाङ्मयीन कार्य' या संशोधनात इ.स.१९२४ ते १९४२ कालावधीतील उपलब्ध बालबोधमेवाच्या अंकावर संशोधन करण्यात आले. यामध्ये बालबोधमेवातील कथात्मक वाङमय, कविता, संकीर्ण, सदरे, लेखक व कवी इ. बाबींवर संशोधन करण्यात आले आहे.

सौ. घोलप ल.रा. यांच्या 'किशोर मासिकांचे वाङ्मयीन कार्य (प्रारंभ ते २०००)' या संशोधनात किशोर मासिकाच्या सन २००० पर्यंतच्या वाङ्मयीन कार्याचा परामर्श घेण्यात आलेला आहे.

डॉ.टिळक गिताली यांच्या 'A study of content analysis of marathi children priodical for enhancing multiple skill among children' प्रस्तुत संशोधनमुलांच्या एकाधिक बुद्धिमत्ता विषयी केलेले असून मुलांच्या बुद्धिमत्ता विकासामध्ये मुलांच्या मुद्रित प्रसार माध्यमांचा सहभाग महत्त्वपूर्ण असल्याचे सिद्ध झालेले आहे. या बरोबरच आधुनिक प्रसारमाध्यमे सर्वांसाठी उपलब्ध होत नसल्याचा निष्कर्ष प्रस्तुत संशोधनातून निघाला आहे. मुलांच्या मुद्रित प्रसारमाध्यमातील साहित्य मुलांच्या एकाधिक बुद्धिमत्ता विकासासाठी उपयुक्त असल्याचेही प्रस्तुत संशोधनातून स्पष्ट झाले.

संशोधन साहित्याचा आढावा संशोधन विषयाच्या अनुषंगाने घेण्यात आला. संशोधन साहित्य आढावामध्ये संशोधन विषयाशी संबंधीत ग्रंथ, संदर्भग्रंथ, पुस्तके यांचा अभ्यास केला. संशोधन साहित्याच्या आढाव्यामधून संशोधन विषयाशी संबंधीत माहिती मिळाली. संशोधन विषयाच्या विविध पैलूंचे ज्ञान झाले.

## ३. संशोधन कार्यपद्धती

संशोधन कार्यपद्धती हे प्रस्तुत संशोधनातील तिसरे प्रकरण आहे.

संशोधन हे सर्वच क्षेत्रामध्ये केले जाते. नैसर्गिक विषयातील संशोधन व समाजशास्त्रीय विषयातील संशोधन हे शास्त्रीय पद्धतीनेच केले जाते. म्हणून समाजशास्त्रीय संशोधनात वस्तुनिष्ठता असते. प्रस्तुत संशोधनात समाजशास्त्रीय संशोधनाच्या सर्वच पायऱ्यांचा आणि नियमांचा आधार घेण्यात आलेला आहे.

प्रस्तुत संशोधनात संशोधनातील विविध संकल्पना स्पष्ट करण्यात आल्या आहेत. या संकल्पनेमध्ये संशोधन म्हणजे काय, सामाजिक संशोधन, सामाजिक संशोधनाचेविविध प्रकार स्पष्ट करण्यात आले. मुलभूत अथवा शुद्ध संशोधन, उपयोजीत संशोधन, वर्णनात्मक संशोधन, अन्वेषणात्मक अथवा परिचयात्मक संशोधन, व्याख्यात्मक अथवा कारणात्मक संशोधन, प्रयोगात्मक संशोधन, क्रियात्मक संशोधन, मूल्यांकनात्मक संशोधन या सामाजिक संशोधनाच्या प्रकारांचा आढावा प्रस्तुत संशोधनात घेण्यात आला.

''मुद्रित प्रसारमाध्यमात प्रसिद्ध झालेल्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास. विशेष संदर्भ : किशोर आणि छावा मासिक (कालावधी २००८ ते २०१८)'' या संशोधन विषयात तुलनात्मक अभ्यास असल्याने प्रस्तुत संशोधन वर्णनात्मक संशोधन प्रकारात येते.

प्रस्तुत संशोधन मुद्रित प्रसारमाध्यमांशी संबंधीत असल्याने वृत्तपत्र संशोधन अथवा वृत्तपत्रविद्या संशोधन या विषयामध्ये समावेश होतो. वृत्तपत्रीय संशोधनात वृत्तपत्रातून अथवा नियतकालिकातून प्रसिद्ध झालेले आशय, विविध माहिती, बातम्या, लेखकांचे लेख, संपादकीय लेख इत्यादी सामुग्रीचा आशय समजून घ्यावा लागतो. वाचक वर्ग अथवा वृत्तपत्राशी संबंधीतांचे सर्वेक्षण करावे लागते. प्रस्तुत संशोधनात मुद्रित प्रसारमाध्यमातून मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या साहित्याचा अभ्यास करण्यात आला आहे.

संशोधन आराखडा संशोधनात दिशादर्शक असतो. संशोधनाच्या यशस्वीतेसाठी संशोधन आराखडा महत्त्वपूर्ण असतो. संशोधन प्रक्रिया ही गुंतागुंतीची व दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. गुंतागुंतीच्या व दीर्घकाळ चालणाऱ्या प्रक्रियेमध्ये सुसुत्रता आणण्यासाठी संशोधनात संशोधन आराखडा तयार केला जातो. संशोधन विषयाच्या उद्देशाच्या आधारावर आणि अध्ययनाच्या दृष्टीकोनाच्या आधारावर संशोधन आराखड्याचे विविध प्रकार पडतात. प्रस्तुत संशोधनात अन्वेषणात्मक अथवा परिचयात्मक संशोधन आराखडा, निदानात्मक,

संशोधन आराखडा, प्रयोगात्मक अथवा परिक्षणात्मक संशोधन आराखडा, वर्णनात्मक संशोधन आराखडा यांचा आढावा घेण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आलेला आहे.

सामाजिक संशोधनात गृहितकृत्यांच्या आधारावर संशोधनाची दिशा ठरते. गृहितकृत्ये हे कामचलाऊ अनुमान अथवा कल्पना असते. आपले वैयक्तिक अनुभव, विचार, ज्ञान, परिस्थिती, साहित्य, सामाजिक संबंधातून संशोधकाला गृहितकृत्ये सुचत असतात. प्रस्तुत संशोधनात पुढील गृहितकृत्ये निश्चित करण्यात आलेले होते.

१. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमातील मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य मुलांच्या संदर्भात असणाऱ्या विविध बाबींचा विचार करुन निवडले जाते.
२. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य मुलांच्या वेगवेगळ्या साहित्य प्रकारास कमी-अधिक प्रमाणात स्थान देतात.
३. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य अभ्यासक्रमातील विविध विषयांशी संबंधीत असते.
४. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या साहित्यामुळे मुलांच्या भाषीक कौशल्य (क्षमता) विकसनास मदत होते.
५. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य वाचनामागील मुलांचा हेतू वेगवेगळा असतो.
६. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य मुलांवर मुल्यसंस्कार करण्यासाठी उपयोगी आहे.

प्रस्तुत संशोधनात मुलाखत, बंदिस्त प्रश्नावली तंत्राचा वापर करण्यात आला. अभ्यासिन मासिकाच्या संपादकाच्या मुलाखती घेण्यात आल्या. यामध्ये किशोर मासिकाचे कार्यकारी संपादक किरण केंद्रे व छावा मासिकाच्या संपादिका डॉ.गिताली टिळक-मोने यांच्या मुलाखती आहेत. संशोधन हे मुलांशी संबंधित असल्याने शिक्षकांना, मुलांनाही प्रस्तुत संशोधनात सहभागी करुन घेतले. नाशिक विभागातील प्रत्येक जिल्ह्यातील ८० शिक्षकांकडून आणि विभागातून एकूण ४०० शिक्षकांकडून बंदिस्त प्रश्नावली भरुन घेण्यात आली. नाशिक विभागातील ४ थी व ५ वी च्या एकूण ६०० विद्यार्थ्यांकडून बंदिस्त प्रश्नावली भरुन घेण्यात आली. मुलाखत व बंदिस्त प्रश्नावलीच्या आधारावर निष्कर्षापर्यंत पोहचता आले.

## ४. माहिती संकलन व आशय विश्लेषणः

माहिती संकलन व आशय विश्लेषण हे प्रकरण संशोधनामधील चौथे प्रकरण आहे. या प्रकरणाचा सारांश पुढीलप्रमाणे आहे.

संशोधनाच्या अचुक निष्कर्षापर्यंत पोहचण्यासाठी माहितीचे संकलन व आशय विश्लेषण करणे क्रमप्राप्त असते. प्रस्तुत संशोधन विषयामध्ये किशोर व छावा मासिकांच्या जानेवारी २००८ ते डिसेंबर २०१८ पर्यंतच्या एकूण ११ वर्षाच्या अंकांचे माहिती संकलन केले आहे. संपादक मुलाखत, शिक्षक प्रश्नावली व मुलांची प्रश्नावलीचा आधार घेवून माहितीचे संकलन करण्यात आले.

किशोर मासिकाच्या जानेवारी २००८ ते डिसेंबर २०१८ पर्यंतच्या एकूण १२१ अंकाचा सखोल अभ्यास केला. यामध्ये प्रत्येक अंकाचे विविध पैलू व बाबींचे सुक्ष्म अध्ययन केले. १२१ अंकाच्या अभ्यासानंतर या अंकातील प्रसिद्ध झालेल्या साहित्याचे वर्गीकरण करण्यात आले. प्रसिद्ध साहित्याच्या प्रकारानुसार व विषयनिहाय प्रसिद्ध मजकुरानुसार माहितीचे वर्गीकरण केले. प्रसिद्ध साहित्याच्या प्रकारानुसार कथा, कविता, चित्रकथा, मुलांचे लिखाण, विनोद, लेख, कृतियूक्त साहित्य, नाट्य, कोडे व इतर साहित्य असे वर्गीकरण करण्यात आले.

विविध प्रकारच्या कथा, विविध प्रकारच्या कविता, मुलांनी लिहीलेले साहित्य, वेगवेगळे कोडे इ. सर्वांचा सखोल अभ्यास करुन एकूण प्रसिद्ध साहित्याचे १० प्रकारामध्ये वर्गीकरण करण्यात आले. यानंतर प्रत्येक साहित्याला प्रत्येक अंकामध्ये किती चौसेमी स्थान दिले हे मोजण्यात आले. १० प्रकारच्या साहित्यामधील कोणकोणत्या साहित्याला अंकामध्ये किती चौसेमी स्थान देण्यात आले याची नोंद घेण्यात आली. या पद्धतीने १२१ अंकाच्या माहितीचे वर्गीकरण करुन माहिती संकलित करुन वर्षनिहाय आशय विश्लेषण करण्यात आले.

प्रसिद्ध साहित्याच्या प्रकारानुसार आशय विश्लेषण केल्यानंतर विषयनिहाय प्रसिद्ध साहित्याचा अंकनिहाय अभ्यास केला. किशोर मासिकाने प्रसिद्ध केलेल्या साहित्याचे मुलांच्या अभ्यसाक्रमातील एकूण ११ विषयामध्ये वर्गीकरण करण्यात आले. मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, विज्ञान, कला, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण, भुगोल, इतिहास,गणित, संस्कृत विषयामध्ये किशोर मासिकाने प्रसिद्ध केलेल्या साहित्याचे वर्गीकरण करण्यात आले. निष्कर्षापर्यंत अचुक पोहचता यावे म्हणून विषयनिहाय प्रत्येक साहित्यास (मजकुरास) प्रत्येक

अंकामध्ये किती चौसेमी स्थान दिले हे मोजण्यात आले. त्याची नोंद घेतली. संकलित माहिती वर्षनिहाय एकत्रित करुन विषयनिहाय प्रसिद्ध मजकुराचे अथवा साहित्याचे आशय विश्लेषण करण्यात आले.

किशोर मासिकाच्या माहिती संकलन व आशय विश्लेषणानंतर छावा मासिकाचे माहिती संकलन व आशय विश्लेषण करण्यास सुरुवात केली. छावा मासिकाच्या जानेवारी २००८ ते जून २०१५ पर्यंतच्या एकूण ९० मासिक अंकाचा व जुलै २०१५ ते डिसेंबर २०१८ पर्यंतच्या एकूण १८२ साप्ताहिक अंकाचा सखोल अभ्यास केला. एकूण २७२ मासिक व साप्ताहिक अंकाच्या अभ्यासानंतर प्रसिद्ध साहित्याचे विषयनिहाय व साहित्य प्रकारानुसार वर्गीकरण करण्यात आले. मासिक किशोर प्रमाणे मासिक छावाने विविध साहित्य प्रकारास व विषय निहाय मजकुरास किती चौसेमी स्थान दिले हे मोजण्यात आले. संकलित माहितीचे वर्षनिहाय एकत्रिकरण करण्यात आले. वर्षनिहाय संकलित माहितीचे साहित्य प्रकारानुसार व विषयनिहाय प्रसिद्ध मजकुरानुसार वर्षनिहाय आशय विश्लेषण करण्यात आले.

शिक्षक प्रश्नावलीच्या माध्यमातून एकूण १० प्रश्न शिक्षकांना विचारण्यात आले. यामध्ये अहमदनगर, नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार जिल्ह्यातील प्रत्येकी ८० शिक्षकांना प्रश्नावली देण्यात आली. नाशिक विभागातील एकूण ४०० शिक्षकांकडून प्रश्नावली भरुन घेण्यात आली. यामध्ये शिक्षकांचे वाचन, मुद्रित प्रसार माध्यमांची शाळेत उपलब्धता, साहित्यातील मुल्ये, मूल्ये रुजवण्यासाठी मुद्रित प्रसारमाध्यमातील साहित्याचा उपयोग, भाषेचा क्षमता अथवा कौशल्य विकास, सर्वाधिक विकसीत होणारी क्षमता, वाचनाची सवय, आकर्षक साहित्य, साहित्याचा अध्यापनात वापर, साहित्याचा दर्जा, शिक्षकांचे लिखाण, शिक्षक वर्गणीदार या प्रमुख मुद्यांच्या आधारावर माहिती संकलित करुन आशय विश्लेषण करण्यात आले.

मुलांच्या प्रश्नावलीच्या माध्यमातून नाशिक विभागातील एकूण ६०० विद्यार्थ्यांना प्रश्नावली देवून माहिती संकलन केले. संकलित माहितीमध्ये मुद्रित प्रसारमाध्यमाचे वाचन, वाचनाचे ठिकाण, वाचनाची वेळ, भाषा, वाचनाचा हेतू अथवा उद्देश सर्वाधिक वाचले जाणारे साहित्य, सर्वाधिक आवडते साहित्य, प्रेरक या घटकांचा समावेश केला. संकलित माहितीचे घटकनिहाय आशय विश्लेषण करुन निष्कर्ष काढण्यात आले.

मासिक किशोरचे कार्यकारी संपादक किरण केंद्रे आणि मासिक छावाच्या संपादिका डॉ.गिताली टिळक–मोने यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखतीच्या माध्यमातून मासिक सुरु करण्यामागील हेतू, एकूण वर्गणीदार, लेखक, साहित्य निवडीमागचे निकष, पोहोच, सुचना या घटकांची माहिती संकलित करुन आशय विश्लेषण करण्यात आले.

**५.सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी**

सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी हे प्रस्तुत संशोधनातील पाचवे प्रकरण आहे. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१. मुलांच्या वयानुरुप योग्य, आकलनास सोपे, विकासास सहाय्यभूत, संस्कारक्षम, मूल्याधिष्ठीत हे निकष किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमासाठी साहित्य निवडतांना लावले जातात.

२. सन २००८ ते २०१८ अखेर किशोरने कथा या साहित्य प्रकारास ३८.६२ टक्के स्थान दिले. यावरुन अभ्यासीन कालावधीमधये किशोरने कथा या साहित्य प्रकारास सर्वाधिक स्थान दिले. छावाने सन २००८ ते सन २०१५ अखेर कथा या साहित्य प्रकारास ३८.३० टक्के स्थान दिले. सन २००८ ते २०१८ अखेर लेख या साहित्य प्रकारास २७.२४ टक्के स्थान दिले. यावरुन छावाने सन २००८ ते सन २०१५ अखेर कथा या साहित्य प्रकारास आणि सन २०१६ ते २०१८ अखेर लेखन या साहित्य प्रकारास सर्वाधिक स्थान दिले.

३. सन २००८ ते २०१८ अखेर भाषा (मराठी) विषयाला किशोरने ७९.७४ टक्के व छावाने भाषा (मराठी) विषयाला ५०.४३ टक्के स्थान दिले. यावरुन अभ्यासीन कालावधीमध्ये किशोर व छावाने भाषा (मराठी) विषयास सर्वाधिक स्थान दिले असा निष्कर्ष निघतो.

४. संशोधनातील सहभागी शिक्षकापैकी अनुक्रमे ९६ टक्के व ९५ टक्के शिक्षक किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमातील मुलांच्या साहित्यामुळे मुलांच्या भाषीक क्षमता विकसनात मदत होते असे स्पष्ट करतात.

यावरुन मुलांच्या भाषीक क्षमता विकसनामध्ये माध्यमातील साहित्य सहाय्यभूत ठरते असा निष्कर्ष निघतो. वाचन क्षमता विकसनात साहित्याची सर्वाधिक मदत होते.

५. संशोधनातील सहभागी शिक्षकांपैकी अन्नुकमे ९१ टक्के शिक्षक व ९० टक्के शिक्षक किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमातील मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या साहित्यामध्ये मूल्ये असतात असे स्पष्ट करतात. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमाने मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य मूल्याधिष्ठीत असते आणि मुलांवर उच्च दर्जाच्या मूल्यसंस्कारासाठी त्याचा उपयोग होतो.

६. ज्ञान व माहिती मिळवण्यासाठी अनुक्रमे ५४ टक्के व ५३ टक्के मुले किशोर व छावा या मुद्रित प्रसरमाध्यमाचे वाचन करतात. ज्ञान व माहिती मिळवणे हा मुलांच्या माध्यमातील साहित्य वाचनामागील मुख्य हेतू आहे. मनोरंजन हा छंद हे साहित्य वाचनामागचे पुरक उद्देश आहेत.

७. किशोर व छावा या मुद्रित माध्यमातील चित्रकथा अनुक्रमे ३० टक्के मुलांना व ३२ टक्के मुलांना सर्वाधिक आवडतात. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमातील चित्रकथा हा साहित्य प्रकार मुलांना सर्वाधिक आवडतो.

८. संशोधनात सहभागी केलेल्या शिक्षकांपैकी फ क्त १ टक्के शिक्षक मुलांसाठी मुद्रित प्रसार माध्यमात (किशोर/छावा/इतर) लिखान करतात. मुलांसाठी मुद्रित माध्यमात अत्यल्प शिक्षक लिखाण करतात.

९. संशोधनात सहभागी झालेल्या ७७ टक्के विद्यार्थ्यांना मुद्रित प्रसारमाध्यमाचे (किशोर/छावा/इतर) वाचन करण्यासाठी शिक्षक प्रोत्साहन देतात. शिक्षक मुलांना माध्यमातील साहित्य वाचनासाठी सर्वाधिक प्रोत्साहन देतात.

**शिफारशी / सुचना :**

माध्यम समाजाच्या प्रतिक्रियांचा आरसा असतो. समाज प्रगतीपथावर जाण्यासाठी माध्यमांनी कणखर भूमिका घेणे गरजेचे असते. आजच्या मुलांचे भवितव्य, पुढील भविष्यकाळातील वाटचाल प्रभावी होण्यासाठी त्यांचे माध्यमे प्रभावी असणे गरजेचे आहे. म्हणून या संशोधनातून खालील शिफारशी मांडल्या.

१. किशोर,छावा व इतर मुद्रित माध्यमांमध्ये शालेय अभ्यासक्रमातील सर्व विषयांना सर्व समावेशक जागा मिळावी.
२. किशोर,छावा व इतर मुद्रित माध्यमांमध्ये उपयुक्ततेनुसार साहित्यास जागा मिळावी.
३. किशोर,छावा व इतरमुद्रित माध्यमामध्ये मुलांच्या कथेचा आशय चित्रकथांच्या रुपाने छापण्यात यावा.
४. शासकीय स्तरावरुन प्राथमिक शाळांना मुलांचे नियतकालीक पुरवण्यात यावेत.
५. किशोर,छावा व इतरमुद्रित माध्यमांनी व शासकीय स्तरावरुन शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या नियतकालीकात लिखाणासाठी प्रेरित करावे.
६. मुले क्रियाशील बनावेत म्हणून किशोर,छावा व इतरमुद्रित माध्यमात कृती आधारित घटकांना स्थान द्यावे.
७. मुलांची एकाग्रता, निरीक्षण क्षमता वाढीस लागावी म्हणून किशोर,छावा व इतरमुद्रित माध्यमात उपयुक्त साहित्य छापण्यात यावे
८. मुलांच्या मुद्रित माध्यमांनी अभ्यासक्रमातील विषयाच्या संकल्पना स्पष्ट करण्यासाठी प्रयत्न करावा.

**पुढील संशोधनाची दिशा :**

विषयाच्या घटकाचा अभ्यास करण्यासाठी अनेकाधिक संशोधनाची आवश्यकता असते. घटकामध्ये अनेक सुक्ष्म उपघटक असतात. सर्वच उपघटक एका संशोधनात समाविष्ट करणे अशक्य असते. माध्यमातील वेगवेगळ्या घटकांवर संशोधन कण्यासाठी प्रचंड वाव आहे. वृत्तपत्रविद्यामध्ये तसेच शिक्षणशास्त्र, बालमानसशास्त्रामधील अभ्यासक खालील घटकाच्या संदर्भात संशोधन करु शकतात.

१. शिक्षण आणि माध्यमे.

२. बालविकास आणि माध्यमे

३. मुलांच्या नियतकालिकातील साहित्याचे विविध घटकांच्या संदर्भात संशोधन.

४. माध्यमांचा समाजावरील परिणाम

५. मुलांच्या नियतकालिकातील जाहिराती

६. मासिक किशोरमधील बडबडगीते

७. साहित्य आणि माध्यम

८. माध्यमातील कवितांचे बदलते रुप

९. वेगवेगळ्या नियतकालिकांचा अभ्यास

१०. मूल्ये संस्कार आणि नियतकालिके

११. वृत्तपत्र आणि लेखक

१२. साहित्याचे बदलते रुप

१३. छावाची वाङ्मयीन वाटचाल

१४. नियतकालिकातील परिणामकारक चित्रे

वरील क्षेत्रामध्ये विविध उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून अभ्यास करणे शक्य आहे. या क्षेत्रात समाजशास्त्रीय अभ्यासकास संधी उपलब्ध आहे. अभ्यासक स्वतः कल्पनाशक्तीनुसार यामध्ये बदल करुन संशोधन करु शकतो.

**संशोधक** **मार्गदर्शक**

**अशोक मारुती बांगर** **प्राचार्य डॉ.नामदेव पी.सानप**

# अनुक्रमणिका


| १. | प्रकरणाचे नाव | पान क्रं |
|---|---|---|
| १ | संशोधन विषयाची ओळख | १९ |
| २ | संशोधन विषयाशी संबंधीत साहित्याचा आढावा | ६० |
| ३ | संशोधन कार्यपद्धती | ८२ |
| ४ | माहिती संकलन व आशय विश्लेषण | १०६ |
| ५ | सारांश निष्कर्ष आणि शिफारशी | २९४ |
| ६ | परिशिष्ठ | ३०३ |

# प्रकरण : १

# संशोधन विषयाची ओळख

# अनुक्रमणिका

१. प्रस्तावना

२. संशोधन विषय

३. संशोधनातील महत्त्वाच्या सज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या

४. संशोधन विषयाचे महत्त्व

५. संशोधन उद्दिष्टे

६. प्रसार माध्यमे

७. पुर्वकालीन भारतीय प्रसारमाध्यमे

८. नाशिक विभाग : एक दृष्टीक्षेप

९. मासिक छावा

१०. समारोप

११.संदर्भ

**१.प्रस्तावना**

वृत्तपत्रे बातम्या, घडामोडी, घटना प्रसंग यांची माहिती समाजाला देतात. घडलेल्या घटना, घडामोडी, प्रसंग मुद्रित स्वरुपात रुपांतरित करुन वृत्तपत्र समाजापर्यंत पाठवण्याचे कार्य करते.''मुद्रित शब्दाने भावनिक विश्वासार्हता निर्माण होते. मुद्रणाने धर्मभावना जागविल्या व राष्ट्रवादाचाही प्रसार केला. मानवी समाजाची मुद्रित माध्यमांनी मौलिक सेवा बजावली आहे. ''[१]हे सिद्ध होते.सर्वप्रथम मुद्रित प्रसारमाध्यमाचा वापर धर्मप्रचारासाठी व धर्मप्रसारासाठी करण्यात आला. धर्मविषयक पुस्तके, ग्रंथ मुद्रित करुन धर्माचा प्रचार व प्रसार करण्यात आला.

वृत्तपत्रे हे सर्वात जुने प्रसारमाध्यम आहे. वृत्तपत्राने मुद्रित केलेला मजकूर हा दीर्घ काळासाठी टिकून राहतो. याचा अथ वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केलेले साहित्य, बातम्या लेख यांचे आयुष्यमान इतर प्रसारमाध्यमांपेक्षा दीर्घकाळ असते. वृत्तपत्र हे इतर माध्यमांपेक्षा सहजतेने उपलब्ध होते. सामान्य व्यक्तीही मुद्रित प्रसार माध्यम सहजपणे, जास्त पैसा खर्च न करता खरेदी करु शकतो. म्हणून वृत्तपत्राचा वाचकवर्ग हा समाजातील सर्व स्तरातील असतो. गरीब व्यक्तीलाही वृत्तपत्र खरेदी करता येते. वृत्तपत्राने प्रसिद्ध केलेल्या साहित्याचा, बातम्याचा, लेखांचा सहजपणे संग्रह करता येतो. अनेक विषयाचे, घडामोडीचे वर्णन वृत्तपत्रांमुळे दीर्घकाळासाठी टिकून राहते. भूतकाळात घडलेल्या घटनांना, घडामोडींना उजाळा देता येतो. म्हणून वृत्तपत्र कायम स्वरुपी ज्ञानाचे भांडार आहे.

काही वृत्तपत्रे फक्त मुलांसाठी साहित्य प्रसिद्ध करतात. उदा. मासिक किशोर, छावा इ. तर काही वृत्तपत्रे मुलांसाठी पुरवण्या प्रकाशित करतात. उदा. दै.सकाळची बालमित्र पुरवणी, तर काही दैनिक मुलांसाठी ठराविक कालावधीसाठी स्वतंत्र पान मुद्रित करीत असतात. वृत्तपत्रांनी विद्यार्थ्यांसाठी प्रकाशित केलेले साहित्य वेगवेगळ्या प्रकारचे असते. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या कथा असतात. कविता, बालगिते, समुहगिते याबरोबर विनोद यांचा अंतर्भाव मुनसंख्शस साहित्यामध्ये होतो. माहितीपर लेख, संशोधनात्मक माहिती, कृतीयुक्त साहित्य, विविध प्रकारचे कोडे इ. साहित्य मुद्रित माध्यमांद्वारे मुलांसाठी होते.

मुले ही देशाचे भावी आधारस्तंभ आहेत. बालमानसशास्त्रानुसार ६ ते १४ वयोगट मुलांच्या विकासासाठी खूप महत्त्वाचा असतो. ''वयाच्या ९ व्या वर्षापर्यंत मेंदूची ९० टक्के वाढ

होते. बुद्धीची तरलता, कल्पनाशक्ती वाढते.'' [२] याचा अर्थ ६ ते १४ वयोगट मुलांच्या विकासासासाठी खूप महत्त्वाचा असतो. या वयोगटातील बालकांचा विकास अधिक वेगाने होतो, म्हणून या वयात मुलांना योग्य परिस्थिती लाभणे गरजेचे आहे. मुलांच्या विकासास योग्य दिशा मिळाल्यास मुले उद्याचे सुसंस्कारशील नागरिक बनतील. जे संस्कार मुलांच्या मनावर होतात, त्या संस्काराप्रमाणेच मुलांचे व्यक्तीमत्व घडते म्हणून या वयातील मुलांच्या बाबतीत पालक, शिक्षक व समाजाने जागरुक राहणे गरजेचे आहे.

मुले ज्या प्रकारचे साहित्य वाचतात त्या प्रकारचे संस्कार मुलांवर होतात. साहित्याच्या दर्जानुसार मुलांची जडणघडण होते. म्हणून वृत्तपत्रांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या मजकूराचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

मुले ही शाळेमध्ये, समाजामध्ये, मित्रांच्या सहवासात निरंतरपणे शिकत असतात. वृत्तपत्रेही शिक्षणाचे काम करते. ''मराठी वृत्तपत्र जन्माला आले ते प्रबोधनाच्या हेतूने. पुढे त्यात टीका, प्रक्षोभ, निंदानालस्ती, स्तुती अशा विविध गोष्टींना एकेका काळात प्राधान्य मिळाले. '' [(३)] यावरुन मराठी वृत्तपत्राचा जन्म शिक्षण, प्रबोधनाच्या हेतूने झालेला आहे. म्हणून मुद्रित माध्यमे शिक्षण देण्याचे काम करतात.

वृत्तपत्रांनी मुलांसाठी प्रकाशित केलेल्या काही साहित्यामुळे मुलांच्या ज्ञानात वाढ होते. काही साहित्य विद्यार्थ्यांच्या अंगी मुल्यांची रुजवण करते. मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या काही साहित्यामुळे क्रियाशील बनतात. विविध कलागुणांनी वाढ मुलांमध्ये होते.

वृत्तपत्रांनी प्रकाशित केलेले साहित्य विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्राचा विचार करुन प्रसिद्ध केलेले असावे. ते साहित्य अतिशय विचारपूर्वक प्रसिद्ध करावे लागते. हे साहित्य मुलांच्या भावनिक, बौद्धिक, शारीरिक, मानसिक विकासास पुरक असणे गरजेचे आहे. साहित्यामुळे मूल्ये, प्रेमभाव, समता इ. गुणांचा मुलांच्या अंगी विकास होणे आवश्यक आहे. या साहित्यामुळे मुलांमध्ये विषमता, द्वेष, भेदभाव, अंधश्रद्धा इ. दुर्गुण वाढीस लागणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे.

प्रस्तुत संशोधन मुलांसाठी असून या संशोधनामुळे मुद्रित माध्यमात लिखाण करणाऱ्या लेखकांना, शालेय अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना एक नवी दिशा प्राप्त होईल.

## २.संशोधन विषय

संशोधनात प्रथम समस्येची निवड करावी लागते. ''समस्या सुत्रण किंवा विषयाची निवड करणे ही वैज्ञानिक अध्ययनाची पहिली पायरी आहे '' [3] संशोधन विषयाची अथवा समस्येची निश्चितीमुळे संशोधकास संशोधन विषयावर लक्ष केंद्रित करता येते. प्रस्तुत संशोधनाचा विषय पुढील प्रमाणे आहे.

**''मुद्रित प्रसारमाध्यमात प्रसिद्ध झालेल्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास. विशेष संदर्भ : किशोर आणि छावा मासिक (कालावधी २००८ ते २०१८)''**

## ३. संशोधनातील महत्त्वाच्या संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या

१. **मुलांचे मुद्रित प्रसार माध्यम :** ''जे मुद्रित माध्यम मुलांसाठी साहित्य प्रसिद्ध करतात. त्यांना मुलांचे मुद्रित प्रसार माध्यम म्हणतात. यामध्ये मुलांचे मासिक, मुलांचे साप्ताहिक, दैनिकामधील मुलांच्या पुरवण्या इ. समावेश होतो. यांना मुलांचे माध्यम किंवा मुलांचे मुद्रित माध्यम, मुलांचे नियतकालिक, मुलांचे वृत्तपत्र, मुलांचे पत्र हे पर्यायी शब्द वापरले आहे.

२. **बालसाहित्य :** मुलांच्या मुद्रित माध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या कथा, कविता, चित्रकथा, कोडे, लेख, पत्रे, कृतियुक्त साहित्य, विनोद, मुलांचे लिखाण इ. साहित्य प्रकारास बालसाहित्य अथवा साहित्य म्हणतात.

३. **मुले :** 'इयत्ता १ ली ते ७ वी मधील आणि वय ६ ते १४ वयोगटातील मुले आणि मुली यांना एकत्रीतपणे मुले म्हटले आहे. ' संशोधनात काही ठिकाणी विद्यार्थी हा शब्दप्रयोग वापरला आहे.

४. **भाषिक क्षमता (कौशल्य) :** श्रवण, भाषण, वाचन, लेखन यांना भाषिक क्षमता अथवा भाषिक कौशल्य असे म्हणतात.

५. **अभ्यासक्रमातील विषय :** शालेय अभ्यासक्रमातील भाषा (मराठी), भाषा (हिंदी), भाषा (इंग्रजी) इतिहास, सामान्यज्ञान, गणित, भूगोल, विज्ञान इ. पाठ्यक्रमास अभ्यासक्रमातील विषय म्हणतात.

६. **मूल्ये :** 'माणसाच्या अंगी जे चांगले गुण आहेत त्या गुणांना मूल्ये म्हणतात. यामध्ये वैयक्तिक मूल्ये, सामाजिक मूल्ये व राष्ट्रीय मुल्य यांचा समावेश होतो. महाराष्ट्र शासनाने निर्धारित केलेली १० नीतिमूल्ये यांचा समावेशही मूल्यांमध्ये होतो. '

७. **शिक्षक :** इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या अध्यापकास शिक्षक म्हटले आहे.यामध्ये शहरी व ग्रामीण भागातील मराठी माध्यमाच्या शिक्षकाचा समावेश होतो.

८. **मुद्रित प्रसारमाध्यम :** 'घटना, बातम्या, घडामोडी, माहिती इ.वाचकापर्यंत पोहचवणाऱ्या दैनिकास, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक यांना मुद्रित प्रसारमाध्यम म्हटले आहे.'

## ४. संशोधन विषयाचे महत्त्व

भारतात अनेक प्रकारचे प्रसार माध्यमे कार्यरत आहेत. यामध्ये विविध प्रकारचे मुद्रित माध्यमे, पारंपारिक माध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे, सामाजिक माध्यमे (सोशल मीडिया) इ. माध्यमांचा समावेश होतो. भारतातील माध्यमावर अनेक संशोधने झाली आहेत व यापुढेही माध्यमांवर संशोधन होणार आहेत.

मुद्रित माध्यमावरील संशोधन हे सामाजिक संशोधन आहे. वृत्तपत्र विद्यामध्ये अनेक संशोधन झाले आहेत. ''कोणत्याही शास्त्राच्या विकासाकरिता आणि प्रगतीकरिता, त्या शास्त्रामध्ये संशोधने होणे, अधिकाधिक संशोधक निर्माण होऊन त्यांनी वेगवेगळ्या समस्येबद्दल माहिती जमा करणे आवश्यक असते. ''[४] यावरुन कोणत्याही शास्त्राचा विकास हा त्या शास्त्रामध्ये झालेल्या संशोधनावर अवलंबून असतो. जेवढ्या जास्त संशोधकांनी शास्त्रामध्ये संशोधन केलेले आहेत, तेवढे ते शास्त्र समृद्ध होत असते. म्हणून हे संशोधन वृत्तपत्रविद्या शास्त्राला समृद्ध करणारे आहे. वृत्तपत्र विद्येच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

''मानव विविध प्रकारचे वर्तन करीत असतो. या मानवी वर्तनामधील कार्यकारण संबंधाचा शोध घेण्याचा प्रयत्न संशोधनात केला जातो. '' [५] याचा अर्थ मानवाच्या वर्तनामधील कार्यकारण संबंधांचा शोध सामाजिक संशोधनातून घेतला जातो. मुलांच्या वर्तनाचा संबंध विविध क्रिया–प्रतिक्रियांशी येतो. याचा शोध घेण्यासाठी सदरील संशोधन महत्त्वाचे आहे.

विविध वृत्तपत्रे मुलांचे साहित्य प्रकाशित करीत असतात. मुलांचे इलेक्ट्रॉनिक माध्यमामधील कार्यक्रम, मुले आवडीने पाहतात. मुद्रित माध्यमातील मजकूराकडे मुले आकर्षित होतात. या विविध प्रकारच्या माध्यमामधून मुलांचे शिक्षण चालू असते. ''जीवनाची कक्षा, विविधता जसजशी रुंदावत, उंचावत गेली, तसतसे शिक्षणाचे क्षेत्रही वाढत चालले'' [६] याचा अर्थ जीवनाच्या कक्षा उंचावल्यामुळे शिक्षणाच्याही कक्षा रुंदावल्या आहेत. माध्यमातील विविध प्रकारच्या साहित्यामधून विद्यार्थी ज्ञान, माहिती मिळवत असतात, म्हणून मुलाच्या माध्यमांवर संशोधने होणे महावाचे आहे.

विद्यार्थी वयोगट, मुलांची शब्दसंपत्ती, भाषाप्रभूत्व, मुलांचे ज्ञान, विषयाची समज इ. घटक विचारात घेवून विद्यार्थ्यांच्या साहित्य वृत्तपत्रात प्रसिद्धी मिळणे गरजेचे असते. म्हणून विद्यार्थ्यांच्या साहित्य निवडीमागचा निकष समजणार आहे. म्हणून मुलांच्या वृत्तपत्रातील मुलांच्या साहित्य निवडीमागचा निकष माहित होण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

''Children periodicals play o vital role in development of multiple intellegence of a chlild. '' [७]संशोधनातून मुलांचे नियतकालिके मुलांच्या बुद्धिमत्तेच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण, फायदेशीर भूमिका बजावतात. याचा अर्थ प्रसिद्ध केलेल्या साहित्याचा परिणाम मुलांच्या विविध प्रकारच्या विकासावर, बुद्धिमत्तेवर होत असतो. म्हणून सर्व साहित्य प्रकाराचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

किशोर व छावाने मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या साहित्याचा अभ्यास करुन कोणकोणत्या साहित्य प्रकारास किती स्थान मुद्रितमाध्यमाने दिलेले आहे, याचा अभ्यास या संशोधनात घेतला आहे. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमात मुलांच्या कोणत्या साहित्यास सर्वाधिक स्थान मिळालेल्या साहित्य प्रकाराचा शोध घेण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

मुलांच्या अभ्यासक्रमात वेगवेगळ्या विषयांना स्थान दिलेले आहे. ''प्रचलित शिक्षण पद्धतीचा गाभा म्हणजे निरनिराळ्या विषयांचे ज्ञान विद्यार्थ्यांना देणे. '' [८] याचा अर्थ निरनिराळ्या विषयांचे ज्ञान देणे हा प्रचलित शिक्षण पद्धतीचा गाभा आहे. विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी अनेक विषयाचे ज्ञान आवश्यक असते. शालेय अभ्यासक्रमात प्रथम भाषा (मराठी) भाषा (हिंदी),भाषा(इंग्रजी) इतिहास, विज्ञान, भुगोल, गणित इ. विषयाचा समावेश होतो. मुलांच्या शालेय विषयांना वृत्तपत्रे स्थान देतात. यामुळे मुलांचे अभ्यासक्रमातील

विषयांच्या ज्ञानात वाढ होते. मुलांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात, म्हणून विद्यार्थ्यांच्या मुद्रित प्रसार माध्यमांनी, मुलांच्या अभ्यासक्रमातील सर्वात जास्त स्थान कोणत्या विषयास मिळाले, याचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

भाषा विकासासाठी भाषिक क्षमता अथवा कौशल्य आत्मसात करणे खूप महत्त्वाचे असते. प.म. आलेगावकर यांच्या मते, ''भाषिक कौशल्य आणि बालकांचा विकास याचा फार जवळचा संबंध आहे. '' [१] याचा अर्थ विद्यार्थ्यांचा विकास हा मुलांच्या भाषिक कौशल्यावर अवलंबून असतो

श्रवण, भाषण, वाचन व लेखन ही भाषिक कौशल्ये (क्षमता) आहेत. यांचा अभ्यास करणे खूप महत्त्वाचे आहे. संशोधनात वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध केलेल्या साहित्यामुळे विद्यार्थ्यांचे भाषिक कौशल्य (क्षमता) विकसीत होतात का? आणि मुलांचे कोणते भाषिक कौशल्य (क्षमता) सर्वात जास्त विकसित होते? याचा शोध घेण्यासाठीसंशोधन महत्त्वपूर्ण आहे.

मुले मुद्रित माध्यमातील साहित्य वाचतात. वाचनाची आवड, अवांतर वाचनामुळे मुलांमध्ये निर्माण होत असते. मुले प्रसारमाध्यमातील साहित्याकडे आकर्षित झालेले असतात. मात्र मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलले साहित्य मुले का वाचतात, याचा शोध घेण्यासाठी हे संशोधन महत्त्वपूर्ण आहे. ज्ञान अथवा माहिती मिळवणे, मनोरंजन करणे, छंद म्हणून वाचन, इतर मुले अथवा मित्र वाचतात म्हणून मुद्रितमाध्यमातील साहित्याचे वाचन करणे इ. अनेक हेतू मुद्रितमाध्यमातील साहित्य वाचनामागे असतात. म्हणून वाचनामागील हेतूचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

कथा, चित्रकला, लेख, कविता, कोडे इ. प्रकारचे साहित्य मुद्रित माध्यमे प्रकाशित करीत असतात. प्रकाशित केलेले सर्वच साहित्य मुले वाचतात असे नाही. कोणते साहित्य सर्वात जास्त वाचले जाते याचा शोध घेण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

सर्वात जास्त वाचण्यात येणारे साहित्य आणि सर्वाधिक आवडते साहित्य यामध्ये फरक असू शकतो. कारण सर्वाधिक आवडणारे साहित्य प्रत्येक वृत्तपत्राच्या अंकात उपलब्ध असेल असे नाही. त्यामुळे मुलांच्या वृत्रापत्रामधील वाचण्यात येणारे आणि सर्वाधिक आवडते साहित्य याचा शोध घेण्यासाठी हे संशोधन केले.

बालमानसशास्त्रानुसार ६ ते १४ वयोगट मुलांच्या भावनिक, बौद्धिक, मानसिक, नैतिक, शारीरिक विकासाच्या बाबतीत महत्त्वपूर्ण कालखंड असतो. मुलांचे व्यक्तीमत्व याच कालखंडात आकार घेत असते. म्हणून ६ ते १४ वयोगटात मुलांवर नैतिकमूल्यांची, संस्काराची रुजवण होणे गरजेचे आहे. ''व्यक्तीच्या ठिकाणी काही सद्‍गुण तर काही दुर्गुण असतात. हे गुण कुटूंबातील, समाजातील इतर व्यक्तींकडून संस्कार होऊन आलेले असतात. सद्‍गुणांमुळे व्यक्तिमत्व चांगले होते. त्याच्या व्यक्तीमत्वाचा विकास होतो. '' [१०] याचा अर्थ व्यक्तीमत्वाच्या विकासासाठी व्यक्तीच्या अंगी सद्‍गुण असणे गरजेचे आहे. या सद्‍गुणाची रुजवण व्यक्तीच्या अंगी ६ ते १४ वयोगटात होत असते.

व्यक्तीच्या अंगी असणाऱ्या सद्‍गुणास 'मूल्ये' म्हणतात. मूल्यांचे अनेक प्रकार असून मूल्ये त्रिकालाबाधीत असतात. आदर्श नागरिक, आदर्श समाजनिर्मितीसाठी मूल्ये खूप महत्त्वाचे असतात. म्हणून विद्यार्थ्यांसाठी प्रकाशित केलेल्या साहित्यामध्ये मूल्ये असतात का? याचा शोध प्रस्तुत संशोधनातून घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या वृत्तपत्रांनीविद्यार्थ्यांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य मुल्यांवर आधारित असते का? आणि विद्यार्थ्यांवर मूल्यसंस्कार करण्यासाठीसाहित्याचा उपयोग होतो का? हा शोध घेण्यासाठीसंशोधन महत्त्वाचे आहे.

थोडक्यात विद्यार्थ्यांसाठी साहित्य निवडतांना कोणते निकष लावले जातात? विद्यार्थ्यांसाठी प्रकाशित केलेल्या साहित्याचा अभ्यास करुन सर्वाधिक स्थान मिळालेल्या साहित्य प्रकाराचा शोध घेण्यासाठी, मुलांच्या अभ्यासक्रमातील सर्वात जास्त स्थान मिळालेल्या विषयाचा शोध घेण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

## १. संशोधनाची उद्दिष्टे

प्रत्येक कार्यास, कामास अथवा कृतीस काही ना काही उद्दिष्ट असते. उद्दिष्टविना कोणतेही कार्य यशस्वी होणार नाही. हेतू डोळ्यासमोर ठेवून व्यक्ती स्वतःचे काम पूर्ण करीत असतो.

सामाजिक संशोधनात संशोधनाच्या उद्दिष्टाला खूप महत्त्व आहे. उद्दिष्टाशिवाय सामाजिक संशोधन पूर्ण होऊ शकत नाही. ''प्रत्येक संशोधनाचा हेतू ज्ञानाची वृद्धी करणे हा असतो. संशोधन हे ज्ञानवृद्धी करण्याचे एक साधन आहे. सामाजिक संशोधनाचा उद्देश हा

सामाजिक जीवन, घटना, तथ्ये किंवा समस्यांची ज्ञानप्राप्ती करणे हा आहे.'' [११] याचा अर्थ सामाजिक संशोधन विविध समस्या सोडवण्यासाठी, ज्ञानप्राप्ती करण्यासाठी केले जाते. ज्ञानाची वृद्धी अथवा समस्या निर्मूलन हा सामाजिक संशोधनाचा मुख्य हेतू असतो.

उद्दिष्टाशिवाय सामाजिक संशोधन हे चालक नसलेल्या वाहनासारखे आहे. उद्दिष्टाशिवाय सामाजिक संशोधन पुढे जाऊ शकत नाही. म्हणून उद्दिष्टाची निश्चिती करणे खूप महत्त्वाचे आहे.

संशोधनाच्या उद्दिष्टावर सामाजिक संशोधन अवलंबून असते. '' समाजातील कोणत्याही समस्याचे निराकरण करण्यासाठी कोणत्याही गृहितकृत्याचे परिक्षण करण्याकरिता, नवीन घटनांचा शोध घेण्याकरिता, विशिष्ट घटनांमधील नवीन संबंध शोधण्याच्या उद्देशाने कोणत्यातरी योग्य पद्धतीचा उपयोग करणे हा सामाजिक संशोधनाचा हेतू आहे.'' [१२] याचा अर्थ संशोधनाच्या उद्दिष्टानुसार आधारित संशोधन पद्धती असते. '' संशोधनाच्या उद्दिष्टानुसार आराखड्यात बदल होतो. संशोधनाचा प्रकार कोणता आहे, त्यानुसार संशोधनाच्या उद्दिष्टानुसार बदलत असतो.''[१३] यावरुन विषयाच्या उद्दिष्टानुसार आराखडा वापरावा लागतो. म्हणून संशोधनात उद्दिष्टांना खूप महत्त्व असते.

''मुद्रित प्रसारमाध्यमात प्रसिद्ध झालेल्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास. विशेष संदर्भ : किशोर आणि छावा मासिक (कालावधी २००८ ते २०१८)'' या संशोधन विषयाचे उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

**संशोधन उद्दिष्टे**

१. किशोर व छावा या मुद्रित माध्यमातील मुलांसाठी साहित्य निवडतांना कोणते निकष लावले जातात याचा शोध घेणे.
२. किशोर व छावा या मुद्रित माध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या साहित्याचा साहित्य प्रकारानुसार अभ्यास करणे आणि सर्वाधिक स्थान मिळालेल्या साहित्य प्रकाराचा शोधे घेणे.
३. शालेय अभ्यासक्रमातील कोणकोणत्याविषयास किशोर व छावा ही मुद्रितप्रसारमाध्यमे स्थान देतात याचा अभ्यास करुन सर्वाधिक स्थान मिळणाऱ्या विषयाचा शोध घेणे.

४. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमातील साहित्यामुळे भाषिक कौशल्ये (क्षमता) (श्रवण, भाषण, वाचन, लेखन इ.) विकसित होतात का? याचा अभ्यास करुन, कोणती क्षमता मुद्रित प्रसारमाध्यमातील साहित्यामुळे सर्वाधिक विकसित होते याचा शोध घेणे.

५. किशोर व छावा या मुद्रित माध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य मुले का वाचतात याचा अभ्यास करुन मुलांच्या आवडीच्या साहित्याचा शोध घेणे.

६. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमातील साहित्य मूल्यांवर आधारित असते का? याचा शोध घेणे.

## ६. प्रसारमाध्यमे

मानव हा समाजशील प्राणी आहे. समाजामध्ये मानवाची जडणघडण होत असते. समाजाकडून मानव ज्ञान, माहिती, विचार, धर्म इ. बाबी आत्मसात करतो. मानव एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञानाचे, माहितीचे, तंत्रज्ञानाचे हस्तांतरण करतो.

तंत्रज्ञानाच्या युगामध्ये जग एकमेकांच्या जवळ आले आहे. जगातली कोणतीही घटना, घडामोड अत्यल्प कालावधीत समजते. याचा अर्थ माहिती प्रसाराची साधने अत्यंत प्रगत झालेले आहेत. विचार, माहिती, ज्ञान इ. चे प्रसारण माध्यमांद्वारे केले जाते. डॉ.वि.ल. धारुरकर यांच्या मते ‘‘विचार प्रसारण करण्याचे सामर्थ्य असलेल्या कोणत्याही साधनास प्रसारमाध्यम म्हणता येईल.’’ [१४] याचा अर्थ ज्या साधनांमध्ये विचार प्रसारणाचे सामर्थ्य आहे, अशा साधनास प्रसारमाध्यम म्हटले जाते. प्रसार माध्यमाचे कार्यक्षेत्र खूप मोठे आहे. समाजावर संस्कार करण्यासाठी, समाजामध्ये योग्य बदल करण्यासाठी, लोकजीवनातील घडामोडी मांडण्यासाठी, सामाजिक व्यवहारातील बदल, विविध योजना राबविण्यासाठी समाज तयार करणे इ. अनेक बाबीसाठी माध्यमांचा वापर करण्यात येतो.

माहितीचे प्रसारण कोणत्या प्रकारे होते, या आधारावर प्रसार माध्यमांचे प्रकार पडतात. ‘‘ प्रत्येक संपर्क माध्यमाचे स्वरुप, त्याचे कार्य आणि वैशिष्ट्ये ही वेगवेगळी आहेत. आधुनिक काळातील या संपर्क माध्यमांचे १) मुद्रित, २) श्राव्य आणि ३) दृकश्राव्य अशा तीन प्रकारांमध्ये ढोबळपणे वर्गीकरण केले जाते.’’ [१५] यावरुन माध्यमाच्या स्वरुपानुसार, कार्यानुसार, वैशिष्ट्यावरुन मुद्रित माध्यमे, श्राव्य माध्यमे, दृकश्राव्य माध्यमे हे प्रकार पडतात.

या प्रकारामध्ये नव इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमाची आणि सामाजिक माध्यमाची भर पडलेली आहे. नव इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये उपग्रह, संगणकप्रणाली इंटरनेट इ. चा समावेश होतो. सामाजिक माध्यमांमध्ये (सोशल मिडिया) मध्ये वेगवेगळ्या ॲप्सचा अंतर्भाव होतो.

नभोवाणी व दूरचित्रवाणी हा दृकश्राव्य माध्यमे समाविष्ट केली जातात. तसेच पारंपारिक लोककलांचा विकसनशील राष्ट्रातील समाज जीवनावर अजूनही पगडा असल्यामुळे ही मौखिक व कलात्मक माध्यमे सुद्धा ग्रामीण व आदिवासी तसेच डोंगराळ, वनवासी भागात अद्यापही प्रभावशाली आहेत.'' [१६] याचा अर्थ डॉ.वि.ल.धारुरकर यांच्या मते माध्यमाचे, दृकश्राव्य माध्यमे, मौखिक माध्यमे व कलात्मक माध्यमे इ. प्रकार पडतात. तसेच सर्वच माध्यमे कमी अधिक प्रमाणात प्रभावशाली आहेत.

**मुद्रित प्रसारमाध्यम :**

वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके, ग्रंथ, नियतकालिके इ. समावेश होतो. वृत्तपत्रे, मासिक इ. मुद्रित माध्यमे घटना, बातम्या, घडामोडीमध्ये माहितीच्या प्रसारणास अधिक वेळ लागतो. माहिती पोहचवण्याची गती खूप कमी असते. मुद्रित माध्यमामध्ये प्रकाशित झालेली माहिती, घटना, ज्ञान खूप दिवसांसाठी टिकून राहते.

**इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमेः**

नभोवाणी, दूरचित्रवाणी, चित्रपट इ. श्राव्य व दृकश्राव्य मुद्रित माध्यमांचा इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमामध्ये समावेश होतो.

**नभोवाणी (आकाशवाणी) :**

हे श्राव्य माध्यम आहे. ''भारतात नभोवाणी प्रसार माध्यमाचा आरंभ १९२६ मध्ये झाला. नभोवाणीचे नंतर आकाशवाणी असे नामकरण झाले. त्याचे माध्यम 'रेडिओ' उपकरण आहे.'' [१७] यावरुन भारतामध्ये आकाशवाणी प्रसारण सन.१९२६ साली सुरु झाले. सुरुवातीस नभोवाणी व त्यानंतर नभोवाणीचे आकाशवाणी हे नामकरण झाले. श्राव्य प्रसार माध्यमे असल्यामुळे संदेशाचे प्रसारण अगदी सोप्या पद्धतीने आकाशवाणीद्वारे करीता येते. आकाशवाणी या श्राव्य माध्यमांद्वारे निरक्षर, अडाणी असलेल्या व्यक्तीपर्यंत माहिती, ज्ञान, घटना अगदी सहजतेने पोहचवता येतात. या माध्यमातील संदेश श्रोत्यापर्यंत पोहचवण्यासाठी उपग्रहाची मदत घ्यावी लागते.

'' वार्ता, विचार, संगीत, गायन, विनोद,क्रीडा, बालयुवक व कृषीविषयक कार्यक्रमांची विविधता यामुळे नभोवाणी माध्यम घराघरापर्यंत पोहोचले आहे. दिवसभरापैकी प्रदीर्घ काळात या माध्यमाची निरंतर सेवा चालू असते. इतर माध्यमापेक्षा नभोवाणीचे वैशिष्ट्ये म्हणजे हे माध्यम लोकांना सहजपणे सेवा देणारे आहे. त्यामुळे त्याला 'सोबत माध्यम' म्हटले जाते.'' [१८] याचा अर्थ विविध समाजोपयोगी कार्यक्रमामुळे नाभोवाणी लोकांच्या आवडीचे प्रसारमाध्यम बनले. त्याबरोबरच हे माध्यम सहज उपलब्ध होत असल्यामुळे यास 'सोबत माध्यम' असेही म्हटले जाते. रेडियोच्या माध्यमातून नभोवाणी शेतकरी, शाळा, विविध कार्यालये इ. ठिकाणी आपले कार्यक्रम प्रसारित करीत आहे.

आजअखेर नाशिक विभागात आकाशवाणी व एफ.एम. माध्यमाचे अहमदनगर, नाशिक, धुळे, जळगाव इ. ठिकाणाहून प्रसारण चालू आहे. ''

लहान मुलांचे कार्यक्रम यात ५ ते ७ वर्षाचा वयोगट आणि ७ ते १४ वर्षे हा वयोगट या दोन्ही गटासाठी वेगवेगळे विषय हाताळले जातात.'' [१९] याचा अर्थ शेतकरी, युवक यांच्याबरोबरच बालकांसाठी व मुलांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन आकाशवाणी मार्फत केले जाते. यामुळे सर्वच प्रकारच्या श्रोत्यांचा आकाशवाणी हे श्राव्य माध्यमाने विचार केलेला दिसतो हे स्पष्ट होते.

**दूरचित्रवाणी माध्यम :**

हे दृकश्राव्य प्रसारमाध्यम असून श्रोत्यांना तासन्तास खिळवून ठेवते. ''जनमाध्यमांच्या इतर प्रकारांप्रमाणेच दूरचित्रवाणी हे माध्यम त्याच्या दृकश्राव्य शक्तीमुळे सर्वांच्या पुढे आहे. लोकसंज्ञापनात आधुनिक युगात हे सर्वात शक्तीशाली माध्यम म्हणून उदयास आले आहे.'' [२०] याचा अर्थ सर्व प्रकारच्या माध्यमामध्ये दृकश्राव्य माध्यम हे शक्तीशाली माध्यम आहे. जगभरात ठिकठिकाणी घडणाऱ्या घटना, प्रसंग, कार्यक्रम थेट घरबसल्या दूरचित्रवाणीद्वारे आपण पाहू शकतो. जगभरातील लाखो प्रेक्षक एकाच वेळी पाहू शकतात. ''भारत सरकारच्या १९९८ च्या एका पाहणी अहवालानुसार देशातील ७० टक्के प्रदेशात आणि ८७ टक्के लोकसंख्येपर्यंत दुरदर्शनचे कार्यक्रम पोचतात.'' [२१] याचा अर्थ तत्कालिन लोकसंख्येचा विचार केला असता जवळपास तीस कोटी लोक दुरदर्शनचे कार्यक्रम पाहतात. यावरुन दुरदर्शनची पोहोच खूप मोठी असल्याचे स्पष्ट होते.

दुरदर्शनच्या माध्यमातून वेगवेगळे कार्यक्रम, बातम्या, मालिका, चित्रपट लोकांना पाहता येतात. यामध्ये लहान बालकांचे, मुलांचे, शेतकऱ्यांचे, महिलांचे, कर्मचाऱ्यांचे कार्यक्रम असतात.

आजअखेर दुरदर्शनबरोबर अनेक उपग्रह वाहिन्या भारतासह महाराष्ट्रात कार्यरत आहेत. यामध्ये बी.सी.सी., स्टार न्यूज इ. वृत्तवाहिन्या, सोनी, स्टारप्लस, स्टार प्रवाह इ. करमणूक प्रधान वाहिन्या, स्टार स्पोर्ट्स, डीडी स्पोर्टस इ. क्रिडाविषयक वाहिन्या, एम टीव्ही, संगीत मराठी, म्युझिक एशिया इ. संगीत विषयक वाहिन्या इ. अनेक प्रकारच्या वाहिन्या माहिती प्रसारणासह करमणूक, संगीत, क्रिडा विषयक प्रसारण करतात.

**चित्रपट :**

आकाशवाणी, दुरचित्रवाणी इ. श्राव्य व दृकश्राव्य प्रसारमाध्यमांबरोबरच चित्रपट हे दृकश्राव्य माध्यम लोकप्रिय आहे. समाजासाठी समाजातील सर्व घटकांना चित्रपटाच्या माध्यमातून संदेश दिला जातो. चित्रटामध्ये माहितीपट, संशोधनपर चित्रपट, प्रेरणादायी चित्रपट, करमणूक प्रधान चित्रपट इ.चा समावेश होतो.

**पारंपारिक लोकमाध्यमे :**

भारत हा हजारो वर्षांची सांस्कृतिक परंपरा असलेला देश आहे. या देशामध्ये पारंपारिक लोक माध्यमातून संदेशाचे वहन होते. कीर्तन, लोकनाट्य, लोकगीते, तमाशा, बहुरुपी इ. अनेक प्रकारच्या लोकमाध्यमांचा समावेश पारंपारिक लोक माध्यमांमध्ये होतो.

**इंटरनेट :**

इंटरनेट हे माहिती पाठवण्याचे व माहिती शोधण्याचे अथवा माहिती मिळवण्याचे प्रभावी नव इलेक्ट्रॉनिक माध्यम आहे. आज इंटरनेटचा वापर करुन जगभरातील कोणतीही माहिती सहज उपलब्ध करु शकतो. '' ऑनलाईन दैनिके म्हणजे सदैव इंटरनेटवर उपलब्ध असलेली. ऑनलाईन दैनिकाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या दैनिकात नवनवीन माहिती अपडेट करता येते.'' [२२] याचा अर्थ आता ऑनलाईन वृत्तपत्रे ही मुद्रित माध्यमांसाठी पर्याय म्हणून उपलब्ध आहेत.

**सामाजिक माध्यमे :**

यास सोशियल मिडिया असेही म्हटले जाते. फेसबुक, व्हॉटस् ॲप, हाईक इ. प्रसारमाध्यमे प्रत्येक  व्यक्ती वापरु शकतो. घटना, माहिती, ज्ञान, महत्त्वाच्या बाबी, आदेश सहजपणे पाठवणे व प्राप्त करण्यासाठी आज सामाजिक माध्यमांचा वापर होतो. समाजातील कोणत्याही नागरिकास वापर करता येण्यासारखे हे सामाजिक माध्यम आहे.

## ७. पुर्वकालीन भारतीय प्रसारमाध्यमः

मानवी जीवन वेगवेगळ्या घटकांवर अवलंबून असते. मानवाच्या मुलभूत गरजा अन्न, निवारा व वस्त्र आहेत. मुलभूत गरजांशिवाय मानव जगू शकत नाही. मानवाच्या जगण्यासाठी सर्वप्रथम अन्नाची गरज आहे. ''(अश्मयुगातील) मानव फळे आणिकंदमुळे खात असे. जनावरांचे कच्चे मांस खात असे '' [२३] यावरुन अश्मयुगातील माणसाचे अन्न आणि आजच्या युगातील माणसाचे अन्न यात प्रचंड मोठा बदल झाला आहे. या प्रमाणेच वस्त्र व निवारा या मुलभूत गरजांबाबतीत मानवाने खूप मोठी प्रगती केली केली आहे. अश्मयुगापासून तंत्रज्ञानाच्या युगापर्यंत मानवाने आपल्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यावर भर दिला.

मानवाने स्वतःचा विकास करण्याचा प्रयत्न केला. अश्मयुगातील माणूस गुहेमध्ये राहत होता. गुहेत राहणारा माणूस 'अन्न' ही गरज पूर्ण करण्यासाठी नदीकाठी आला. ''शेतीमुळे माणसाच्या राहण्याच्या पद्धतीत खूप बदल घडून आला. '' [२४] यावरुन भटकंती करणारा माणूस नदीकाठच्या शेतीच्या शोधामुळे स्थिरावला असे सिद्ध होते. शेतीमुळे आदीमानवाच्या जीवनाला स्थिर स्वरुप प्राप्त झाल्यानंतर मानवाचा विकास होऊ लागला. आदिमानव स्थिरावल्यानंतर एक एक शोध लागत गेला. शोधामुळे मानवाची प्रगती होत गेली. मानवाने आपल्या जवळचे ज्ञान दुसऱ्याला देण्याचा सदैव प्रयत्न केला. मानवाने पुर्वीपासूनच आपल्या जवळचे ज्ञान, माहिती, अनुभवाचे आदान प्रदान केल्याचे आढळते.

मानवी विकासात संवाद गरजेचा आहे. संवादाशिवाय मानवाला प्रगती साधने अशक्य आहे. संवाद हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. संवादाची प्रक्रिया दुहेरी प्रक्रिया आहे. या पक्रियेत संप्रेषक, श्रोता, संदेश, माध्यम,प्रतिक्रिया या घटकांचा समावेश होतो.

माध्यम हा संवादाचा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. संवादातील संदेशाची देवाण घेवाण ही माध्यमांद्वारे पार पडते. माध्यमाचे पारंपारिक प्रसारमाध्यमे, मुद्रित माध्यमे, दृकश्राव्य माध्यमे इ. प्रकार असून या माध्यमांद्वारे संदेशाचे वहन केले जाते.

मुद्रित माध्यमांमुळे संवादाला गती प्राप्त झाली. संदेशाचे वहन अनंत काळ व अचुक पद्धतीने होऊ लागले. मुद्रितप्रसार माध्यमांमध्ये वर्तमानपत्रे, पाक्षिक, मासिक, ग्रंथ इ. विविध साधनांचा अंतर्भाव होतो.

भारतात वृत्तपत्रांचा प्रारंभ पाश्चिमात्यांच्या आगमनानंतर झाला. ''हिंदुस्थानात मुद्रणास सुरुवात झाली ती १५५६ मध्ये. ख्रिस्ती धर्मविषयक वाङ् मय मुद्रित करण्यासाठी आबिसीनियातील धर्मोपदेशकांच्या खास मागणीवरुन पोर्तुगालमधून एक छापखाना पाठविण्यात आला होता. ''[२५] यावरुन भारतातील मुद्रणकलेची सुरुवात धार्मिक हेतूने झाली असे स्पष्ट होते. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर असणाऱ्या गोव्यामध्ये मुद्रणास प्रारंभ झाला. मात्र मुद्रणकलेची खरी प्रगती भारताच्या पूर्व किनाऱ्यावर झाली. यानंतर संपूर्ण देशभरात मुद्रणकलेचा प्रसार झाला.

भारतात वृत्तपत्राचे आगमन होण्यापूर्वी पारंपारिक माध्यमे अस्तित्वात होती. पारंपारिक प्रसार माध्यमांच्या आधारे संदेशाचे वहन होत असे. प्रसाराचे वेगवेगळे साधने वापरुन संवादाची प्रक्रिया पूर्ण होत होती.

माणसाच्या उन्नतीसाठी संवाद हा महत्त्वपूर्ण आहे. ''समाजाचं संवाद कौशल्य जेवढं अधिक प्रभावी तेवढा तो समाज अधिक सुसंपन्न असं गणित आजच्या काळात मांडलं जातं.'' [२६] याचा अर्थ प्रभावी संवाद कौशल्य असणाऱ्या समाजाची प्रगती अधिक वेगाने होवून समाज विविध अंगांनी संपन्न होतो. पूर्वीपासून ज्या समाजात संवाद प्रभावी होता, तो समाज सुसंपन्न झाला हे स्पष्ट होते.

पूर्वीपासूनमानव संवाद साधत आला आहे. ''कला, स्थापत्य, वाङ्मय, लोकसाहित्य या सर्वच क्षेत्रातजनसंवादाची बीजे आढळतात. '' [२७] यावरुन कला, वाङ्मय, लोकसाहित्य या मानवी जीवनाला संपन्न करणाऱ्या क्षेत्रातही संवादाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. संवादाशिवाय कला, स्थापत्य,वाङ्मय इ. क्षेत्र अपूर्ण आहेत.

मानव हा अविकसीत अवस्थेमध्ये असल्यापासून माध्यम उपयोग आणीत होता. ''ज्या काळी भाव भावनांना व्यक्त करण्याचं अन्य कोणतच माध्यम मानवाला उपलब्ध नव्हते. त्या काळात त्यांना या देहबोली माध्यमाचा आधार घेऊन आपल्या भावनाच्या अभिव्यक्तीला प्रारंभ केलेला दिसतो'' [२८] याचा अर्थ भावभावना व्यक्त करण्यासाठी सर्वप्रथम मानवाने देहबोली या माध्यमाचा वापर केला. आजही हावभाव, हातवारे यांचा आधार घेवून देहबोलीच्या माध्यमातून वेगवेगळ्या भावना व्यक्त केल्या जातात. अशाब्दिक स्वरुपाचे हे माध्यम जागतिक स्वरुपाचे आहे.

ज्यावेळी मानव भाषेला लिपीमध्ये मांडू शकत नव्हता त्या काळी मानवाने चित्रांचा आधार घेतला. आदिमानवाने चित्रांच्या साह्याने आपल्या भावना,विचार व्यक्त केल्याचे आढळते. भारतातील अनेक गुहामधील मानवाने काढलेली चित्रे आजही पहायला मिळतात.

''प्राचीन काळात आपल्या भावभावना व्यक्त करण्यासाठी मानव मााध्यमांचा वापर करीत होता. आणि त्यापैकी एक म्हणून 'चित्रलिपी' माध्यमाचा विचार करावाच लागतो. '' [२९] याचा अर्थ चित्रलिपी हे प्राचीन काळात भावभावना व्यक्त करण्यासाठी वापरलेले महत्त्वाचे साधन आहे. जगभरातील अनेक देशामधील गुहांमध्ये चित्रलिपी आढळून येते. प्राचीन मानवाने गुहे बरोबरच मातीची भांडे, लाकडाच्या फळ्या, प्राण्यांची कातडी, हस्तीदंत अशा वस्तुंचा वापर चित्रलिपीसाठी केला आहे. आजच्या आधुनिक युगातही आपले विचार, आज्ञा, भावभावना व्यक्त करण्यासाठी चित्रांचा वापर केला जातो.

भाषेला दृश्य स्वरुप देण्यासाठी लिपीची आवश्यकता असते. लिपी ही वेगवेगळ्या आवाजाला वेगवेगळे चिन्ह वापरुन दृश्य स्वरुप प्राप्त करुन देते. लिपीचा शोध लागल्यापासून भाषिक विकासास प्रचंड मोठी चालना मिळाली. लिपीच्या माध्यमातून भाषामधील अक्षरे लिहीण्याचा यशस्वी प्रयोग झाला.

भारतात कागदाच्या शोधापूर्वी शिलालेख, ताम्रपट, भुर्जपत्रे या प्रसारमाध्यमांचा वापर केलेला अनेक ठिकाणी आढळतो. भावना, ज्ञान, आज्ञा, सन्मान इ. गोष्टींचा प्रसार करण्यासाठी प्राचीन काळामध्ये शिलालेख, ताम्रपट, भुर्जपत्रे वापरण्यात येत होती.

भारताला लोककलेची व लोकनाट्याची परंपरा आहे. ''लोककलांमध्ये जो लोकनाट्याचा भाग आहे तो प्राचीन प्रसार माध्यम म्हणूनच वापरला जात होता. त्यामधून

लोकांचे मनोरंजन व प्रबोधन होत होते. उदा.जागरण, गोंधळ, दशावतार, पंचमी, तमाशा इ. विधिनाट्यांचा आणि लोकनाट्यांचा विचार केला तर धार्मिक विधी, मनोरंजन यांच्याबरोबरच प्रबोधन आणि प्रसार यांचे काम केलेले दिसते'' [३०] यावरुन पारंपारिक माध्यमे ही धार्मिक विधी, मनोरंजनासह ज्ञान, माहिती इ. चा प्रसार करीत होती. यातून समाजाचे प्रबोधन करुन आदर्श समाजाची निर्मिती केली जात असे.

आज अस्तित्वात असणाऱ्या आधुनिक प्रसारमाध्यमांपूर्वी पारंपारिक माध्यमांचा संदेशवहनासाठी वापर होतो. आजही शासकीय योजनांचा प्रचार व प्रसारासाठी पारंपारिक माध्यमाचा वापर केला जातो. ''देवळात होणारं किर्तन, उघड्या पठारावर होणारा पोवाड्यांचा–शाहिरीचा, लोकनाट्याचा कार्यक्रम, घरोघरी जाऊन होणारा बहुरुप्यांचा, वासुदेवाचे नमन, गोंधळ्याचा गोंधळ, सण–उत्सव, प्रवचन, किर्तन हे सारे प्रकार त्या काळामधले समाज प्रबोधनाची मोठमोठी व्यासपीठं होती असं म्हटलं तर त्यात काही वावगं वाटण्याचं कारण नाही. कारण याच लोककलाकारांनी या समाजाला शिकवण्याचं, शहाणं करुन सोडण्याचं व्रत अंगिकारलेलं होतं. '' [३१] याचा अर्थ कीर्तन, बहुरुपी, वासुदेव, गोंधळ इ.मधील लोककलाकारांनी समाजाला विचार देण्याचं काम केले. समाजाला आदर्श, उत्तम गुण देण्यासाठी हे लोककलाकार आपली कला अखंडपणे सादर करीत राहीले. समाजालाशिकवून सुसंस्कारीत करणे हे कर्तव्य लोककलाकाराने काटेकोरपणे निभावलेले दिसून येते.

किर्तन हे माध्यम पूर्वीपासून वापरले जाते. कीर्तनाच्या माध्यमातून विचार, समाजसुधारणा, धर्म सुधारणा, ज्ञान, माहिती लोकांपर्यंत पोहचवली जाते. ''कीर्तनाचा मुख्य प्रकार हा नारदीय किर्तन हाच असला तरी वारकरी संप्रदायाचं कीर्तन तसेच रामदासी पद्धतीचं किर्तन असे किर्तन या प्रभावी प्रसार माध्यमाचे अन्यही प्रकार आहेत. ''[३२]

यावरुन भारतीय किर्तन, वारकरी किर्तन, रामदासी किर्तन यामध्ये महाराष्ट्राची किर्तन परंपरा विभागली आहे. किर्तन फार पूर्वीपासून वापरण्यात येणारे प्रभावी माध्यम आहे. किर्तनाचा वापर हा अनेक वर्षांपासून होत आहे. किर्तनाचे वेगवेगळे प्रकार संस्काराचे काम करीत असल्याचे दिसून येत आहे. ''महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात किर्तन हे लोकमाध्यम अतिशय प्रतिष्ठीत आणि प्रभावी मानले जाते'' [३३] यावरुन किर्तन हे लोकमाध्यम असल्याचे सिद्ध होते, तसेच महाराष्ट्रात कीर्तनाला प्रतिष्ठा मिळालेली आहे हे सुद्धा सिद्ध होते. देवर्षी हे

'आद्य किर्तनकार' मानले जातात. अध्यात्माच्या आधारावर चांगल्या विचाराची रुझवणं कीर्तनाने लोकांच्या मनात केली. छ.शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेमध्य संत तुकारामांनी केलेल्या कीर्तनाचा फायदा झाला. तुकाराम महाराजांनी किर्तनाच्या माध्यमातून केलेल्या जागृतीमुळे महाराष्ट्रातील लोक स्वराज्य स्थापनेच्या संकल्पनेकडे वळले. यावरुन पूर्वीच्या काळापासून कीर्तन हे प्रभावी प्रसार माध्यम असल्याचे सिद्ध होते.

शाहिरी अथवा पोवाडा लोककलामधील महत्त्वाचा प्रसार माध्यमांचा प्रकार आहे. ''मन चेतवण्यासाठी शाहिरी हे एक उत्तम प्रकारचं जनसंपर्क माध्यम आहे'' [३४] यावरुन माणसाला चांगल्या कामासाठी शाहिरीचा वापर करुन प्रेरीत केले जात होते हे कळते. माणसाचे मन चेतवण्यासाठी पोवाडा गायला जातो. पोवाडा ऐकूण माणसाच्या मनात विरश्रीचा संचार होतो. छ.शिवाजी महाराजांच्या काळातही शाहिरांनी मानसांच्या मनात नवचैतन्य संचारीले. फार पूर्वीपासून शाहिरांनी कवनांमधून समाजप्रबोधन, माहिती, समाजसुधारणा करण्याचा प्रयत्न केला. भारतीयांच्या मनात राष्ट्रप्रेम रुजविण्याचे काम अनेक शाहिरांनी पोवाड्यातून केले होते. आजही लोककल्याणकारी योजनांचा प्रसार करण्यासाठी पोवाड्यांचा आधार घेण्यात येतो. यावरुन आजही पोवाडा उपयोगी आहे.

पूर्वीपासून तमाशा, लावणी, वग इ. लोककला प्रकार चालतात. तमाशा ग्रामीण जीवनाशी अधिक निगडीत असतो. यामधील कथानक, भाषा, वेशभूषा, संवाद हे जनसामान्यांच्या मनाला भिडणारे असतात. तमाशाच्या माध्यमातून राजकारण, समाजकारण, धर्मसुधारणा इ. विविध विषयांवर टिका–टिप्पणी केली जाते. यामुळे परिणामकारक विचारांची देवाणघेवाण होते. म्हणून प्रसार माध्यमांच्या यादीत तमाशाला मानाचे स्थान आहे.

पारंपरिक माध्यमातील अनेक प्रकार शेवटची घटका मोजत आहेत. ज्या काळी मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा मागमूस नव्हता. त्या काळी पारंपारिक माध्यमांनी मानवी जीवनात उपयुक्तता सिद्ध केली.

कागदाचा शोध लागल्यानंतर लिखीत प्रसारमाध्यमे अस्तित्वात आली. डॉ.वि.ल. धारुरकर हे पोवाडे, बखरी, ऐतिहासिक पत्रे यांना वृत्तपत्राचे पुर्वज मानतात. ''मध्ययुगीन महाराष्ट्रामध्ये बखरी, करिने लिहून; तसेच ऐतिहासिक पत्रे पाठवून विचार प्रसार केला जात असे'' [३५] याचा अर्थ मध्ययुगीन काळापासून महाराष्ट्रात विचार प्रसार करण्यासाठी बखरी,

ऐतिहासिक पत्रे, करिने यांचा वापर करण्यात येत होता. यानंतर लिखीत प्रसार माध्यमांचा वापर प्रभावीपणे करण्यात आला. ''महानुभव पंथाचे आद्य प्रवर्तक श्री चक्रधर स्वामी यांच्या चमत्काराचे त्यांचे शिष्य म्हाइंभट्ट यांनी केलेले संपादन 'लीळाचरित्र' हे मराठीतील पहिले गद्य साहित्य होय. संतुलित, वस्तुनिष्ठ व प्रतिक्रियाविरहित अशा स्वरुपाचे वृत्तांत लेखन पत्रकारितेसारखे होय''[३७] यावरुन मराठीचे पहिले गद्य 'लीळाचरित्र' असल्याचे सिद्ध होते. श्रीचक्रधर स्वामींनी महानुभव पंथाची स्थापना करुन भेदाभेद अमंगळ ठरविले. लीळाचरित्र महानुभाव पंथाच्या ग्रंथाचे लेखन हे पत्रकारितेच्या अंगाने झालेले आहे. गद्य लेखन हे प्रभावी व अनंतकाळ टिकणारे प्रसारमाध्यम आहे.

कविराज मुकूंदराज यांनी 'विवेकसिंधु' हा मराठी भाषेतील काव्यग्रंथ रचला. संत ज्ञानेश्वरांनी संस्कृतमधील ज्ञान प्राकृत भाषेत 'ज्ञानेश्वरी'द्वारे लोकांसमोर मांडले. लिखीत माध्यमांनी ज्ञान, माहिती इ. चा प्रसार प्रभावीपणे केला. बखर हा पूर्वीच्या काळातील प्रसार माध्यमाचा महत्त्वाचा प्रकार होता. ''भावना, विचार आणि हुबेहुब वर्णन करण्याची बखरकारांची परंपरा ही पत्रकारितेस पोषक ठरली'' [३७] याचा अर्थ बखरकार हे लोकपत्रकार म्हणून काम करीत असत. त्यांचे लिखान पत्रकारितेस पोषक ठरले असे आढळून येते. पूर्वीचे राजे आपले पराक्रम, लोकपयोगी निर्णय यांचे लिखान करण्याची आज्ञा एखाद्या व्यक्तीस करीत होते. हा व्यक्ती स्वतःच्या स्मरणशक्तीस ताण देवून गतकालीन इतिहास स्वतःच्या लेखणीने मांडण्याचा प्रयत्न करीत असे. बखरीची भाषा ही अलंकारिक, वर्णनात्मक असल्याचे आढळते. मल्हार रामराव चिटणीस यांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, मराठा साम्राज्याची छोटी बखर, शिवदिग्विजय इ. बखरी, बखरकारांची शैली, भाषा काळानुरुप बदलली हे स्पष्ट होते

मुघल राज्यात बातमी लिहीण्यासाठी प्रत्येक सुभ्यासाठी वाकनीसाची नेमणूक असे. वाकनीसाने लिहीलेले सुभ्याचे बातमीपत्र हे त्या काळचे प्रसार माध्यम होते. शिवकालीन पत्रव्यवहार हा माहिती पाठवण्याचा सर्वात रुढ प्रकार होता. शिवकालीन, पेशवेकालीन, इंग्रजकालीन ऐतिहासिक पत्रे उपलब्ध आहेत. ही ऐतिहासिक पत्रे त्या काळी माहितीचा प्रसार करत होती. ऐतिहासिक पत्रे पारंपारिक माध्यमांचा महत्त्वाचा प्रकार आहे. या पत्राच्या अभ्यासावरुन पत्राची भाषाशैली, लेखनशैली, विषयाची व्यापकता काळानुसार बदलत जाते हे स्पष्ट होते.

शिवकालीन पत्रांचा अभ्यास करणारे डॉ.सुधाकर पवार यांनी 'शिवकालीन पत्राची भाषा मध्ययुगीन विचार प्रसारणाचे जीवंत माध्यम होय' असे म्हटले आहे. वेगवेगळ्या पत्राने त्या काळात बातम्या, घटना, विचार पुरवण्याचे काम केले. यावरुन वेगवेगळ्या कालखंडातील पत्रे तत्कालीनमाध्यमे होती.वृत्तपत्राची सुरुवात होण्यापूर्वी अनेक प्रकारच्या माध्यमातून संदेशाचे वहन केले जात होते. हळूहळू माध्यमांचे स्वरुप बदलत गेले. अनेक शोध लागले. मानवाच्या जीवनात अनेक बदल झाले. मानव प्रगत झाला. गुटेनबर्गच्या शोधाने वृत्तपत्राचा नवा प्रकार जन्माला आला. या शोधामुळे पूर्वीच्या माध्यमाची पिछेहाट होवू लागली. वृत्तपत्रांनी विचार, ज्ञान, माहितीचा इ. प्रसार–प्रचार प्रभावीपणे केला. यानंतर आकाशवाणी, दुरचित्रवाणी, इंटरनेटचा शोध लागला. यामुळे इलेक्ट्रॉनिक माध्यमांची नवी भर प्रसार माध्यमात पडली.

काळानुरुप वेगवेगळे शोध मानवाने लावले. या शोधानुसार माध्यमाचे स्वरुप व कार्य बदलत गेल्याचे आढळून येते.

## ८. नाशिक विभाग : दृष्टीक्षेप

महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये अनेक टप्पे आहेत. यामध्ये मुंबई इलाखा, मुंबई प्रांत, मुंबई राज्य, द्विभाषिक मुंबई राज्याची निर्मिती त्यानंतर महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली.

''निर्मितीच्या वेळी महाराष्ट्र हे १४ वे राज्य होते. त्यावेळी २६ जिल्हे व ४ प्रशासकीय विभाग व २३५ तालुके होते.''[३८]यावरुन सुरुवातीस राज्यात चार प्रशासकीय विभाग होते हे स्पष्ट होते. यामध्ये कोकण विभाग, पुणे विभाग, औरंगाबाद विभाग, नागपूर विभाग या चार विभागांचा अंतर्भाव होता. त्यावेळी पुणे विभागात नाशिकचा समावेश होता.

आज महाराष्ट्र राज्यात ३६ जिल्हे व ६ प्रशासकीय विभाग आहेत. यामध्ये कोकण विभाग, पुणे विभाग, नाशिक विभाग, औरंगाबाद विभाग, अमरावती विभाग, आणि नागपूर विभाग या सहा विभागांचा समावेश होतो.

यामध्ये नाशिक, अहमदनगर, धुळे, जळगाव, नंदुरबार या पाच जिल्ह्यांचा नाशिक विभागात अंतर्भाव होतो. नाशिक विभागातील जिल्हानिहाय तालुक्यांची संख्या पुढील प्रमाणे.

**अहमदनगर :** १. अहमदनगर, २. संगमनेर, ३. पारनेर, ४. जामखेड, ५. शेवगाव, ६. श्रीरामपुर, ७. नेवासे, ८. कर्जत, ९.अकोले, १०. पाथर्डी, ११. कोपरगाव, १२. राहुरी, १३. श्रीगोंदे, १४. राहता.

**नाशिक :** १. नाशिक, २. कळवण, ३. सटाणा, ४. सुरगाणा, ५. मालेगाव, ६. दिंडोरी, ७. पेठ, ८. निफाड, ९. चांदवड, १०.येवला, ११. नांदगाव, १२. सिन्नर, १३. इगतपुरी, १४. देवळा, १५. त्र्यंबकेश्वर.

**जळगाव :** १. जळगाव, २. पारोळा, ३. अंमळनेर, ४. चोपडा, ५. यावल, ६. रावेर, ७. चाळीसगाव, ८.एरंडोल, ९. भुसावळ, १०. मुक्ताईनक्षर, ११. पाचोरा, १२. जामनेर,१३. बोदवड, १४. धरणगाव, १५.भडगाव.

**धुळे :** १. धुळे, २. शिंदखेडा, ३. शिरपुर, ४. साक्री.

**नंदुरबार :** १. नंदूरबार, २. अक्कलकुवा, ३. धडगाव,४. शहादा, ५. नवापूर, ६. तळोदा.

विभागात एकूण चोपन्न तालुके आहेत.

''भौगोलिक परिस्थितीचा मानवी जीवनावर होणारा परिणाम हा सातत्याने राजकीय आणि आर्थिक– समाजजीवनावर विशेष प्रभाव टाकत असतो.'' [३९] याचा अर्थ मानवाच्या जीवनावर भौगोलिक परिस्थितीचा परिणाम होतो. म्हणून नाशिक विभागाच्या भौगोलिक वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**नाशिक विभागातील प्राकृतिक रचनेची वैशिष्ट्ये**

''राज्याच्या प्राकृतिक रचनेनुसार राज्याचे तीन प्रमुख विभाग पडतात. (१) कोकण किनारपट्टी. (२) सह्याद्री किंवा पश्चिम पडतात. (३) महाराष्ट्र पठार.'' [४०]याचा अर्थ तीन प्रकारच्या प्राकृतिक रचनेने महाराष्ट्र बनलेला आहे. नाशिक विभाग हा कोकण किनारपट्टी पासून खूप दूर आहे. याच्या प्राकृतिक रचनेत सह्याद्री म्हणजे पश्चिम घाट आणि महाराष्ट्र पठारांचा समावेश होतो.

सह्याद्री पर्वतरांग ही नाशिक विभागाच्या पश्चिम दिशेस उत्तर–दक्षिण दिशेमध्ये पसरलेली आहे. सह्याद्री पर्वत हा नाशिक व नगर जिल्ह्याच्या प्राकृतिक रचनेत महत्त्वाचे स्थान बजावतो. सह्याद्री पर्वतातील सर्वाधिक उंचीचे शिखर कळसुबाई हे अहमदनगर जिल्ह्यात आहे.

त्याबरोबरच राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे उंच शिखर 'साल्हेर'हे नाशिक जिल्ह्यात आहे. ''सातपुडा पर्वतरांग आहे. तिचा पश्चिमेकडील भाग नंदूरबार जिल्ह्यात येतो. यात तोरणमाळ पठार व अस्तंभा डोंगर हे जास्त उंचीचे भाग आहेत.'' [४१] याचा अर्थ नंदुरबार जिल्ह्याचा उत्तर भाग सातपुडा पर्वत रांगेने व्यापलेला आहे. तसेच नंदुरबार जिल्ह्यात सातपुडा पर्वत रांगेतील अस्तंभा व तोरणमाळ ही उंच शिखरे आहेत. अस्तंभा डोंराची उंची १३२५ मी. आहे. नंदुरबार जिल्ह्याच्या दक्षिण भागामध्ये सह्याद्री पवर्ताचा भाग येतो. ''सह्याद्रीच्या पूर्वेला असलेल्या विस्तारलेल्या पठारी प्रदेशाला महाराष्ट्राचा पठारी प्रदेश म्हणतात.''[४२] पठार हा सह्याद्री पर्वताच्या पूर्व बाजूस पसरलेला आहे.'' सह्याद्री पर्वताच्या पूर्वेकडील प्रदेश हा दख्खनच्या पठाराचा भाग असून त्याला महाराष्ट्र पठार असे म्हणतात. पठाराची सर्वसाधारण उंची ६०० मी. आहे. या पठारावर डोंगररांगा आणि नद्यांची खोरी आहेत. सह्याद्री पर्वतातून निघालेल्या सातमाळा, अजिंठा, हरिश्चंद्र –बालाघाट व महादेव डोंगररांगाचा समावेश या पठारात होतो. '' [४३]याचा अर्थ महाराष्ट्र पठारावर डोंरगररांगा आणि नद्यांची खोरी आहेत. डोंगररांगामधील सातमाळा, हरिश्चंद्र या डोंगररांगाची सुरवात नाशिक जिल्ह्याच्या वायव्य भागातून होते. सातमाळ डोंगरराग ही नाशिक, नंदुरबार, धुळे इ. जिल्ह्यातून पूर्वेकडून यवतमाळ जिल्ह्यापर्यंत जाते.

हरिश्चंद्र – बालाघाट डोंगररांग ही अहमदनगर जिल्ह्यापासून लातूर जिल्ह्यापर्यंत पसरलेली आहे. हरिश्चंद्र बालाघाट डोंगररांगेमुळे गोदावरी व भिमा नदीचे खोरे वेगवेगळी झाले आहेत.

प्राकृतिक रचनेत सह्याद्री पर्वत, सातपुडा पर्वत, सातमाळा–अजिंठाचे डोंगर, हरिश्चंद्र – बालाघाटचे डोंगर इ.चा समावेश होतो.

**नाशिक विभागातील नद्यांची वैशिष्ट्ये :**

नाशिक विभागात विविध नद्यांची खोरे आहेत. काही नद्या या पूर्व वाहिनी तर काही नद्या पश्चिम वाहिनी आहेत. पश्चिम वाहिनी नद्या अरबी समुद्रास तर पूर्व वाहिनी नद्या बंगाल उपसागरास जावून मिळतात. नर्मदा, तापी, गोदावरी इ. प्रमुख नद्या नाशिक विभागातून वाहतात. नर्मदा व तापी या नद्या पश्चिम वाहिनी तर गोदावरी ही पूर्व वाहिनी नदी आहे.

''नर्मदा ही हिंदुस्थानातील सर्वात जास्त लांबीची पश्चिम वाहिनी नदी आहे. ही नदी विंध्य व सातपुडा पर्वताच्या दरम्यान असलेल्या खच दरीतून वाहते. '' [४४] यावरुन भारतातील सर्वात लांब असणारी पश्चिम वाहिनी नर्मदा नदी आहे. ''तापी ही इतर मोठ्या नद्यांच्या तुलनेने लहान असली तरी व्यापारीदृष्ट्या तिचे खानदेशातील महत्त्व मोठे आहे. ती पुर्व खानदेशातून वाहत जावून गुजरात–सुरत मार्गे शेवटी अरबी समुद्राला मिळते. ''[४५] याचा अर्थ तापी ही इतर नद्यांच्या तुलनेने लहान आहे मात्र तिचे महत्व खूप मोठे आहे. तापी नदीच्या पूर्णा, गिरणा, पांझरा या उपनद्या आहेत. धुळे जिल्ह्यात पांझरा, नाशिक जिलह्यातील गिरणा नद्या तापी नदीला जावून मिळतात. नंदूरबारमधील वाकी, गोमंती, शिवण या नद्याही तापी नदीलाच जावून मिळतात. तापी नदी व तिच्या उनपद्यांनी खानदेशातील जमीन सुपीक झाली आहे. तापी ही खानदेशातील सर्वात महत्वाची नदी आहे. '' गोदावरी ही भारतीय पठारांवरील सर्वात जास्त लांबीची नदी आहे. विस्ताराच्या दृष्टीने गंगा नदीच्या खोऱ्यानंतर गोदावरी नदीच्या खोऱ्याचा क्रमांक लागतो.'' [४६] यावरून भारतीय पठारावरील सर्वात जास्त लांबीच्या गोदावरी नदीचा उगम नाशिक विभागात होतो हे स्पष्ट होते. विस्ताराच्या दृष्टीने गंगा नदीच्या खोऱ्यानंतर क्रमांक येतो. गोदावरीचा उगम नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे गोदावरीचा उगम होतो. गोदावरीच्या खोऱ्यात अहमदनगर जिल्ह्याच्या उत्तर भागाचा व नाशिक जिल्ह्याच्या दक्षिण भागाचा समावेश होतो. गोदावरीच्या नाशिक जिल्ह्यातील दारणा, बाणगंगा, कादवा या उपनद्या आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरा व मुळा या गोदावरीच्या प्रमुख उपनद्या आहेत. भिमा नदीच्या कुकडी, मिना, घोड या उपनद्या अहमदनगरमध्ये आहेत.

नर्मदा, तापी, गोदावरी नद्यांच्या खोऱ्यामुळे नाशिक विभागास सुबत्ता आलेली आहे. नर्मदा, तापी, गोदावरी व त्यांच्या उपनद्या नाशिक विभागातील प्रमुख नद्या आहेत.

**हवामानाची वैशिष्ट्ये :**

हवेमध्ये होणाऱ्या बदलांचा अनेक वर्षे अभ्यास करून हवामान ठरवले जाते. हवामानाचा परिणाम हा त्या प्रदेशातील शेतीवर, व्यवसायावर, लोकजीवनावर होत असतो. नाशिक विभागातील हवामानामध्ये विभिन्नता आढळते, हे नाशिक विभागातील हवामानाचे वैशिष्ट्य आहे. ''खानदेशातील भू–प्रदेशाची समुद्रसपाटीपासून असलेली उंची ह्यातील तफावतीमुळे वेगवेगळ्या भागात वेगवेगळे हवामान आढळते'' [४७] यावरून विभागातील वेगवेगळ्या भागात भू–

प्रदेशाच्या उंचीनुसार हवामानात फरक आहे. ''जिल्ह्याचा (नाशिक) पश्चिम व मध्यभाग डोंगराळ आहे. यामुळे हवामान बहुतांशी थंड असते. विशेषतः इगतपुरी, सप्तशृंगी व त्र्यंबकेश्वर या ठिकाणाचे हवामान थंड आहे.'' [४८] यावरून सह्याद्री पर्वतरांगेत थंड हवामान आहे हे स्पष्ट होते. नाशिक जिल्ह्याचे हवामान सर्वसाधारण पणे उष्ण व कोरडे आहे. ''अहमदनगर जिल्ह्यातील हवामान प्रामुख्याने कोरडे व उत्साहजनक असते. अकोले तालूक्यातील पश्चिमेकडील भागात हवामान थंड असते.'' [४९] याचा अर्थ अहमदनगर जिल्ह्यातील हवामानातही विभिन्नता आहे. पश्चिमेकडील अकोले डोंगरपट्यात हवामान थंड व उर्वरित अहमदनगर जिल्ह्यात हवामान कोरडे आहे

**पर्जन्यमानाची वैशिष्ट्ये**

विभागातील विविध भागात पावसाच्या प्रमाणात विभिन्न आढळते. ''महाराष्ट्रातील प्रर्जन्याचे वितरण असमान आहे. तसेच प्रर्जन्य अनियमित पडतो'' [५०] याचा अर्थ विभागात पावसाचे वितरण हे असमान आहे. विभागातील सह्याद्रीच्या माथ्यावर सर्वाधिक पाऊस पडतो. सह्याद्रीकडून पूर्व दिशेस जाताना पावसाचे प्रमाण कमी होत जाते. ''अहमदनगर जिल्ह्याचे पर्जन्यमान अनिश्चित स्वरूपाचे असून पर्जन्याची वाटणी असमान आहे''[५१]याचा अर्थ अहमदनगर जिल्ह्यातील पर्जन्यमानात भिन्नता व अनिश्चितता आढळते. यावरून नाशिक विभागातील पर्जन्यमानात विभिन्नता आहे. नाशिक विभागात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे पर्जन्यमान असून त्यात निश्चितता नाही.

**व्यवसाय व उद्योगाची वैशिष्ट्ये :**

विभागात शेतीवर आधारित व्यवसाय आहेत. साखर उद्योग, कापड उद्योग, वाहन निर्मिती या सारखे उद्योग नाशिक विभागातील प्रमुख व्यवसाय आहेत. शेतीव्यवसाय, पशुपालन, मासेमारी, खाणकाम इ. अनेक व्यवसाय विभागात चालतात जिल्ह्यात ''ओझर येथे विमान तयार करण्याचा कारखाना, नाशिक रोड येथे चलनी नोटा छापण्याचा कारखाना तसेच नाशिकमध्ये रंग, नायलॉन, सुटकेस यंत्राचे सुटे भाग बनवणे असे अनेक उद्योग आहेत''[५२] यावरून नाशिक मध्ये वेगवेगळे उघोग असल्याचे स्पष्ट होते. ''नवापूर, शहादे, नंदूरबार येथे लाकूड कटाई केंद्र व डाळ गिरण्या आहेत. नंदूरबार येथे मिरची पावडर तयार केली जाते. तेल गिरण्या तसेच बहुतक ठिकाणी दुग्धव्यवसाय चालतो'' [५३] याचा अर्थ नंदूरबार मध्ये शेतीपुरक

उघोगाची संख्या जास्त आहे. धुळे जळगाव, अहमदनगर या ठिकाणीही साखर उघोग चालतो. तेलगिरण्या, सुतगिरण्या इ. उद्योगही विभागात चालतात. धुळे येथील शिरपूर येथे महाराष्ट्रातील पहिला सोने शुध्दीकरण कारखाना आहे. अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रात साखर उत्पादनात आघाडीवर आहे. नाशिक विभागात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे व्यवसाय व उद्योगधंदे चालू आहेत.

**वाहतुकीची वैशिष्ट्ये :**

''प्रवासी आणि माल एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी वाहुन नेणे म्हणजेच वाहतुक होय. आपल्या राज्यात रस्ते, लोहमार्ग, व जलमार्ग याद्वारे वाहतूक चालते. '' [५४] याचा अर्थ रस्ते, लोहमार्ग, हवाईमार्ग व जलमार्ग याच्याद्वारे वाहतुक चालते. नाशिक विभागात जलमार्ग उपलब्ध नाहीत तसेच हवाई मार्ग वाहतुकीच्या दृष्टीने सोयीचे नाहीत. वाहतुक प्रामुख्याने रस्त्याने चालते. नाशिक विभागामध्ये राज्यमहामार्ग, जिल्हा रस्ते इ. मार्ग आहेत.

नाशिक विभागातून मुंबई–आग्रा, हाजीरा – कोलकाता, पुणे–नाशिक, सोलापुर–धुळे, कल्याण–निर्मल, गंददेवी–चांदवड, निजामपुर–देडीपाड इ. राष्ट्रीय महामार्ग जातात. या राष्ट्रीय महामार्गामुळे नाशिक विभागातील वाहतुक गतिमान झालेली आहे. लोहमार्गाचे जाळे हे नाशिक विभागात चांगल्या प्रकारे आहे. सर्वच जिल्ह्यातून लोहमार्ग गेलेला आहे. मुंबई–दिल्ली, मुंबई–कोलकाता, भुसावळ–सुरत, दिल्ली–वास्को, इ. महत्त्वपूर्ण लोहमार्ग नाशिक विभागातून जातात. भुसावळ, जळगाव, मनमाड या ठिकाणी अनेक लोहमार्ग एकत्र आले आहेत. नाशिक विभागातील वाहतुक ही प्रामुख्याने रस्ते व लोहमार्ग याद्वारे चालते.

**प्रेक्षणिय ठिकाणेः**

नाशिक विभागात अनेक महत्त्वाची व प्रेक्षणीय ठिकाणे आहेत. नंदुरबारमधील तोरणमाळ थंड हवेचे ठिकाण प्रसिद्ध आहे. अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरा नदीवरील भंडारदरा या ठिकाणी असणारा रंधा धबधबा प्रेक्षणीय आहे. त्याबरोबर नाशिक विभागात पाल–यावलै, नानज, कळसुबाई–हरिश्चंद्रगड, नांदुर–मध्यमेश्वर, अनेर धरण, भोरघड, जायकवाडी इ. अभयारण्ये येतात. अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी, नेवासे, शनि शिंगणापुर, ओझर, सिद्धटेक हे धार्मिक स्थळे प्रसिद्ध आहेत. वणी, पंचवटी, त्र्यंबकेश्वर, ढेकू, चांदवड, इगतपुरी इ. ठिकाणी धार्मिक ठिकाणे नाशिक जिल्ह्यामध्ये आहेत. नंदुरबार जिल्ह्यामध्ये डामरखेडा, प्रकाशे,

सारंगखेडे, शनिमांड, शहादा ही धार्मिक स्थळे आहेत. जळगाव जिल्ह्यामध्ये अंमळनेर, कपिलेश्वर, चांगेव, पिंपरखेड, पद्मालय, मनुदेवी, शेंदुर्गा इ. धार्मिक ठिकाणे प्रसिद्ध आहेत. धुळे जिल्ह्यामध्ये पिंपळनेर, बीजासनदेवी, मुडावद, शिरपूर इ. धार्मिक स्थळे आहेत.

**लोकजीवनाची वैशिष्ट्ये :**

कोकण किनारपट्टी, सह्याद्री व महाराष्ट्र पठार अशी महाराष्ट्राची प्राकृतिक रचना आहे. प्राकृतिक रचनेचा परिणाम लोकजीवनावर झालेला आढळतो. ''महाराष्ट्रात विविध भागांत वेगवेगळी भौगोलिक परिस्थिती आहे. या वेगवेगळ्या परिस्थितीमुळे आपल्या राज्यात लोकजीवनात विविधता आढळते.'' [५५]याचा अर्थ महाराष्ट्रात वेगवेगळ्या भौगोलिक कारणांमुळे लोकजीवनात विविधता आढळते. याप्रमाणेच विभागातील लोकजीवन हे ग्रामीण, शहरी व आदिवासी या तीन प्रकारात विभागलेले आहे. ग्रामीण आणि शहरी लोकजीवनात बऱ्याच प्रमाणात समानता आली आहे. नाशिक विभागातील लोकजीवनाचं महत्त्वाचे वेगळेपण आदिवासी लोकजीवन हे होय. अहमदनगर जिल्ह्याच्या पश्चिम भागामध्ये, नाशिक जिल्ह्याच्या पश्चिम भागमध्ये आणि नंदूरबार जिल्ह्यातील ग्रामीण भागात आदिवासी लोकजीवन आढळते. आदिवासींच्या आहारात, पोशाखात, दागिन्यात विविधता आढळते. नाशिक विभागातील वेगवेगळ्या भागात कोकणा, भिल्ल, महादेव कोळी, काथोडी, ठाकर, वारली इ. जमातींचे आदिवासी लोक राहतात. नंदूरबार जिल्ह्यात आदिवासी जमातीचे प्रमाण अधिक असून गावीत, भिल्ल, पावरा, मावची, धनका इ. आदिवासी जमाती आहेत. त्याप्रमाणे धुळे जिल्ह्यात भिल्ल, कोकणा, मावची, पारधी, पावरा आदिवासी जमाती राहतात.

नाशिक विभागातील ग्रामीण व आदिवासी लोकजीवनात झपाट्याने सुधारणा होत आहेत.

**शिक्षण व्यवस्था :**

नाशिक विभागात पूर्व प्राथमिक, ते उच्च पदवीधर पर्यंत शिक्षण घेण्यासाठी शाळा व महाविद्यालय, विद्यापीठे आहेत. ''१८४० मध्ये शिक्षणमंड पूर्वी जिल्ह्यात काही स्थानिक शिक्षणसंस्था होत्या. त्या सर्व संस्था ब्राह्मण समाज चालवीत होता. '' [५६] याचा अर्थ अहमदनगरमध्ये शिक्षणमंडळाच्या प्रारंभापूर्वी ब्राह्मण समाजाच्या काही संस्था शिक्षण देण्याचे काम करीत होत्या. धुळे व नंदुरबार शिक्षणामध्ये मागासलेला होते. नाशिकमध्ये इ.स.१८६१

मध्ये सुपेरियर ॲन्लो व्हरनॅक्युलर शाळा स्थापन झाली. जळगाव जिल्ह्यातील एरंडोल येथे १८४३ साली शाळेची स्थापना झाली.

विभागामध्ये पूर्व प्राथमिक ते पदव्युत्तर शिक्षणाची सोय उपलब्ध आहे. शासकीय शाळा, संस्थेच्या शाळा, खाजगी शाळा, अनु. जाती जमातीसाठी असणाऱ्या शाळा, माध्यमिक विद्यालये, विद्यापीठ इ. शिक्षण व्यवस्था नाशिक विभागात उपलब्ध आहे.

**नाशिक विभागातील मुद्रित प्रसार माध्यमांचाइतिहास**

वृत्तपत्रांचे मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. वृत्तपत्रांमुळे माहिती, घटना, शिक्षण, मनोरंजन, बातम्या इ. अनेक कार्ये पूर्ण होतात. मानवाच्या ज्ञानात भर टाकण्याचे काम वृत्तपत्र करतात. ''वृत्तपत्र व्यवसायाने जगभर फार मोठी क्रांती केली आहे.'' [५७] याचा अर्थ सामाजिक, शैक्षणिक इ. प्रगतीमध्ये वृत्तपत्राने फार मोठी भूमिका पार पाडली आहे.

विभागाच्या जडणघडणीमध्येही वृत्तपत्रांनी मोलाची भूमिका पार पाडली. विभागातील वृत्तपत्रांच्या इतिहासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विभागातील वृत्तपत्रांचा इतिहास हा ईस्ट इंडिया कंपनीच्या काळापासून सुरु होतो.

१८५७ च्या उठावापूर्वी नाशिक विभागात वृत्तपत्र सुरु झाले. अहमदनगर येथील अमेरिकन मिशनरींनी ज्ञानोदयाचा प्रारंभ केला.'' पहिला अंक जून १८४२ मध्ये निघाला. पहिले सहा अंक नगरासच निघाले. पत्रात १८ पृष्टे असून ते शिळा छापावर छापलेले असे.''[५८] याचा अर्थ नाशिक विभागाचे पहिले वृत्तपत्र अहमदनगर येथून 'ज्ञानोदय' या नावाने सुरु झाले.

ज्ञानोदयाचे पहिले संपादक एच.बॅलेन्टाईन होते. अमेरिकन मिशन शिळाछाप अहमदनगर येथील छापखान्यावर छापून अमेरिकन मराठी मिशन अहमदनगर हे 'ज्ञानोदय' प्रकाशित करीत होते. ख्रिश्चन धर्मोपदेशकांनी महाराष्ट्रात ख्रिस्ती धर्म प्रचारासाठी इ.स.१८१३ साली अमेरिकन मराठी मिशनची स्थापना केली. याच अमेरिकन मराठी मिशनने ज्ञानोदय सुरु केले.''लोकांच्या धर्म, नीति, चाली वगैरे संबंधी मत प्रसिद्ध करु. अयोग्य गोष्टी छापणार नाही. स्वरुप सचित्र, अनेक प्रकारच्या विद्या म्हणजे भुगोलविद्या, ज्योतिषविद्या, सिद्ध पदार्थ विज्ञान, आणि बखर अशा प्रकरणाच्या गोष्टी आणि या देशाचे व इतर देशांचे वर्तमान आणि विशेष करुन अहमदनगरसंबंधी मजकूर.'' [५९] याचा अर्थ ज्ञानोदय हे धर्म विषयक मत मांडण्यासाठी सुरु

झाले,. ज्ञानोदयापूर्वी सुरु झालेले वृत्तपत्रे हे ज्ञानप्रचार व ज्ञानप्रसारचा हेतू डोळ्यासमोर ठेवून सुरु झालेले होते. मात्र ज्ञानोदयाचा जन्म 'धर्म' डोळ्यासमोर ठेवून झाला. त्या काळी काही लोकांकडून वृत्तपत्रातून ख्रिस्ती धर्मावर टिका होत होती. या टिकेला उत्तर देण्यासाठी ज्ञानोदयचा प्रारंभ झाला.

जून १८४२ मध्ये ज्ञानोदयचा पहिला अंक निघाला. छापखाना बरोबर चालला नसल्याने ज्ञानोदयचा जुलै १८४२ मधील दुसरा अंक निघाला नाही. ज्ञानोदय प्रथम अहमदनगर येथून प्रकाशित झाले. कालांतराने इ.स.१८४३ पासून मुंबईत स्थलांतरीत झाले. मुंबई येथून पुन्हा अहमदनगर येथे प्रकाशन सुरु झाले. ज्ञानोदयच्या प्रकाशनात जशी स्थलांतरे झाली तसाच बदल भाषेतही झाला. ज्ञानोदयचे पहिले सहा अंक मराठीत, त्यानंतर इ.स.१८६६ पर्यंत मराठी व इंग्रजी अशा द्विभाषेत व इ.स.१८६७ ते इ.स.१८७२ दरम्यान फक्त मराठी भाषेत प्रसिद्ध झाले.

'''ज्ञानोदय' पत्र धर्मप्रसारासाठी निघाले हे जसे त्याचे वैशिष्ट्य, त्याप्रमाणेच मुंबईबाहेर पुण्याच्याही आधी अहमदनगर येथे हे वृत्तपत्र निघाले, हाही त्याचा एक विशेष होता. 'ज्ञानोदय' चे आणखी एक वैशिष्ट्य असे सांगता येईल की, १८४२ साली सुरु झालेले हे पत्र, निरनिराळ्या स्वरुपात वेळोवेळी प्रसिद्ध झाले तरी त्याच्या सातत्याने कधी खंड पडला नाही.'' [६०] यावरुन मुंबईनंतर पुण्याच्याही अगोदर अहमदनगर येथे वृत्तपत्राचा प्रारंभ झाला, हे सिद्ध होते. मुंबई नंतर अवघ्या दहा वर्षात नाशिक विभागात प्रथम ज्ञानोदयाच्या रुपाने वृत्तपत्र सुरु झाले. ज्ञानोदयाचे अनेकवेळा स्थलांतर झाले. भाषेत बदल झाला, संपादकातही बदल झाला, तरीही ज्ञानोदय अखंडपणे प्रकाशित होत राहिले.

''ख्रिस्ती मिशनची माहिती, मिशनऱ्यांची जाणीयेणी, प्रभू येशूचे गुणवर्णन तसेच हिंदी पुराणिकांची फसवेगिरी, ठकबाजी, ढोंगी बुवा, वेश्यागमन, नायकिणीचा नाच, होळीचा सण, दारुबाजीचा निषेध, इत्यादी विषयावर लेख आणि इतर पत्रातील उत्तरे येत असत. लेखांचे धोरण प्राय. हिंदु धर्माची कुचेष्टा करण्याकडे प्रथम असे.'' [६१] याचा अर्थ ज्ञानोदयचा मुख्य हेतू ख्रिस्त धर्माप्रचार होता. धर्मप्रचार करीत असतांना ज्ञानोदयातून तत्कालीन चालिरीती व हिंदु धर्म यांची कुचेष्टा केली. हिंदु धर्मातील चुकीच्या चालिरीती, अनिष्ट रुढी यावर हल्ला केला. हिंदु धर्मातील अनिष्ठ चालिरीतीवर टिका करुन ख्रिस्ती धर्माची प्रतिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न

ज्ञानोदयातून झाला. ''संपादक–१८४५ ते १८५४ आर.डब्ल्यू.ह्युम, १८५४ – ५५ एस.बी. फेअरबँक, १८५५–५८ ए.हॅझेन, १८५८–६५ एच. बॅलॅटाईन, १८६५–६७ ए.हॅझेन, १८६७–७२ शाहु दाजी कुकडे, १८७२ पासून डब्ल्यू पार्क.''[६२] यावरुन ज्ञानोदयास अनेक संपादक लाभले. या संपादकाबरोबरच प्रसिद्ध मराठी कवीनारायण वामन टिळक यांनीही इ.स.१९१२ ते १९१९ अखेर ज्ञानोदयाचे संपादकत्व केले.

हिंदू धर्मावर टिका करीत असतांना ज्ञानोदयाने ज्ञानप्रसाराचेही काम केले. आशिया खंड, युरोप खंडाचे नकाशे सर्वप्रथम ज्ञानोदयाने छापले. १५ जानेवारी १८४५ रोजीच्या अंकात 'चित्र' छापले. यामुळे वृत्तपत्रात सर्वप्रथम चित्रे छापण्याचा मान ज्ञानोदयाकडे जातो. याबरोबरच रेल्वे विषयी, विज्ञानाविषयी माहिती ज्ञानोदयात प्रसिद्ध झाली. अनेक अडचणींना तोंड देत ज्ञानोदयाने मराठी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या अनेक पत्राचा परामर्श घेतला. अनिष्ठ चालीरिती, रुढी पंरपरावर प्रहार केल्याने समाजसुधारणेला मदत झाली. विभागातील वृत्तपत्राच्या इतिहासात सर्वात महत्त्वाची भूमिका 'ज्ञानोदय' या वृत्तपत्राने बजावली. यामुळे ज्ञानोदयाची कामगिरी विशेष उल्लेखनिय ठरली.

ज्ञानोदयनंतर विभागातील कालानुक्रमे दुसरे वृत्तपत्र अहमदनगरमध्येच सुरु झाले. ''मिशनरी पत्र 'ज्ञानोदय' प्रथम नगरलाच निघाले व नंतर मुंबईला त्याचे स्थलांतर झाले. पुढे नगरात वृत्तवैभव प्रकटले'' [६३] या लेले रा.के. यांच्या संदर्भानुसार अहमदनगरमध्ये ज्ञानोदयानंतर वृत्तवैभव हे वृत्तपत्र सुरु झाले. मात्र वृत्तवैभव या वृत्तपत्राविषयी अधिक माहिती उपलब्ध झाली नाही.

''नगर येथून प्रकाशित होणाऱ्या साप्ताहिक न्यायसिंधुमध्ये देशी–विदेशी बातम्या प्रसिद्ध होत असत. सन १८६६ मध्ये नगरचे आद्य पत्रकार दाजी चिमणाजी कुकडे यांनी हे साप्ताहिक सुरु केले.'' [६४] याचा अर्थ देशी–विदेशी बातम्यांना स्थान देणारे 'न्यायसिंधु' हे वृत्तपत्र दाजी चिमणाजी कुकडे यांनी सुरु केले. नगर बरोबर देशी–विदेशी घटनांना न्यायसिंधुमध्ये स्थान मिळत होते. नगरचे त्या वेळचे वयोवृद्ध व सामान्य पुढारी दाजीसाहेब कुकडे त्याचे संपादक होते. कुकडे घराणे फार श्रीमंत आणि वजनदार होते. ''दाजीसाहेब स्वतः थोडेसे लिहीत परंतु हाताखालच्या माणसांनी व हौशी मित्रांनी लिहीलेला मजकूर कसोशीने तासून मगच (ते) छापीत. '' [६५] यावरुन दाजी कुकडे न्यायसिंधुतील मजकूराविषयी खुप जागरुक होते, असे

दिसते. तसेच दाजी कुकडेंनी न्यायसिंधुमध्ये स्वतः बरोबर इतर लेखकांना संधी दिल्याचे यावरुन स्पष्ट होते. त्यावेळी कुकडे घराणे हे अहमदनगरमधील वजनदार घराणे होत. 'असहकार चळवळ', 'भारत छोडो' इ. आंदोलनात कुकडे घराण्याने उल्लेखनिय भाग घेतला होता. ''न्यायसिंधूमध्ये प्रारंभी न्यायालय विषयीचे वृत्त आणि वकिलांच्या नोटीसा अधिक प्रमाणात असत. इंग्रजीतील कायद्याची माहिती स्थानिक मंडळींना व्हावी या हेतूने त्यांचा मराठीत अनुवाद दिला जात असे. पुढे हे पत्र लोकमान्य टिळकांच्या नेमस्त पक्षाचे पुरस्कर्ते बनले.'' [६६] याचा अर्थ ब्रिटीशांच्या कायद्याची माहिती भारतीयांना व्हावी या हेतूने दाजी कुकडे यांनी न्यायसिंधु पत्र सुरु केले. सुरुवातीला न्यायसिंधुमध्ये न्यायालयविषयाच्या बातम्या व वकिलांच्या नोटीसा प्रसिद्ध होत असत. या नोटीसांच्या प्रसिद्धीमधून न्यायसिंधुस आर्थिक लाभ होत होता. नोटीसांच्या दराबाबतचा उल्लेख न्यायसिंधुमध्ये केला जात असे. अहमदनगरच्या वृत्ताबरोबरच भारतातील व विदेशातील वृत्त न्यायसिंधुमधून प्रकाशित होत होते. न्यायससिंधुचे अंक अहमदनगर येथील ऐतिहासिक वस्तु संग्रहालयात उपलब्ध आहेत.

अहमदनगर येथे सुरु झालेली वृत्तपत्राची चळवळ विभागात पसरली. अहमदनगर पाठोपाठ खानदेशामध्ये वृत्तपत्राचा प्रारंभ झाला. ''धुळे व जळगाव यांना ब्रिटीश काळात पूर्व व पश्चिम खानदेश म्हणून ओळखले जात असे. यावेळी धुळे हा प.खानदेश म्हणून ओळखला जात असे. इंग्रजांच्या प्रभावाखाली प्रथम पश्चिम खानदेश आला. १८१८ मध्ये पेशवाईच्या अस्तानंतर खानदेशही ब्रिटीश अंमलाखाली आला आणि खानदेशामध्ये नवसुधारणांचे वारे वाहू लागले. या कालखंडामध्ये सुमारे पाच दशकानंतर १८६८ मध्ये 'खानदेश वैभव' हे साप्ताहिक पत्र प्रकाशित झाले. '' [६७] यावरुन खानदेशातील 'खानदेश वैभव' हे पहिले मुद्रित प्रसारमाध्यम असून ते १८६८ साली धुळे येथून सुरु झाले. पूर्वी धुळे, नंदुरबार, जळगाव यांना खानदेश म्हणून ओळखले जात होते म्हणून खानदेशातील पहिले वृत्तपत्र 'खानदेश वैभव' हे होय. ''१८६८ साली सुरु झालेले 'खानदेश वैभव' हे खानदेशाचे पहिले वृत्तपत्र होय. शिळा छापवर ते छापण्यात येत असे. या पत्राचे एक वैशिष्ट्य असे की दरवर्षी पहिला अंक सोनेरी शाईत छापण्यात येत असे.''[६८] याचा अर्थ 'खानदेश वैभव' या पत्राचा प्रत्येक वर्षाचा पहिला अंक हा सोनेरी शाईमध्ये छापलेला असे. खानदेश वैभव या पत्राने खानदेशामध्ये वृत्तपत्राच्या चळवळीला सुरुवात केली. ''या पत्राचे (खानदेश वैभव) पहिले संपादक कवी विनायक यांचे थोरले बंधु

बळवंत जनार्धन करंदीकर हे होते. करंदीकर यांच्यानंतर यादव बाळकृष्ण उर्फ तात्यासाहेब बहाळकर हे संपादक झाले. तात्यासाहेब जरी संपादक असले तरी प्रत्यक्ष संपादनाचे काम सरकारी हायस्कुलात शिक्षक असलेले रावजी बाळकृष्ण उपासनी हे करीत असत. पुढे भिकाजी बाळकृष्ण उपासनी यांच्याकडे संपादनाची सुत्रे गेली. 'खानदेश वैभव' मध्ये रावबहादूर गरुड, नामदार उपासनी आदि लेखन करीत. या वृत्तपत्राचे सुरुवातीचे धोरण काँग्रेसला अनुकुल असे होते. पुढे नेमस्तांच्या राजकारणाचा हे पत्र पुरस्कार करु लागले.'' [६९] यावरुन खानदेश वैभव या पत्रास स्वातंत्र्य संग्रामातील देशभक्तांचे संपादकत्व मिळाले. विविध बुद्धिमान व प्रखर देशभक्तांच्या विचारातून 'खानदेश वैभव' हे पत्र प्रकाशित होत होते. ध्येयवादी व देशभक्तीने प्रेरित झालेला संपादकवर्ग खानदेश वैभव या वृत्तपत्रास लाभला. या पत्रामध्ये सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या, दौरे, वरिष्ठांचे दरबार इ. विविध विषयांना स्थान मिळत होते.

''सर्वात जुनी अशी मराठी भाषेत जी वृत्तपत्रे आहेत. त्यात खालील प्रमुख असून ती आजही चालू आहेत, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. १. कल्पतरु–आनंदवृत्त (सोलापूर), २. खानदेश वैभव (धुळे) वर्ष ६९, ३. बेळगाव समचाचार (बेळगाव) वर्ष ७३, ४. शुभसुचक (सातारा) वर्षे८०, ५. सत्यशोधक (रत्नागिरी) वर्ष ६५, ६. ज्ञानसागर (कोल्हापूर) वर्षे ६७.'' [७०] यावरुन खानदेश वैभव हे बरेच वर्षे चालू होते हे स्पष्ट होते. इ.स.१८६८ साली सुरु झालेले खानदेश वैभव हे पत्र इ.स.१९४० साली बंद पडले. म्हणजे ७२–७३ वर्षे खानदेश वैभव या पत्राने खानदेशामध्ये मुद्रित प्रसारमाध्यमाची चळवळ जिवंत ठेवली.

'खानदेश वैभव' या पत्रानंतर कालानुक्रमे 'नासिक वृत्त' हे वृत्तपत्र सुरु झाले. ''नाशिकमध्ये वृत्तपत्राचा प्रारंभ 'नासिक वृत्त' या पत्राने झाला. हे साप्ताहिक त्रिंबक हरी काळे यांनी नोव्हेंबर १८६९ मध्ये सुरु केले. दर शनिवारी सायंकाळी ते प्रसिद्ध होत असे. राजकीय व सामाजिक घडामोडींचा परामर्श पत्रात घेण्याचा प्रयत्न असे.'' [७१] याचा अर्थ वृत्तपत्राची चळवळ नाशिक जिल्ह्यात इ.स.१८६९ साली पोहचली. नोव्हेंबर १८६९ मध्ये त्र्यंबक हरी काळे यांनी नाशिक जिल्ह्यातील पहिले पत्र 'नासिक वृत्त' चा प्रारंभ केला. या पत्रामध्ये राजकीय घडामोडींबरोबरच सामाजिक घटनांचाही आढावा घेण्यात येत असे. विविध विषयांसह गणिती कोड्यांना 'नासिक वृत्त'मध्ये स्थान मिळत होते.

'नासिक वृत्त' या पत्रापाठोपाठ नाशिक येथे 'नासिक समाचार' या वृत्तपत्राचा प्रारंभ झाला. इ.स.१८७५ साली हरी विष्णु सहस्त्रबुद्धे यांनी 'नासिक समाचार' सुरु केले. यानंतर नाशिकमध्ये इ.स.१८७६ साली 'हिंदुमित्र' सुरु झाले. 'हिंदुमित्र' या पत्रानंतर नाशिकमध्ये 'गंगालहरी', 'नासिक वैभव', लोकसेवा इ. वृत्तपत्राचा प्रारंभ झाला.

खानदेशातील नावाजलेले 'आर्यावर्त' हे पत्र दि.५ ऑगस्ट १८७६ रोजी के.मो. पंडीत यांनी सुरु केले. के.मो. पंडीत हे खानदेशातील प्रसिद्ध साहित्यीक व कवी होते. हे पत्र सुमारे चोपन्न वर्ष चालू राहिले. कालांतराने तुळशीदास गोविंद जोशी यांनी 'आयावर्त' या पत्राचे 'आर्यवैभव' असे नामांतर केले. 'आर्यवैभव' चालवण्याचा प्रयत्न तुळशीदास गोविंद जोशी यांनी केला.

जानेवारी १८७६ मध्ये शंकर रामचंद्र हतवळणे यांनी अहमदनगर येथून 'न्याय प्रकाश' हे मासिक सुरु केले. न्यायप्रकाश या पत्रामधून हायकोर्टामधील घटनांना प्रसिद्धी मिळत असे.

दि.३ जानेवारी १८८१ रोजी नानासाहेब फडणीस यांनी जळगाव येथे 'प्रबोधचंद्रिका' या पत्राचा प्रारंभ केला. ''सुरुवातीला पत्राच्या संपादनाचेच नव्हे तर शिळाछापाचे दगड घासणे, मशीन चालवणे इत्यादी कामे नानासाहेब व त्यांचे बंधु हरी नरसिंह फडणीस यांनाच करावी लागत. नानासाहेबांनी अशा सर्व प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत पत्र चालविले. चिकाटीने काम करुन पत्राला हळूहळू जनमाणसात स्थान मिळवून दिले. जिल्ह्याचे मुखपत्र असाही सन्मान 'प्रबोध चंद्रिका' पत्राला पुढे मिळाला.'' [७२] यावरुन 'प्रबोधचंद्रिका' सुरु ठेवण्यासाठी नानासाहेब फडणीस व त्यांचे बंधु हरी नरसिंह फडणीस यांनी अपार कष्ट केले हे स्पष्ट होते. फडणीस बंधुच्या अपार कष्टामुळे 'प्रबोधचंद्रिका' जळगाव जिल्ह्याचे मुखपत्र बनले. लोकजागृती करणे, सामाजिक सुधारणा, सांस्कृतिक चळचळ यांचा पुरस्कार करणे हे 'सुबोधचंद्रिका' या पत्राचे ध्येय होते.

कवितांच्या प्रकाशनासाठी जून १८८७ मधे काव्यरत्नावली हे मासिक सुरु झाले. अर्वाचीन कवीच्या काव्यांचे प्रकाशन हा काव्यरत्नावली या पत्राचा मुख्य उद्देश होता. नारायण नरसिंह फडणीस हे 'काव्यरत्नावली' या पत्राचे प्रकाशक होते.

ज्ञानोदय, न्यायसिंधु, खानदेश वैभव, नासिक समाचार, आर्यवर्त इ. पत्रांनी नाशिक विभागात वृत्तपत्रांचा इतिहास गाजवला. अहमदनगर येथून सुरु झालेली वृत्तपत्राची चळवळ

धुळे, जळगाव, नाशिक या ठिकाणी पोहचली. तत्कालीन वृत्तपत्रांनी सामाजिक सुधारणा, संस्कृती जपवणूक, राजकीय चळवळ इ. अनेक महत्त्वाच्या विषयांचा 'पुरस्कार' केला. धर्मप्रचार व प्रसारासोबत ज्ञानोदयानेही सामाजिक सुधारणांकडे माणसांना आकर्षित केले. म्हणूनच विविध वृत्तपत्रांनी ज्ञान, माहिती प्रसारासह विविध देशी–विदेशी घटना, विज्ञान, बातम्या यांना स्थान देवून नाशिक विभागातील लोकांची जिज्ञासा जागृत केली. एकंदरीत नाशिक विभागाच्या मुद्रित प्रसारमाध्यमांचा इतिहास हा उल्लेखनिय आहे.

**८. मासिक छावा :**

स्वातंत्र्यलढ्यात टिळक युग व गांधी युग असे दोन कालखंड झाले. दैनिक केसरीचा दि.४/१/१९८१ रोजी प्रारंभ झाला. ''केसरी'' पत्राच्या व त्याचे एक संस्थापक व पुढे एकमेव चालक बनलेले लो.टिळक यांच्या विचाराची छाप सर्वत्र राहिली. राजकारणात टिळक व वृत्तपत्रात'केसरी' यांचे अनुकरण होत राहिले.'' [७३] याचा अर्थ टिळक व केसरीची छाप राजकीय व वृत्तपत्र क्षेत्रात होती असे स्पष्ट होते. स्वातंत्र्यलढ्यात केसरी वृत्तपत्राचा प्रभावी वापर टिळकांनी केला. आज १३८ वर्षानंतरही दै.केसरी महाराष्ट्राच्या विविध ठिकाणाहून प्रकाशित होतो.

''१९८३ च्या सुमारास सह्याद्री साप्ताहिक स्वरुपात प्रसिद्ध होऊ लागला. त्यात बालसह्याद्रीची पाने असत. पण साप्ताहिक सह्याद्री आक्रमक होता. त्याची सदरेही आक्रमक व भडक होती. महाराष्ट्रात एक नंबरचे साप्ताहिक होते. पण ते बालवाचकांना वाचण्याजोगे नव्हते. म्हणून मी छावा या स्वतंत्र मुलांच्या मासिकाचा आराखडा विश्वस्तांपुढे ठेवला आणि त्याला मंजूरी मिळाली.'' [७४] याचा अर्थ डॉ.दिपक टिळक यांच्या संकल्पनेतून 'छावा' मासिकाचा जन्म झाला. मुलांच्या गरजेनुसार त्यांच्या अंतर्भूत कलागुणांना वाव मिळणे गरजेचे आहे. या विचारातून छावा सुरु झाले.

'' In 1985 Kesari – Marath trust published a separate chlidren magazine CHHAWA. Dr. Deepak J.Tilak was the first editor of this magazine. who developed an idea of bal sahyadri, with the new contants of art & craft, adventures, comic stories, games, pictorial puzzles, crosswords and many actractig for

chlildren, painting, animal, travelling, jokes, industrial information , recopies. '' [७५] याचा अर्थ केसरी मराठा ट्रस्टने १९८५ पासून 'छावा' हे मुलांसाठीचे मासिक सुरु केले. यामध्ये साहसी कथा, कलात्मक गुणांना वाव, कोडे, विविध खेळ, कथा, चित्रकला अशा वेगवेगळ्या विषयांना स्थान देण्यात येते.

छावा मासिकाचा हेतू स्पष्ट करताना डॉ.गिताली मोने-टिळक म्हणतात,''Chwa is such a children magazine which dose not aim at entertainment. its editorial focus is to develop intellectual skills in th chldren '' [७६]

छावा मासिकाने तीन दशकांची वैभवशाली वाटचाल पूर्ण केली. विविध प्रकारचे साहित्य प्रकाशित केले. यानंतर मासिक छावाच्या प्रकाशन कालावधीत बदल करण्यात आला. मासिक छावा जुलै २०१५ पासून साप्ताहिक म्हणून प्रसिद्ध होऊ लागला. आज प्रत्येक आठवड्याच्या शनिवारी 'छावा' प्रकाशित होतो.

**९. मासिक किशोर :**

१४ नोव्हेंबर हा भारताचे दिवंगत पंतप्रधान पंडित नेहरु यांचा जन्मदिवस. ''पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीदिनी १४ नोव्हेंबर १९७१ रोजी ८ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी 'किशोर' हे मासिक बालभारतीच्या वतीने सुरु केले.'' [७७] याचा अर्थ मुलांना वाचनाची गोडी लागावी, मुलांवर संस्कार व्हावेत या उद्देशाने किशोर हे मासिक बालभारतीच्या वतीने सुरु केलेले आहे.

इ.स.१९७१ साली बालकांसाठी पुरक वाचन सहजरितीने उपलब्ध होत नव्हते. विद्यार्थ्यांना वाचनासाठी साहित्य सहज मिळावे या हेतूने 'किशोर' मासिकाची निर्मिती झाली.

''किशोर मासिकाची नियमीत छपाई १९७२ पासून सुरु झाली. पहिल्यांदा दहा हजार प्रती छापण्यात आल्या. सहा महिन्यानंतर 'किशोर'ची विक्री दरमहा २५ ते ३० हजार प्रती आणि दिवाळी अंकाची विक्री ३५ ते ४० हजार प्रतीपर्यंत गेली. आता दरमहा ६५ हजार प्रती वितरीत होतात.'' [७८] यावरुन किशोर मासिक मुलांच्या पसंतीला पडले असे स्पष्ट होते. आजपर्यंत किशोर मासिकास छपाई, सजावट, बालवाङ्मय इ. बाबींसाठी वेगवेगळे ४५ पुरस्कार मिळाले आहेत

## १०. समारोप

समाजशास्त्रीय संशोधनात संशोधनाची ओळख, संशोधनाची व्याप्ती स्पष्ट करणे गरजेचे आहे. प्रस्तुत भागामध्ये ''मुद्रित प्रसारमाध्यमात प्रसिद्ध झालेल्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास. विशेष संदर्भ : किशोर आणि छावा मासिक (कालावधी २००८ ते २०१८)'' या संशोधन विषयाची ओळख करुन दिली आहे.

मुद्रित माध्यमांनी विद्यार्थ्यांसाठी प्रसिद्ध केलेल्या साहित्यावर संशोधन करणे आवश्यक होते. मानसशास्त्रानुसार ६ ते १४ वयोगटातील मुलांच्या विकासासाठी खुप महत्त्वाचा असतो. म्हणून विषयाचे मुलांच्या दृष्टीकोनातून खूप महत्त्व आहे.

मुद्रित माध्यमांनी विद्यार्थ्यांसाठी प्रकाशित केलेल्या साहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट केले. या भागामध्ये संशोधनाची उद्दिष्टे निश्चितपणे मांडली आहेत. माध्यमांच्या प्रकाराचा अभ्यास करण्यात आला. यामध्ये श्राव्य प्रसारमाध्यम उदा. नाभोवाणी, दृकश्राव्य प्रसार माध्यम उदा.दुरचित्रवाणी, लोकमाध्यमे यांचा अभ्यास केला. विषयाच्या बाजुने संशोधनाची ओळख व्हावी म्हणून मासिक छावा व किशोर या मुलांच्या पत्राचा सखोल अभ्यास केला. पुर्वकालीन भारतीय प्रसाारमाध्यमांचा आढावा नाशिक विभागाचे वैशिष्टय व मुद्रीत प्रसार माध्यमांच्या इतिहासाच्या प्रस्तुत अभ्यासाचा आढावा घेतला. संशोधन विषयाच्या अनुषंगाने महत्वाच्या वरील बाबीचा अभ्यास प्रस्तुत संशोधन विषयाची ओळ या प्रकरणात केला.

## १२. संदर्भ


१. डॉ.धारुरकर वि.ल. (२००८) जनसंवाद सिद्धांत, औरंगाबाद : चैतन्य प्रकाशन, पान क्र.८७

२. आलेगावकर प.म. (२००५) अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र. पुणे : सुविचार प्रकाशन, मंडळ, पान क्र.१३५

३. लेले रा.के. (१९८४) : मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पुणे कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पान क्र.५

४. प्रा. डॉ. मायी सुनिल (२००८). सामाजिक संशोधन पध्दती. पूणे : डायमंड पब्लिकेशप्स. पानः१६

५. डॉ. आगलावे प्रदिप (२००७). सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे. नागपूर : श्रीसाईनाथ प्रकाशन पान : २०

६. आलेगावकर प. म. (२००५). अध्ययन–अध्यापनाचे मानसशास्त्र. पूणे : सुविचार प्रकाशन मंडळ. पानः ११४

७. टिळक गिताली (२०१८). पीएचडी शोधप्रबंध, 'A study of content analysis of marathi chlidren periodicals for enhancing mulitiple skill among chlidren' टिळक विद्यापीठ पूणे. पान : १८४

८. मंडलीक वि .(१९९९). विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाची साधना नाशिकः योग चैतन्य प्रकाशन. पान : १६

९. आलेगावकर प. म. (२००५). उपरोक्त : पान : १२९

१०. डॉ. ससाणे म. (२०१२). मूल्यसंस्कार. पाचवड (जि.सातारा) : सानिया पब्लिकेशन्स. पान : २४

११. डॉ. आगलावे (२००७) : पान क्र. २९ उपरोक्त

१२. प्रा. डॉ. खैरनार दि. (२००९). प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यिकी. पूणे : डायमंड पब्लिकेशन्स पान क्र. ४

१३. डॉ. आगलावे प्र (२००७) : उपरोक्त : १६३

१४. डॉ. धारूरकर वि. ल. (२००८). जनसंवाद सिध्दान्त औरंगाबाद : चैतन्य प्रकाशन. पानः ३४

१५. डॉ. हंडिबाग भा. व डॉ.सरकटे स. (२०१४) दृकश्राव्य माध्यमांसाठी लेखन कौशल्ये. औरंगाबाद : एज्युकेशन पब्लिशर्स अॅण्ड डिस्ट्रब्युटर्स . पान : १

१६. डॉ. धारूरकर वि. ल. (२००८). उपरोक्त पानः ३४

१७. डॉ. हंडिबाग भा. व डॉ.सरकटे स. (२०१४) : उपरोक्त. पान : २

१८. डॉ. धारूरकर वि. ल. (२००८). उपरोक्त पानः ८९

१९. कोल्हाटकर सं.व. कुलकर्णी प्र. (२००९) महाराष्ट्रातील प्रसारमाध्यमे, काल आणि आज. पुणे : डायमंड पब्लिकेशन्स पान क्र.१०२

२०. डॉ. धारूरकर वि. ल. (२००८). उपरोक्त. पानः ९१

२१. बर्वे उ. (२००८) : जनसंज्ञापन व आधुनिक प्रसारमाध्यमे. नाशिक : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, पान : ६

२२. डॉ.भोसले डी.एम. (२००९) इंटरनेट व वेब वृत्तपत्रे. औरंगाबाद : साक्षात प्रकाशन. पान : ८७

२३. प्रा.डॉ.राजा दीक्षित (२०१०) माणसाची गोष्ट (इ. ३ री) राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडख, पान : ६

२४. राजा दिक्षीत (२०१०) : उपरोक्त : पानः२३

२५. नाईक बा. (१९८०) भारतीय ग्रंथमुद्रण

२६. मेहेंदळे व्ही (२००५) मिडीया पुणेः डॉ.सौ.शकुंतला लाटकर, पान १५

२७. धारुरकर वि.ल. (२०११) पत्रकारितेचा दीपस्तंभ : आ.बाळशास्त्री जांभेकर. मुंबई : भारतीय समाज विकास अकॅडमी. पान : १२

२८. मेहेंदळे व्ही. (२००५) : उपरोक्त : पान : २३

२९ मेहेंदळे व्ही (२००५) उपरोक्त : पान २३

३० शेळके बी. (२०१२) : प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा
पुणे : स्नेहवर्धन प्रकाशन : पान १२

३१ मेहेंदळे व्ही (२००५) : उपरोक्त : पान ६५

३२ मेहेंदळे व्ही (२००५) : उपरोक्त : पान ६८

३३. गोळवलकर : पोटदुखे आर. (२०१४) : जनसंवाद सिद्धांत आणि व्यवहार, नागपूर : श्री मंगल प्रकाशन, पान : २२४

३४. मेहेंदळे व्ही (२००५) : उपरोक्त, पान : ७१

३५. धारुरकर वि.ल.(२०११). उपरोक्त, पान : ३६

३६. देशपांडे अ.ना. (१९६६), मराठी वाङ्मयाचा इतिहास, पुणे. पान : १७३

३७. धारुरकर वि.ल. : उपरोक्त. पान : ४१

३८. गिरासे वि. आणि पाटील रा. (२०१६) भुगोल. पुणे : युनिक अकॅडमी पब्लिकेशन्स प्रा. लि.पान १०३

३९. डॉ.कठारे अ., डॉ.पाटील सु आणि डॉ.बैसाणे अ. (२०११) शिवकाळ व पेशवाईतील दुष्काळाचा इतिहास, कंधारःपूनम प्रकाशन. पान :६

४०. डॉ.तावडे मो., सावंत सं आणि अमृते वि.ग. (१९९२). महाराष्ट्राचा भुगोल (इयत्ता चौथी) पुणेः महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ. पान १३

४१. डॉ.तावडे मो., सावंत सं आणि अमृते वि.ग. (२००९) महाराष्ट्राचा भुगोल (इयत्ता चौथी). पुणे : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ. पान १२

४२. गिरासे वि. (२०१६) : उपरोक्त : पान १२७

४३. डॉ.तावडे मो., सावंत सं आणि अमृते वि.ग. उपरोक्त : पान १२

४४. महाराष्ट्राचा भुगोल, इयत्ता पाचवी (२००६). पुणे : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ. पान :

४५. डॉ.कठारे अ.व. (२०११) : उपरोक्त : पान २०

४६. पाचवी भुगोल : उपरोक्त : पान २५

४७. डॉ.कठारे अ.व. (२०११): उपरोक्त : पान १३

४८.	डॉ.जोग सु.रा. व इतर (२००८) भुगोल इयत्ता तिसरी, नाशिक जिल्हा. मुंबई : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पान : २१ (२००८)

४९.	डॉ.कठारे अ.व. (२०११) : उपरोक्त : पान ११

५०.	डॉ.तावडे मो., सावंत सं आणि अमृते वि.ग. (२००९) . पान : १९

५१.	जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६, जिल्हा अहमदनगर. पान ५

५२.	डॉ.जोग सु.रा. व इतर (२००८) भुगोल इयत्ता तिसरी, नाशिक जिल्हा. मुंबई : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पान : ३०

५३.	डॉ.जोग सु.रा. व इतर (२००८) भुगोल इयत्ता तिसरी, नंदुरबार जिल्हा. मुंबईः महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पान : ३१

५४.	डॉ.तावडे मो., सावंत सं आणि अमृते वि.ग. (२००९) (नवीन) महाराष्ट्राचा भुगोल (इयत्ता चौथी). पुणे : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ. पान ४७

५५.	डॉ.तावडे मो. (१९९२) : उपरोक्त : पान ६१

५६.	डॉ.शर्मा के.के. (२००५) संदर्भ महाराष्ट्र खंड –१, भोपाळ : इंटलेक्चुअल बुक ब्युरो पान ४४

५७.	डॉ.पवार सु. (१९८८) वृत्तपत्र व्यवसायाकडे वाटचाल, नाशिक : जयश्री प्रकाशन. पान १५

५८.	जोशी वि.कृ. आणि लेले रा.के. (१९५१) वृत्तपत्रांचा इतिहास. मुंबई. युगवाणी प्रकाशन.पान : २०६

५९.	दाते शं.ग. व इतर (१९६९) मराठी नियतकालिकांची सुचिव, मुंबई : मुंबई मराठी ग्रंथालय. पान ४१३

६०.	लेले रा.के. (१९८४) मराठी वृत्तपत्रांचा इतिहास. पुणे : कॉन्टीनेन्टल प्रकाशन. पान : ८७ व ८८

६१.	कानडे राः उपरोक्त : पान ३५

६२.	दाते सं.ग. व इतर : उपरोक्त : पान ४१३

६३. लेले रा.के. : उपरोक्त : पान १२८

६४. https://www.loksatta.comरविवार, दि.१४ जून २००९

६५. लेले रा.के. : उपरोक्त : २०१८

६६. https://www.loksatta.comरविवार, दि.१४ जून २००९

६७. भटकर सु.भ. : खानदेशातील वृत्तपत्रांचा इतिहास. पीएचडी थीसिस : २००५ : पान १३९.

६८. लेले रा.के. : उपरोक्त : २०१९

६९. भटकर सु.भ. (२००५) : पीएचडी : पान १४१

७०. कानडे रा.: उपरोक्त : पान ४२

७१. लेले रा.के. : उपरोत्त : पान २१९

७२. लेले रा.के. : उपरोक्त : पान २२०

७३. लेले रा.के. (१९८४) : उपरोक्त : पान क्र.२७१

७४. डॉ.टिळक दि.ज. (२०१५) मासिक छावा, ९ मे २०१५ अंकातील लेख क्र. २

७५. टिळक गिताली (२०१८) उपरोक्त : पान १४

७६. टिळक गिताली (२०१८) उपरोक्त : पान १४

७७. www.kishor.ebhalbharti.in

७८. www.kishor.ebhalbharti.in

## प्रकरण २

# संशोधन विषयाशी संबंधीत साहित्याचा आढावा

१. संशोधन साहित्य व पूर्व संशोधन : प्रस्तावना

२. पूर्व संशोधन अभ्यासाचे महत्व

३. पूर्व संशोधनाचा आढावा

४. संशोधन साहित्याच्या अभ्यासाची आवश्यकता

५. संशोधन साहित्याचा आढावा व वैशिष्ट्ये

६. समारोप

## २.१. संशोधन साहित्य व पूर्व संशोधन : प्रस्तावना

संशोधन हे अनेक घटकांवर आधारित असते. संशोधनात अनेक पैलूंवर प्रकाश टाकला जातो. संशोधनात वेगवेगळ्या पायऱ्या असून विषयाशी निगडीत संबंधीत साहित्य व पूर्व संशोधनाचा अभ्यास करणे गरजेचे असते. संबंधीत साहित्य व पूर्व संशोधन अभ्यासात वेगवेगळ्या बाबींचा समावेश होतो. विषयाची निश्चिती केल्यानंतर विषयाशी संबंधीत पूर्व साहित्याचा अभ्यास करणे गरजेचे असते. विषयाशी संबंधीत असलेले पूर्व संशोधन याचा आढावा अभ्यासकर्त्यास घ्यावा लागतो. कारण नव्या संशोधनाचा पूर्व संशोधन पाया असतो.

## २.२. पूर्व संशोधन अभ्यासाचे महत्व

समाजशास्त्रामध्ये वेगवेगळ्या विद्याशाखांचा अंतर्भाव होतो. यामध्ये राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, भूगोल, इ. विद्याशाखांचा समावेश होतो. वेगवेगळ्या विद्याशाखांमध्ये वेगवेगळ्या घटकांवर संशोधन झालेले आहे. एकाच विषयातील एकाच घटकावरही संशोधन झालेले असते. संशोधकाने आपल्या संशोधनाचा  अभ्यास करणे गरजेचा आहे. पूर्व संशोधन आढाव्याचा उपयोग, संशोधनाचा सखोल अभ्यास करण्यास व ज्ञान मिळवण्यासाठी होतो. पूर्व संशोधन आढाव्याची गरज पुढीलप्रमाणे.

१. संबंधित विषयातील पूर्वसंशोधनाचा आढावा घेतल्यामुळे पूर्वीच्या अभ्यासाची पुनरावृत्ती टाळता येते.
२. पुर्वीच्या अभ्यासामुळे विषयाची व्याप्ती निश्चित करता येते.
३. पूर्वीच्या अभ्यासामुळे विषयाची मर्यादा लक्षात येते.
४. एकाच घटकातील कोणत्या पैलूंवर संशोधन झाले याचे ज्ञान पूर्व संशोधनाच्या आढाव्यामुळे मिळते.
५. पूर्व संशोधनाच्या संशोधनकर्त्याने काढलेले निष्कर्ष व सुचवलेल्या शिफारशींचा उपयोग नवीन संशोधनात करता येतो.
६. संशोधनासाठी लागणाऱ्या वेळेची व पैशाची बचत पूर्वसंशोधनाच्या अभ्यासामुळे होते.
७. पूर्वीच्या अभ्यासामुळे संशोधन अहवाल लेखन, प्रकरण व उपपक्रकरण, पायऱ्या, रचना, अहवालाची मांडणी इ.बाबींची माहिती होते.

८. संशोधन विषयासंदर्भात असणाऱ्या पूर्व संशोधनात अभ्यासामुळे अचुक संशोधन पद्धती व तंत्रे, नमुना निवड, निष्कर्ष, विश्लेषण व शिफारशी इ. प्रमुख घटकांची माहिती होते. वरील मुद्यांचा विचार करता संशोधनात पूर्व संशोधनच्या आढाव्याची आवश्यकता लक्षात येते.

## २.३. पूर्व संशोधनाचा आढावा

**१. पुरंदरे ली.ना.ः पीएचडी, पुणे विद्यापीठ १९८५**

**संशोधन विषय ः मराठीतील मुलांची मासिके (संदर्भ–आनंद) एक अभ्यास १८५५ ते १९८० ः**

इ.स.१९८५ साली पुणे विद्यापीठ येथे पीएचडी पदवीसाठी हे संशोधन केलेले आहे. मराठी विषयातील प्रस्तुत संशोधनास सौ.लीला नारायण पुरंदरे यांना डॉ.गंगाधर नारायण जोगळेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

**या संशोधनात खालील निष्कर्ष मांडले आहेत.**

१. १८५५ मध्ये निघालेले 'सुमित्र' हे मुलांचे पहिले बालमासिक ठरते.

२. गेल्या १२५ वर्षात देशसेवा, समाज प्रबोधन, स्त्री शिक्षण, बालरंजन, शास्त्रीय ज्ञानाचा परिचय करुन देणे, मुलांना अनुवंशाने मिळालेल्या शक्तींना विकासास मदत करणे, परधर्माचे आक्रमण थांबवणे इ. अनेक हेतूंनी महाराष्ट्रात एतद्देशीय लोकांनी मराठीतील मुलांची मासिके काढलेली आते.

३. परकीय धर्मप्रसारकांनी काढलेली बालमासिके मुख्यतः धर्मप्रसारासाठीच काढलेली आढळतात.

४. बालवाङ्मयाच्या विकासाला व समृद्धीला बाल मासिके कारण झाली असून त्यांनी नवे–नवे वाङ्मय प्रकार रुढ करुन समृद्ध केलेले आहेत.

५. मुलांच्या वयानुसार आणि विद्यागटानुसार शब्दशक्तीचा विचार करुन त्यांना वाङ्मय पुरविण्याचा प्रयत्न काही मासिकांनी केलेला आढळतो.

६. मासिकांच्या संपादकांनी विपुल बालवाङ्मय निर्मिती केली आहे.

७. राष्ट्रभाषा हिंदीचा परिचय व आंतरभारतीचा प्रयत्न मुलांच्या मासिकात आढळतो.

८. मुलांचे रंजन करुन त्यांना ज्ञान देणे व सुसंस्कार करणे हे काम बालमासिकांनी केले आहे.

९. मुलांना उत्तम वाङ्मय निवडण्यास शिकवून त्यांच्या वाचनाला व अभिरुचीला वळण लावण्याचा प्रयत्न बाल मासिकात आढळतो.

१०. समाजात आज सर्व क्षेत्रात आढळणाऱ्या कर्तबगार व्यक्तींना बालवयात मराठी मासिकांनी मार्गदर्शन केले आहे.

११. पहिला दिवाळी अंक बाल मासिकाने काढला.

१२. बालवाङ्मयाला सुंदर चित्रांची व बालमानसशास्त्राची जोड बालमासिकांनी दिलेली दिसते.

१३. जगातील कोणत्याही भाषेतील बालवाङ्मय मुलांना समजणाऱ्या भाषेत प्राप्त झाल्यास, ती चांगला प्रतिसाद देतात.

१४. ज्या देशातील बाल मासिके चांगल्या दर्जाची असतात त्या देशातील मुलांचा विकास चांगला होऊन ते देशाच्या प्रगतीला हातभार लावतात.

१५. बालमासिकातील चित्रे काढणाऱ्या काही चित्रकारांची मुले साहित्यिक आहेत असे आढळले. हा केवळ योगायोग असावा असे वाटत नाही.

**२. शिंदे सु.भा. : पीएचडी, पुणे विद्यापीठ १९९३**

**विषय : 'बालबोधमेवा' चे बाल साहित्यविषयक कार्य**

**(इ.स.१८७३ ते १९९०),**

प्रस्तुत संशोधन इ.स.१९९३ साली पुणे विद्यापीठामध्ये पीएचडीसाठी केले असून सुनील भा.शिंदे यांना डॉ.गं.ना. मोरजे यांचे मार्गदर्शन लाभले.

मराठी मुलांच्या मासिकांचे स्वरुप व कार्य : ऐतिहासिक आढावा, मुलांचा भाग–स्वरुप व कार्य, 'बालबोधमेवा'चे स्वरुप, बालबोधमेव्यातील विज्ञानविषयक लेखन, समकालीन मुलांचे वाङ्मय आणि त्यातील बालबोधमेव्याचे स्थान इ.घटकांवर संशोधन करण्यात आलेले आहे.

**३. प्रा.टिळक वि. : पीएचडी, पुणे विद्यापीठ १९९५**

**'बालबोधमेवा' मासिकाचे वाङ्मयीन कार्य**

‘बालबोधमेवा’ मासिकाचे वाङ्मयीन कार्य’ या संशोधन विषयामध्ये जुलै १९२४ पासून डिसेंबर १९४२ च्या उपलब्ध ‘बालबोधमेवा’च्या अंकावर संशोधन करण्यात आले. यामध्ये बालबोधमेवातील कथात्मक वाङ्मय, कविता, संकीर्ण, सदरे लेखक व कवी इ. बाबींचे संशोधन झाले.

या संशोधनातील सारांश रुपाने अनुमान पुढीलप्रमाणे मांडले आहेत.

१. इ.स.१९२४ ते १९४२ या कालखंडातील बालबोधमेवातील कथात्मक वाङ्मय समृद्ध आहे.

२. अभ्यासीन कालावधीतील बालबोधमेवातील कवितांचे आशय वैविध्यपूर्ण आहेत. या कवितांमध्ये धार्मिक कवितांचे आशय वैविध्यपूर्ण आहेत. या कवितांमध्ये धार्मिक कवितांचे प्रमाण अधिक आहे. बहुतांश कविता उत्तम दर्जाच्या मात्र आशय प्रौढ आहे.

३. बालबोधमेवातील छोट्या मुलांसाठी असलेल्या प्राणीजीवनावरील बहुतेक नाटीका सुरस ठरल्या आहेत.

४. बालबोधमेवा मासिकात ज्ञानविज्ञानपर आणि ललित या दोन्ही प्रकारामध्ये विपुल संकीर्ण लेखन अंतर्भूत झालेले आहे.

५. बालवाङ्मयाचे वेगळेपण तत्कालीन संपादक, लेखक, परिक्षणकर्त्यांच्या लक्षात येऊ लागले होते. परंतु त्याविषयी सुक्ष्मपणे विस्तृत चिकित्सा करण्याची गरज भासलेली दिसत नाही. आलेल्या साहित्याला अगदी काटेकोरपणे बालवाङ्मयाच्या कसोट्या लावण्याचीही तयारी त्यात फारशी आढळत नाही.

६. ‘बालबोधमेवा’च्या अभ्यासीन कालावधीतील अंकामधून निरनिराळ्यापिढीतील, समाज स्तरातील व प्रादेशिकदृष्ट्या बृहन महाराष्ट्र राज्याच्या अनेक ठिकाणच्या लेखकांचे, कविंचे, साहित्यिकांचे प्रकाशित झाल्याचे दिसून आले.

वरील संशोधनास प्रा.विद्यागौरी टिळक यांना डॉ.दत्तात्रय दि.पुंडे यांचे मार्गदर्शन लाभले. हे संशोधन जानेवारी १९९५ मध्ये पूर्ण केलेले आहे.

**४. सौ.घोलप ल.रा. : पीएचडी. पुणे विद्यापीठ २००९**

**संशोधन विषय : 'किशोर' मासिकाचे वाङ्मयीन कार्य (प्रारंभ ते २०००) :**

प्रस्तुत संशोधन पुणे विद्यापीठांतर्गत मराठी विषयाच्या पीएचडी पदवीसाठी केलेले आहे. या संशोधनासाठी सौ. लता रामदास घोलप यांना डॉ.अविनाश आवलगावकर यांचे मार्गदर्शन लाभले. हा अभ्यास सन २००९ साली पूर्ण करण्यात आला. या विषयात किशोर मासिकाच्या सन १९७१ ते २००० पर्यंतच्या अंकाचा आढावा घेवून किशोरच्या वाङ्मयीन कार्याचा परामर्श घेतला.

या अभ्यासातून खालील अनुमान निघालेले आहेत.

१. बहुजन समाजातील विविध स्तरातील बालवाचकांना रुचतील, पेलतील अशा वेगळ्या अनुभवांचा अविष्कार करणाऱ्या साहित्याची मागणी किशोरने पुरविली.
२. प्रतिभावंत लेखकांच्या उत्तम व दर्जेदार कथांची कवितांची, नाटकांची भर मराठी बालवाङ्मयामध्ये पडू शकली.
३. बालवाचकांच्या अपेक्षा व आवश्यकतांनुसार रंजनाद्वारे मुलांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी प्रयत्न केले.
४. वाचकांच्या व लेखकांच्या पिढ्या घडविण्यास हातभार लावला.
५. बालवाचकांचा मानसिक, सामाजिक, भावनिक व भौतिक विकास साधणारे दर्जेदार साहित्य पुरविले.
६. कायम बोधवादाची भूमिका सोडून निखळ मनोरंजन देण्याचा प्रयत्न बऱ्याच प्रमाणात केलेला दिसतो.
७. बालवाङ्मयातील नव्या प्रवृत्तीचे संवर्धन व संगोपन 'किशोर' मधील साहित्याने महत्त्व जाणून लेखन केलेले दिसून येते.
८. संकीर्ण लेखनाने ज्ञानात महत्त्वाची भर घातल्याचे विविध अंगी व चौफेर सकस माहिती घेऊन मुलांचे ज्ञानसंवर्धन केले.
९. अनेक कथा मुलांना रंजक वाटतील अशा आहेत. कथेच्या बाबतीत दर्जेदार व सकस कथा बालवाचकांना पुरवून वाचकाची गोडी वाढविल्याचे दिसून येते.

**१०.** कवितांमध्ये कल्पकतेचे नाविन्य बालमनातील कुतूहलपुर्ती, अभिनयाला प्राधान्य तालासुरावर म्हणण्यासारखी चाल यामुळे आजही त्या सकस रसरशीत असल्याचे दिसते.

**५. डॉ.टिळक गिताली : पीएचडी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, २०१८**

**ए स्टडी ऑफ कंटेन्ट अनालिसीस ऑफ मराठी चिल्ड्रन्स पिरॉडीकल्स फॉर इनहन्सिंग मल्टिपल स्किल अमाँग द चिल्ड्रन्सः डॉ.गिताली टिळक**

प्रस्तुत संशोधन डॉ.गिताली टिळक यांनी ऑक्टोबर २०१८ मध्ये टि. म.विद्यापीठ पुणे येथे पूर्ण केले.

अभ्यासामुळे खालील गृहितकृत्ये सिद्ध केलेले आहेत.

1.Chlildren priodicals play a vital role in development of multiple intelligance of child.

2. All the modern media tool for develop of a child are not available to low income group.

3. Content in chlidren periodicals help develop multiple intelligence of the child.

4. Over viewing of television media is harmfull for child development.

प्रस्तुत संशोधनातून पुढील सुचना सांगितल्या आहेत.

**Suggestions for editors of children periodicals.**

1. There should be systematic approach for the contents in planning of the content.
2. In Multi language Skill newspapers can play a role including such features in th periodicals.
3. Similarly editor should include articales so that strenght of remembering good memory will be developed.

4. In Logical and mathematical intellignce classification and categorey, abacus or vedic maths should be included
5. In physical kinesthetic intellingence gardening, cooking should be included
6. Under interpersonal intelligence habbies, collection of stamp- coins, loving pets, Traing pets, Knowing Nature environmental problems, behaviour can be developed.
7. By introducing few competition special intellgance capacity can be developed like visualizing pictures, writing stories, jokes, thinking through pictures.

**२.४ संशोधन साहित्याच्या अभ्यासाची आवश्यकता.**

आपल्या संशोधन विषयासंबंधीची माहिती ज्या साहित्यात असते त्यास संबंधीत साहित्य म्हणतात. संशोधन साहित्याच्या आढाव्याची सामाजिक संशोधनात गरज असते.. संशोधनकार्य यशस्वी होण्यासाठी संशोधन अधिक चांगले होण्यासाठी संबंधीत साहित्याचा आढावा घेणे महत्त्वाचे.

आपल्या विषयाशी निगडीत व संशोधन विषयाला पुरक माहिती पुरवणाऱ्या साहित्याचा अभ्यास विषयाच्या यशस्वीतेसाठी करणे गरजेचे आहे. संशोधनाशी संबंधीत साहित्याच्या अभ्यासाची आवश्यकता खालील बाबीवरुन स्पष्ट होते.

१. संशोधन विषयी निगडीत असणारी माहिती संशोधनाच्या साहित्याच्या आढाव्यातून मिळते.
२. संशोधन साहित्याच्या आढाव्यामुळे संशोधनकर्त्याचे ज्ञान वृद्धिंगत होते.
३. संशोधन विषयासाठी पुरक माहिती संबंधीत साहित्याच्या आढाव्यातून मिळते.
४. अभ्यासाच्या निष्कर्षासाठी व शिफारशी सुचवण्यासाठी विषयाच्या संदर्भातील साहित्याचा आढावा संशोधनकर्त्याने घेणे गरजेचे असते.

५. संशोधनाची व्याप्तीचे, ज्ञान, मर्यादा व निष्कर्ष संबंधीत साहित्याच्या आढाव्यावरुन मिळतात. विविध संकल्पना, व्याख्या इ. महत्त्वाच्या घटकांचे ज्ञान संबंधीत साहित्याच्या अभ्यासातून मिळते.

६. विविध संकल्पना, व्याख्या इ. महत्त्वाच्या घटकांचे ज्ञान संबंधीत साहित्याच्या अभ्यासातून संशोधनकर्त्यास मिळते.

## २.५ : संशोधन साहित्याचा आढावा व वैशिष्ट्ये

विषय निश्चित झाल्यानंतर संशोधन विषयाच्या सखोल माहितीसाठी संबंधीत साहित्याचा अभ्यास अभ्यासकर्त्यास करावा लागतो. या साहित्यामध्ये संशोधनासाठी पुरक असलेले ग्रंथ, पुस्तके, लेख इ. समावेश होतो.

विषयाच्या सखोल संशोधनासाठी अनेक ग्रंथांचा, संदर्भ पुस्तकांचा अभ्यास संशोधनकर्त्याने केलेला आहे. साहित्याच्या अभ्यासाचा आढावा ग्रंथ निहाय, संदर्भपुस्तके निहाय पुढीलप्रमाणे आहे.

### १. लेले रा.के. (२००४) : मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन

वृत्तपत्रविद्या अभ्यासक आणि संशोधकासाठी हे पुस्तक अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. वृत्तपत्रविद्या व मुद्रित प्रसार माध्यमांचा अभ्यास, संवादशास्त्र, पत्रकारिता इ. विषयाचा अभ्यास या पुस्तकाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.

प्रस्तुत संदर्भग्रंथातून हिंदी वृत्तपत्र, अँग्लो इंडियन वृत्तपत्र, वृत्तपत्रांचा इतिहास स्पष्ट करण्यात आलेला आहे. भारतात वृत्तपत्राचा प्रारंभ होण्यापासून केसरी–मराठापर्यंतचा इतिहास या पुस्तकात मांडलेला आहे.

या ग्रंथात मराठी भाषीक वृत्तपत्रांची नोंद घेण्यात आलेली आहे. संकलनात्मक इतिहास लेले रा.के. यांनी प्रस्तुत ग्रंथात मांडला आहे. वृत्तपत्राची माहिती या ग्रंथातून मिळते.

मराठी वृत्तपत्र इतिहासाची सुरुवात 'दर्पण' या वृत्तपत्रापासून केलेली आहे. मराठी वृत्तपत्राच्या इतिहासाची मुद्रित माध्यमाच्या नोंद कालानुक्रमे घेतली आहे. काळातील प्रत्येक

प्रमुख मुद्रित माध्यमाची माहिती विस्ताराने दिलेली आहे. याबरोबरच वेगवेगळ्या ठिकाणाहून प्रकाशित झालेल्या वृत्तपत्रांचा आढावा संक्षिप्तपणे प्रस्तुत ग्रंथात लेखकाने मांडलेला आहे.

शासकीय धोरण , वृत्तपत्रावरील तत्कालिन निर्बंध, राजकीय पत्रकारिता, वृत्तसंस्था, वृत्तपत्रासंबंधीत कायदे इ. अनेक विषयांचे विविचन सूक्ष्मपणे प्रस्तुत ग्रंथात मांडलेले आहे. वृत्तपत्रविद्या अभ्यासकांसाठी आणि संशोधकांसाठी हे पुस्तक खूप उपयोगी आहे. वृत्तपत्र विद्या संदर्भातील अनेक विषयांची सखोल माहिती या पुस्तकामध्ये आहे. प्रस्तुत ग्रंथात मराठी वृत्तपत्रांचा वास्तवदशी इतिहास मांडण्याचा लेले रा.के. यांनी प्रयत्न केलेला आहे.

### २. जोशी वि.कृ. आणि लेले रा.के. : वृत्तपत्रांचा इतिहास

प्रस्तुत ग्रंथात इ.स.१७८० ते इ.स.१८८० या कालखंडातील वृत्तपत्रांच्या इतिहासाची माहिती मांडली आहे. वृत्तपत्रांचे बीजारोपण, पूर्वीची प्रसारमाध्यमे, मुद्रणकलेच्या विकासापासून निर्मिती ते हिंदुस्थानात मुद्रणकलेचा प्रसार होईपर्यंतचा इतिहास प्रस्तुत ग्रंथात लेखकाने मांडलेला आहे.

हिंदी वृत्तपत्रांची सुरुवात, शासनसंस्था आणि वृत्तपत्रे, बंगाली वृत्तपत्रे, दर्पण–प्रभाकरचा काळ इ. इतिहासाची मांडणी जोशी वि.कृ. आणि लेले रा.के. यांनी प्रस्तुत ग्रंथात केली आहे.

प्रस्तुत ग्रंथ हा वृत्तपत्रविद्याचा अभ्यास करणाऱ्यास आणि संशोधकास दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहे. मुद्रणकला शोधापासून मराठी,हिंदी, वृत्तपत्राची माहिती या पुस्तकामुळे होते. प्रारंभिक मराठी वृत्तपत्रांची माहिती पुस्तकात दिल्याने संबंधीत वृत्तपत्राचे वेगळेपण, तत्कालीन मराठी भाषा, तत्कालीन वृत्तपत्रांचे स्वरुप यांची कल्पना अभ्यासकास व संशोधकास येते.

हा ग्रंथ वृत्तपत्राचा इतिहास, विकास व वाटचाल या विषयाचा आढावा घेताना खुप उपयोगी ठरला. मराठी व हिंदी वृत्तपत्रांची माहिती या ग्रंथामुळे झाली. हिंदी वृत्तपत्रे, बंगाली वृत्तपत्रे, मराठी वृत्तपत्रे यांचा विकास प्रस्तुत पुस्तकामुळे स्पष्ट करता आला. म्हणून हे पुस्तक संशोधन कार्यास महत्त्वाचे आहे.

### ३. कानडे रामचंद्र गोविंद (१९३८)ः मराठी नियतकालिकांचा इतिहास
### मुंबई : कर्नाटक पब्लीशिंग हाऊस,

या पुस्तकातील माहिती वृत्तविद्या संशोधकास खुप उपयुक्त आहे. कानडे रा.गो. यांनी प्रस्तुत पुस्तकामध्ये नियतकालिकांचा अभ्यास सविस्तरपणे मांडलेला आहे. मराठी

नियतकालिकांच्या या वृत्तपत्राबाबत संशोधन करणाऱ्या संशोधकास मराठी नियतकालिके, वृत्तपत्र यांच्या इतिहासाची माहिती या पुस्तकातून मिळते.

प्रस्तुत पुस्तकामध्ये कानडे रा.गो. यांनी मुद्रणकला, भारतातील मुद्रणालये, युरोपीयन मिशनऱ्यांचे मुद्रणासंबंधी भारतातील कार्ये यांचाही इतिहास लिहीलेला आहे. यामध्ये मराठीची पहिली नियतकालिके यांची माहिती प्रस्तुत पुस्तकात आहे. नियतकालिकांच्या प्रगतीचे कालखंड, नियतकालिकांची कामगिरी, त्या कामगिरीचे तत्कालीन महत्त्व कानडे रा.गो. यांनी विषद केलेले आहे.

मराठी वृत्तपत्रांचा इतिहाससंदर्भात विश्वसनिय माहिती प्रस्तुत पुस्तकामधून मिळते. दर्पण, प्रभाकर, ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, सुधारक व अनेक वृत्तपत्रांची माहिती प्रस्तुत पुस्तकातून मिळाली.

वृत्तपत्र नियतकालिकांचा इतिहास मांडत असतांना प्रस्तुत पुस्तकामध्ये वृत्तपत्रीय वाङ्मयाचा परिचय वाचकांना करुन दिलेला आहे. वृत्तपत्रीय वाङ्मय परिचयामुळे इ.स.१८३२ पासून मराठी भाषेमध्ये प्रगती कशी झाली हे कळाले.

प्रस्तुत पुस्तकामुळे वृत्तपत्राच्या इतिहासाचा आढावा घेण्यास मदत झाली. वृत्तपत्र व नियतकालिकांच्या इतिहासाची माहिती प्रस्तुत पुस्तकामुळे झाली. मुद्रणकला, नियतकालिक, भारतातील मराठी वृत्तपत्र, भारतातील इतर वृत्तपत्रे इत्यादी इतिहासाची माहिती कानडे रा.गो. यांच्या प्रस्तुत पुस्तकामुळे माहिती झाली. प्रस्तुत पुस्तक वृत्तपत्रविद्यामध्ये संशोधन करणाऱ्यास खूप उपयुक्त आहे.

### ४. नाईक बापुराव (१९८०), भारतीय ग्रंथमुद्रण
### पुणे : कॅ.गो.गं. लिमये ट्रस्ट प्रकाशन,

भारतीय ग्रंथ मुद्रण हे पुस्तक नाईक बापुराव यांच्या व्याख्यानांचा संदर्भासह संग्रह आहे. या पुस्तकामध्ये संदर्भासह व्याख्यानांची मांडणी करण्यात आलेली आहे. मुद्रणकलेमध्ये, वृत्तपत्रविद्यामध्ये संशोधन करणाऱ्यास प्रस्तुत ग्रंथ उपयोगी आहे.

प्रस्तुत पुस्तकामध्ये मुद्रणकलेच्या शोधापासून मुद्रणाचा प्रसार व व्यापारी मुद्रणापर्यंतचा इतिहास स्पष्ट करण्यात आला. यामध्ये चिनमधील मुद्रण, युरोपमधील मुद्रण व्यवसायातील

प्रगती, भारतीय मुद्रणाचा प्रारंभ, मुंबई इलाक्यातील मुद्रण,राज्यात मुद्रण कलेचा प्रारंभ, विविध मुद्रणालये यांच्या इतिहासाचा आढावा मांडला आहे.

मुद्रणकलेच्या इतिहासाबरोबरच ग्रंथमुद्रणाची माहिती, ग्रंथनिर्मिती, ग्रंथमुद्रण व्यवसाय इ.अनेक मुद्रणकलेच्या अंगाची प्रस्तुत ग्रंथात ओळख करुन दिलेली आहे.

मुद्रण या विषयावरील मराठी भाषेतील अभ्यासपुर्वक असा हा पहिलाच ग्रंथ आहे. मुद्रणाची सुरवात, मुद्राच्या इतिहासाची माहिती, मुद्रण प्रक्रिया नाईक बापुराव यांच्या प्रस्तुत पुस्तकामुळे झाली. मुद्रणसबंधी संशोधन करणाऱ्यास, मुद्रण व्यावसायिकांस प्रस्तुत ग्रंथ खूप उपयोगी आहे.

**५. दाते शं.ग., काळे दि.वि., बर्वे शं.ना. (१९६९) : मराठी नियतकालिकांची सूचि**

**मुंबई : मराठी ग्रंथसंग्रहालय**

प्रस्तुत संदर्भसूची हा ग्रंथ मराठी नियतकालिक व वृत्तपत्रविद्या विषयामध्ये संशोधन करणाऱ्यास अत्यंत उपयुक्त आहे. या प्रस्तुत संदर्भग्रंथामध्ये मराठी नियतकालिकांचे वर्णनात्मक संग्रह आहे. या ग्रंथाचे 'वर्णन विभाग', 'संदर्भ विभाग' व 'परिशिष्ट विभाग' असे तीन विभाग करण्यात आलेले आहेत.

प्रस्तुत ग्रंथामध्ये इ.स.१८३२ पासून दि.३१ डिसेंबर १९५० या कालावधीत प्रकाशित झालेल्या विविध वृत्तपत्राची नोंद घेण्यात आलेली आहे. पुस्तकात एकूण १३७० नियतकालिकांचा आढावा आहे. यामध्ये साप्ताहिक, दाशाहिक, पाक्षिक, मासिक, वार्षिक इ. नियतकालिकांचा समावेश आहे. प्रस्तुत ग्रंथाची मांडणी काल, स्थळ, इ. चा विचार करुन केलेली आहे.

इसवी सन १८३२ ते इसवी सन १९५० मधील नियतकालिकांची मांडणी काळानुसार, स्थळानुसार केलेली आहे. विशिष्ट स्थळांतील, विभागातील आणि जिल्ह्यातील वृत्तपत्रांची मांडणी केल्यामुळे विशिष्ट स्थळाहून प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांची माहिती मिळते.

प्रस्तुत मराठी नियतकालिकांची संदर्भसूची हा ग्रंथ खूप महत्त्वाचा व मौलिक असा आहे. यामधून विविध विषयाचे नियतकालिक, विविध स्थळाकडून प्रसिद्ध होणारे नियतकालिक, कालानुक्रमे प्रकाशनास सुरुवात झालेले नियतकालिक यांचा इतिहास

संशोधनकर्त्यास ज्ञात झाला. नाशिक विभागातील  नियतकालिकांचा अभ्यास करणे या ग्रंथामुळे संशोधनकर्त्यास शक्य झाले.

### ६. पोतनिस वं.अ. (संपा,२०१०), मराठी पत्रकारितेतील ध्येयनिष्ठ कर्मयोगी नाशिकः गावकरी प्रकाशन

प्रस्तुत संपादकीय पुस्तकामध्ये दत्तात्रय शंकर उर्फ दादासाहेब पोतनीस यांना समकालीन असलेल्या मराठी वृत्तपत्रांच्या संपादकांचा परिचय करुन देण्यात आलेला आहे. हे संपादकीय पुस्तक दादासाहेब पोतनीस यांच्या जन्मशताब्दी निमीत्ताने प्रकाशित झाले.

प्रस्तुत पुस्तकामधून ना.भि.परुळेकर व सकाळ, जवाहरलाल दर्डा व लोकमत, नाशिक विभागातील वृत्तपत्रे यांच्या विषयी माहिती मिळाली. प्रस्तुत संपादकीय पुस्तकामध्ये वेगवेगळ्या नामवंत लेखकाने लेखन केलेले आहे. वृत्तविद्या विषयात संशोधन करणाऱ्या संशोधनकर्त्यास विविध नामवंत संपादक व वृत्तपत्राचा इतिहास ज्ञात होण्यासाठी हे पुस्तक उपयोगी आहे.

### ७. डॉ.बी.आर.धर्मेंद्र (२००६) : हिंदी पत्रकारिता और प्रमुख पत्रकार दिल्लीःअचिन्त्य प्रकाशन,

प्रस्तुत पुस्तक हे हिंदी भाषेत असून हिंदी भाषेची पत्रकारिता आणि प्रमुख पत्रकारांचा आढावा यात घेतलेला आहे. हिंदी भाषेतील सुरुवातीच्या वृत्तपत्रांचा आढावा घेण्यात आलेला आहे. या पुस्तकामधून हिंदी वृत्तपत्रांच्या इतिहासाविषयी माहिती मिळाली. यामध्ये उदंत्तमार्तंड, बनारस अखबार इ. प्रारंभिक वृत्तपत्रांच्या इतिहासाची माहिती या ग्रंथातून मिळते.

प्रस्तुत पुस्तकामध्ये  वृत्तपत्र, पत्रकारिता जग आणि भारतीय पत्रकारिता, वृत्तपत्रांची भाषा, हिंदी पत्रकारितेची भूमिका, संपादन इ. विविध विषयांवर डॉ.धर्मेंद्र बी.आर. यांनी सविस्तर लेखन केलेले आहे. मराठी व हिंदी वृत्तपत्रविद्या विषयामध्ये संशोधन करणाऱ्या संशोधनकर्त्यास हे पुस्तक मार्गदर्शक आहे.

**८.प्रियोळकर अ.का.(१९७४), हिंदुस्थानचे दोन दरवाजे.**

**मुंबई : धि. गोवा हिंदू असोसिएशन,**

प्रस्तुत पुस्तक हे कै.प्रा.प्रियोळकर अ.का. यांच्या लेखांचा संग्रह आहे. विविध वृत्तपत्रातून प्रकाशित झालेल्या संशोधनात्मक व माहितीपूर्ण एकूण ३७ लेख प्रस्तुत पुस्तकामध्ये आहेत.

पहिले मराठी वृत्तपत्र या प्रस्तुत पुस्तकातील लेख संशोधनकर्त्यास महत्त्वाचा आहे. यामध्ये 'मुंबापूर वर्तमान', 'मुंबई अखबार', 'दर्पण', 'वर्तमान पदवी' इ. वृत्तपत्रांचा इतिहास आहे. दृष्टीक्षेप टाकण्यात आलेला आहे.

हिंदुस्थानचे दोन दरवाजे या पुस्तकामुळे मुंबई प्रांतातील प्रारंभिक वृत्तपत्रांविषयी महत्त्वाची माहिती संशोधनकर्त्यास मिळाली.

**९.धारुरकर वि.ल. (२०११),पत्रकारितेचा दिपस्तंभ**

**आ.बाळशास्त्री जांभेकर, मुंबई :भारतीय समाज विकास अकॅडमी**

प्रस्तुत पुस्तक हे डॉ.धारुरकर वि.ल. यांनी अभ्यासपूर्ण संशोधनातून लिहीले आहे. जांभेकर यांच्या कार्याचा आढावा सखोलपणे घेण्यात आलेला आहे. या पुस्तकामुळे तत्कालीन वृत्तपत्राचे स्वरुप स्पष्ट होते. वृत्तपत्रविद्यामध्ये संशोधन करणाऱ्यास हे पुस्तक उपयुक्त व मार्गदर्शक ठरते

**१०.धारुरकर वि.ल. (२००८) जनसंवाद सिद्धान्त, औरंगाबाद : चैतन्य प्रकाशन,**

ज्येष्ठ संशोधन मार्गदर्शक डॉ.धारुरकर वि.ल. यांनी प्रस्तुत पुस्तकामध्ये जनसंवाद विषयावर झालेल्या सखोल ग्रंथलेखनाचा परामर्श घेतला आहे. संवादशास्त्राचे अधिष्ठान, जनसंवाद : उगम व विकास, संवाद सुत्र आणि व्यवहार, प्रसारमाध्यमे : पोहोच आणि उपलब्धता इ. विविध घटकांवर सखोलपणे व विस्तृत लेखन केलेआहे. जनसंवाद व वृत्तपत्रविद्या अभ्यासकांना हे पुस्तक उपयूक्त आहे.

**६. धारुरकर वि.ल. (१९९९), माध्यम दृष्टीकोन, औरंगाबादः चैतन्य प्रकाशन,**

प्रस्तुत पुस्तकामध्ये 'माध्यम'विषयी सखोल लिखान डॉ.धारुरकर वि.ल. यांनी केलेले आहे.

### ७. कुलकर्णी अ.रा. (२००४) : अशी होती शिवशाही, पुणे : राजहंस प्रकाशन

अशी होती शिवशाही या पुस्तकामध्ये नावाच्या निर्मितीपासून शिवशाहीपर्यंतची माहिती स्पष्ट केली आहे. प्रस्तुत पुस्तकातून महाराष्ट्र नावाची निर्मिती कशी झाली? याची माहिती मिळाली.

### ८. कुलकर्णी अ.रा.(२००४), कंपनी सरकार. पुणेःराजहंस प्रकाशन

कुलकर्णी अ.रा. यांनी प्रस्तुत पुस्तकात ईस्ट इंडिया कंपनीचा इतिहास, कंपनीचे भारतात आगमन, कंपनी संस्काराचा भारताच्या राजकारणात प्रवेश, पेशवेशाहीचा अस्त इत्यादी विविध धटकांवर महत्त्वपूर्ण विषयावर संदर्भासह लिखान केलेले आहे. प्रस्तुत पुस्तकातून पेशवाईचा शेवट, महाराष्ट्रात कंपनी सरकारचा राज्यकारभारात प्रवेश, इ.विषयी माहिती मिळाली.

### ९. शिंदे सरकार अशोकराव : मराठे प्राचीन महाराष्ट्र, इस्लामपूरःसह्याद्री प्रकाशन संस्था,

प्रस्तुत पुस्तकामध्ये सह्याद्री पवर्तताच्या निर्मितीपासून सातवाहन, शालिवाहन, शिलाहार, यादव इ. राजवटींची माहिती मिळाली. मराठे व प्राचिन महाराष्ट्र या पुस्तकामधून नाशिक विभागातील प्राचीन काळात राज्य करणाऱ्या राजवटींच्या इतिहासाची माहिती मिळाली. प्राचीन काळातील लोकजीवन, त्यावेळच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीचे ज्ञान प्रस्तुत पुस्तकामुळे झाले.

### १०. कुलकर्णी अ.रा.(२०११) मध्ययुगीन महाराष्ट्र, पुणे :डायमंड पब्लिकेशन्स.

प्रस्तुत पुस्तकात मध्ययुगीन इतिहासाचा आढावा कुलकर्णी अ.रा. यांनी घेतलेला आहे. यामधून मध्ययुगीन महाराष्ट्रातील इतिहास, लोकजीवन, बलुतेदार, पैठण इ. विषयी माहिती मिळाली.

धुळे, जळगाव, नंदूरबार यांना खानदेश म्हटले जाते. खानदेशाच्या इतिहासाची माहिती प्रस्तुत पुस्तकातून मिळाली. खानदेश नावाच्या उपपत्तीपासून फारुकी घराणे, पेशवे, इंग्रज या राजवटींची माहिती मध्ययुगीन महाराष्ट्र या पुस्तकातून मिळाली. नाशिक विभागाचा इतिहास, तत्कालीन लोकजीवन याविषयी माहिती प्रस्तुत पुस्तकातून मिळाली.

## ११. प्रा.काळे भगवान (१९८८), संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, जालना : संकेत प्रकाशन,

या प्रस्तुत पुस्तकामधून महाराष्ट्राच्या इतिहासाचा परामर्श घेतला आहे. प्रा.काळे भगवान प्रस्तुत ग्रंथाचे संपादक असून अनेक नामवंत लेखकांचे अभ्यासपूर्वक लेख यात आहेत. इतिहासाचा अभ्यास करतांना या पुस्तकातील डॉ.रमेश वामन अवलगावकर यांचा महानुभव साहित्यातील महाराष्ट्र हा लेख उपयोगी पडला.

महाराष्ट्र नावाची निर्मिती, प्राचिन काळात असणारे उल्लेख, मराठी भाषा, यादव काळातील वर्णन इ. प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास प्रस्तुत ग्रंथातून पहावयास मिळाला.

याबरोबरच संयुक्त महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्याची निर्मिती, प्राचीन कलावैभव, किर्तन परंपरा, महाराष्ट्रातील समाजकारण इ. अनेक विषयांची माहिती या पुस्तकातून मिळाली.

## १२. देशपांडे प्र.न.(२००२), छत्रपती शिवाजी महाराज, मुंबई : म.राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,

छत्रपती शिवाजी महाराज या पुस्तकामधून शिवकालीन इतिहासाचे, तत्कालीन सामाजिक प्रकरण व राजकीय जिवनाची माहिती झाली.

प्रस्तुत पुस्तकातून खानदेश मधील इतिहासाची, तत्कालीन राजकीय परिस्थितीची माहिती मिळाली.

## १३. बोरोले अमित (२०१२), दुर्गभ्रमंती नाशिकची, पुणेः स्नेहल प्रकाशन

बोरोले अमित यांच्या प्रस्तुत पुस्तकात नाशिकमधील जिल्ह्यातील गडकिल्ल्यांची माहिती दिली आहे. संशोधनासाठी उपयुक्त असणारी नाशिक जिल्ह्याची भौगोलिक, ऐतिहासिक माहिती मिळाली. प्राचीन काळात नाशिक जिल्ह्यातील बागलान व सर प्रदेशावर असणाऱ्या राजवटींची माहिती प्रस्तुत पुस्तकातून मिळाली. ऐतिहासिक माहिती बरोबरच भौगोलिक माहिती 'दुर्गभ्रमंती नाशिकची' या पुस्तकातून ज्ञात झाली.

१४. डॉ.बेसाणे अनिल, डॉ.कठारे अनिल आणि डॉ.पाटील सुभाष (२०११), शिवकाळ व पेशवाईतील दुष्काळाचा इतिहास, कंधारःपुनम प्रकाशन

प्रस्तुत पुस्तकामध्ये भौगोलिक रचना शिवपूर्वकाळातील दुष्काळ, दुष्काळ व त्याचे परिणाम इ.विषयांचा संशोधनात्मक इतिहास मांडलेला आहे. शिवाजी महाराजांच्या काळातील व पेशवाईतील दुष्काळाचा इतिहास या पुस्तकातून भौगोलिक परिस्थितीची माहिती मिळाली. महाराष्ट्राची भू रचना, हवामान, पर्जन्यमान, भुरुपे, जंगले इ. घटकांची माहिती या पुस्तकातून मिळाली.

१५. डॉ.सावळे/मोरे दी.दि.(२०१३) मराठ्यांचा इतिहास, औरंगाबादः एज्युकेशनल पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स.

या पुस्तकातून महाराष्ट्राची, राजकीय परिस्थिती, ग्रामीण जीवन, धार्मिक परिस्थिती, भौगोलिक परिस्थिती इ. विषयीची तत्कालीन माहिती मिळाली.

मौर्य, सातवाहन, यादव, खिलजी, बहामनी इ. राजवटींच्या इतिहासाची माहिती प्रस्तुत पुस्तकामुळे ज्ञात झाली.

१६. प्रा.घोटाळे रा.ना. (२००९) समाजशास्त्रीय संशोधनः तत्वे व पद्धती, नागपूर : श्री मंगेश प्रकाशन,

संशोधन ही एक वैज्ञानिक पद्धत आहे. संशोधनाचे वेगवेगळे तत्वे व पद्धती यांचे ज्ञान प्रा.घोटाळे रा.ना. यांच्या प्रस्तुत पुस्तकामधून झाले. विज्ञानाचा अर्थ, सामाजिक संशोधनाचा अर्थ, वैशिष्ट्ये, प्रकार इ.संशोधनाशी संबंधीत घटकांची माहिती या पुस्तकातून मिळाली.

संशोधनातील साम्यभेद, संकल्पना, अर्थ इत्यादींचे स्पष्टीकरण या पुस्तकात आहे.

सामाजिक संशोधनातील वस्तुनिष्ठतेची समस्या या घटकात वस्तुनिष्ठता अर्थ, महत्त्व, आवश्यकता, वस्तुनिष्ठतेतील अडचणी अथवा अडथळे इ. बाबींचे योग्य व अचुक स्पष्टीकरण या पुस्तकात मांडलेले दिसते. संशोधन आराखडा, तथ्य आणि संकलन, आशय विश्लेषण, समाजमिती, प्रक्षेपण तंत्रे, सामग्रीचे विश्लेषण आणि निर्वचन, वर्गीकरण, सारणीकरण इ. संशोधनातील महत्त्वपूर्ण बाबींची माहिती प्रस्तुत पुस्तकातून झाली.

### १७. प्रा.डॉ.मायी सुनिल (२००८), समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, पुणे : डायमंड पब्लिकेशन्स,

हे पुस्तक संशोधनकर्त्यास सहज आकलन होणारे आहे. प्रा.डॉ.मायी सुनिल यांच्या प्रस्तुत पुस्तकाची मांडणी साधी, सोपी व सुटसुटीत आहे. या पुस्तकाची भाषा सोपी असून नवीन संशोधकास संशोधनाच्या वेगवेगळ्या बाबी सहज आकलनात येतात.

प्रस्तुत पुस्तकामुळे संशोधन म्हणजे काय, वैज्ञानिक संशोधनाचे टप्पे, सामाजिक संशोधनाची प्रक्रिया इ. समाजशास्त्रीय संशोधनाशी संबंधीत बाबींची माहिती झाली. प्रस्तुत पुस्तकामध्ये डॉ.मायी सुनिल यांनी संशोधनाची उपयुक्तता, संशोधन प्रक्रियेचची गरज, संशोधकांच्या ठिकाणी आवश्यक गुण, सामाजिक संशोधन व समाज इ.अनेक महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकला आहे.

संशोधनातील महत्त्वाचे घटक, गृहितकृत्ये, आराखडा व प्रकार तथ्य संकलनाच्या पद्धती, नमुना निवड पद्धती संशोधनातील पद्धती, संशोधन अहवाल इत्यादींचा सुक्ष्म अभ्यास प्रस्तुत पुस्तकामुळे झाला.

### १८. प्रा.डॉ.खैरनार दिलीप (२०११), प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी, पुणेः डायमंड पब्लिकेशन्स,

सामाजिक संशोधन पद्धती संबंधीचे नवीन ज्ञान सरळ व साध्या पद्धतीने प्रा.डॉ.खैरनार दिलीप यांनी प्रस्तुत पुस्तकातून मांडले आहे.

संशोधनासाठी आवश्यक पद्धती, संशोधनासाठी उपयुक्त संगणकीय प्रणाली, तथ्यांचे आलेखीय प्रस्तुतीकरण इ. महत्त्वाच्या घटकांचा परामर्श या पुस्तकात आहे.

सामाजिक पद्धती, अर्थ, व्याख्या, संशोधनातील टप्पे, विविध प्रकार हे प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी या पुस्तकात सविस्तरपणे मांडले आहे.

सामाजिक संशोधनाचे तत्वज्ञानात्मक आधार, सामाजिक वास्तवतेचे स्वरुप, सिद्धांत निर्मिती इ. वास्तवतेचा दृष्टीकोन संशोधनाशी पुरक घटकांची माहिती या पुस्तकामुळे झाली. सहचर्याचे सहसंबंधाचे मापन, सहचर्या व्याख्या, तथ्यांचे रेखाचित्रीय व आलेखीय प्रस्तुतीकरण, चित्रांचे प्रकार, आलेखाचे प्रकार, रेखाचित्र व आलेख प्रस्तुतीकरणाचे रोष इ. बाबी प्रस्तुत पुस्तकामध्ये मांडल्या आहेत.

संशोधनात नवनवीन बाबींचा उपयोग कसा करावा याविषयीचे मार्गदर्शन केलेले आहे. सामाजिक संशोधनासाठी उपयुक्त असणारे योग्य सॉफ्टवेअरची निवड, तथ्यांना संगणकीय प्रणालीकरिता अूकूल करणे, विश्लेषणासाठी एसपीएसएसचा वापर, एसपीएसएस प्रणाली व मदत सुविधा इ. सामाजिक संशोधनातील नवीनतम बाबींचा सखोल परामर्श संबंधीत पुस्तकात घेण्यात आलेला आहे.

### १९. डॉ.आगलावे प्रदिप (२००७), सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूरःश्री साईनाथ प्रकाशन

डॉ.आगलावे प्रदिप यांच्या प्रस्तुत पुस्तकामुळे वैज्ञानिक पद्धत आणि संशोधन, वैज्ञानिक पद्धतीच्या पायऱ्या, सामाजिक संशोधन, वैशिष्ट्ये, सामाजिक संशोधनाचे महत्त्व व उपयोगीता, शोधकर्त्याचे आवश्यक गुण, भारतातील संशोधनातील विकासाचे टप्पे इ. महत्त्वाच्या घटकांची माहिती झाली.

प्रस्तुत पुस्तकामध्ये सामाजिक घटकांचे स्वरुप व सामाजिक विज्ञान, संशोधनातील समस्या सुत्रण, अर्थ, व्याख्या, महत्त्वाचे घटक, समस्या सुत्रणाची प्रक्रिया इ. घटकांचे ज्ञान प्रस्तुत पुस्तकातून मिळाले.

सामाजिक शास्त्रातील शैक्षणिक संशोधन, शैक्षणिक संशोधनाचा विकास, शैक्षणिक संशोधनाच्या पायऱ्या, साहित्यातील संशोधन, साहित्य संशोधनाची प्रक्रिया साहित्य संशोधनाचे स्वरुप व क्षेत्रे इ. विषयातील संशोधनविषयीचा सखोल अभ्यास या पुस्तकात आहे. या पुस्तकामुळे शैक्षणिक संशोधन, ऐतिहासिक संशोधन व साहित्य संशोधन यांची सखोल माहिती मिळते.

हे पुस्तक समाजशास्त्रीय संशोधन करणाऱ्या संशोधनकर्त्यास व अभ्यासकास महत्वपूर्ण आहे. सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्रातील एक महत्त्वाचा ग्रंथ म्हणून प्रस्तुत पुस्तकाकडे पाहिले जाते.

## २०. डॉ.बोरुडे रा.र. (२००५), संशोधन पद्धतीशास्त्र, पुणे : विद्यार्थीगृह प्रकाशन,

संशोधन पद्धतीशास्त्र हे पुस्तक विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधन, सामाजिक संस्था इत्यादी साठी महत्त्वपूर्ण आहे. संशोधन नेमके कसे करावे, संशोधनाच्या पद्धती, निष्कर्ष, इ. अनेक सामाजिक संशोधनाशी महत्त्वपूर्ण घटकांचे स्पष्टीकरण पुस्तकात आहे.

मानसशास्त्र विद्याशाखेत संशोधन करणाऱ्यास, शिक्षणशास्त्राचा अभ्यसा करणाऱ्यास हे पुस्तक खूप फायदेशीर आहे. या पुस्तकात प्रायोगिकरण, आंतर–समुह संशोधन आखणी, समुहांतर्गत आराखडे, संमिश्र आराखडे, घटक विश्लेषण इ. संशोधनाशी संबंधीत घटकांची माहिती इ. संशोधनाशी संबंधीत घटकांचे आलेली आहे. अहवाल लेखनाविषयीचे मार्गदर्शन, संशोधन अहवाल तयार करण्याचे टप्पे, संदर्भाची मांडणी इ. विषयाची माहिती डॉ.बोरुडे रा.र. यांच्या प्रस्तुत पुस्तकामधून मिळाली.

## २७. मासिक किशोर :

किशोर हे शालेय विद्यार्थ्यांकरिता दरमहा प्रसिद्ध होणारे मासिक आहे. सन २००८ ते २०१८ अळेरच्या अंकाचा अभ्यास या संशोधनात केला. मासिक किशोरच्या अभ्यासिन कालावधीतील विविध साहित्याचा अभ्यास प्रकाशित झालेल्या अंकामधून करण्यात आला. संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी मासिक किशोर अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले.

## २८. मासिक छावा :

मुलांसाठी प्रत्येक महिन्याला छावा प्रकाशित होते. अभ्यासिन विषयाचा भाग म्हणून छावाचा सखोल अभ्यास केला. सन २००८ ते २०१८ अळेरच्या अंकाचा अभ्यास संशोधनकामी केला आहे. छावाचे अभ्यासिन कालावधीत प्रकाशित केलेल्या विविध साहित्याचा अभ्यास विषयासाठी केलेला आहे. संशोधनासाठी मासिक छावाच्या अंकाचा उपयोग झाला.

वरील संशोधन साहित्याचा अभ्यास या संशोधन विषयासाठी. या साहित्याचा, संदर्भग्रंथाचा संशोधनासाठी उपयोग झाला.

**वैशिष्ट्ये :**

या अभ्यासासाठी संशोधनाकरिता वरील साहित्याचा वापर संदर्भ म्हणून घेण्यात आला आहे. या संदर्भ ग्रंथाची भाषा ही संशोधकास सहज अवगत होणारी आहे. प्रादेशिक भाषेत ग्रंथ असल्याने त्याची उपयुक्तता अधिक आहे.

## २.५ समारोप

पूर्व विषयाशी संबंधित साहित्याचा अभ्यास या प्रकरणात केला. विषयाशी संबंधीत घटकांचा अभ्यास करुन ज्ञान मिळवणे गरजेचे असते. पूर्व संशोधनाचा आढावा घेतल्यामुळे विषयाशी संबंधीत झालेल्या संशोधनाची माहिती मिळते. विषयाशी संबंधी सखोल माहिती पूर्व संशोधनाचा आढावा घेतल्याने मिळते.

संशोधन विषयाशी संबंधीत साहित्यामुळे विषयासंबंधीची माहिती, ज्ञान मिळते. संबंधीत घटकांच्या ज्ञान हे संशोधनाच्या वाटचालीसाठी उपयुक्त ठरते. संशोधन विषयाशी संबंधीत असणाऱ्या साहित्यामुळे संशोधनकर्त्यास संशोधन विषयाचे विविध पैलू समजतात. संशोधन साहित्य व पूर्व संशोधनाचा आढावा समाजशास्त्रीय संशोधनात पुनरावृत्ती टाळण्यासाठी महत्त्वाचा आहे.

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाशी संबंधीत साहित्य व पूर्व संशोधनाचा अभ्यास केला. प्रस्तुत प्रकरणात विषयाशी संबंधीत साहित्य व पूर्व संशोधनाचा आढावा स्वतंत्रपणे घेतला आहे.

या प्रकरणात पूर्व संशोधन, अभ्यासाची गरज अथवा आवश्यकता प्रस्तुत प्रकरणात मांडली आहे. विषयाशी संबंधी असणारे पाच पूर्व संशोधनाचा अभ्यास केला. विषयाच्या संबंधी साहित्याच्या अभ्यासाची आवश्यकता मांडून साहित्याच्या अभ्यासाचा अभ्यास प्रकरणात मांडण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरण संशोधनामध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे.

## प्रकरण : ३

# संशोधन कार्यपद्धती

१ प्रस्तावना

२ संशोधन

३ सामाजिक संशोधन

४ सामाजिक संशोधनाचे प्रकार

५. वृत्तपत्र संशोधन

६ संशोधन आराखडा

७ गृहितकृत्ये

८ मुलाखत

९ प्रश्नावली

१० संशोधन मर्यादा

११ समारोप

१२ संदर्भ

## ३.१ प्रस्तावना

मानव हा समाजशील व चिकित्सक प्राणी आहे. सर्वच मानवाच्या मुख्य गरजा सारख्या आहेत. मात्र गरजाभागवण्यासाठी मानव वेगवेगळ्या पद्धतीचा वापर कारतो. स्वतःच्या गरजा भागवण्यासाठी मानव वेगवेगळे प्रयोग करत राहतो. मानवाच्या गरजा भागवण्यासाठी झालेल्या प्रयत्नांतून संशोधन सुरु होते.

संशोधन हे सर्वच क्षेत्रामध्ये विषयामध्ये केले जाते. शास्त्रीय दृष्टीने नैसर्गिक विषयातील संशोधन आणि समाजशास्त्रीय विषयातील संशोधन झाले. समाजशास्त्रात यामध्ये मानसशास्त्र, नागरिकशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल, वृत्तपत्रविद्या इ. विद्याशाखांचा अंतर्भाव होतो. समाजशास्त्रीय विषयातील घटकांचे संशोधन हे शास्त्रीय पद्धतीनेच केले जाते. समाजशास्त्रीय संशोधनात वस्तुनिष्ठता असते. संशोधनासाठी मानवी स्वारस्य असणाऱ्या विषयावर संशोधन कार्य हाती घेण्यात येते. प्रस्तुत अभ्यासिन विषयाचा अभ्यास करतांना समाजशास्त्रीय संशोधनाच्या सर्वच पायऱ्यांचा आणि नियमांचा आधार घेतला आहे. या 'संशोधन कार्यपद्धती' प्रकरणात विविध उप्रकरणे असून अभ्यासिन विषयासाठी आवश्यक असणाऱ्या संशोधनाच्या सर्वच बाबींचा अभ्यास सदरील प्रकरणाच्या उपप्रकरणाद्वारे स्पष्ट करण्यात आलेला आहे. या प्रकरणामध्ये सर्वच महत्त्वाच्या बाबींचा आवश्यकतेनुसार आढावा घेण्यात आलेला आहे.

## ३.२. संशोधन

पुन्हा पुन्हा एखाद्या विषयाचा शोध घेण्याच्या प्रक्रियेला संशोधन असे संबोधले जाते. संशोधनास 'Research' हा इंग्रजी प्रतिशब्द आहे. Research या इंग्रजी शब्दाचा मराठी अर्थ पुन्हा पुन्हा शोध घेणे हा आहे. विज्ञान पद्धतीद्वारे नैसर्गिक विज्ञान आणि सामाजिक विज्ञानातील संशोधन केले जाते. सामाजिक विज्ञानात वस्तुनिष्ठता यावी म्हणून सामाजिक घटनांचे वैज्ञानिकदृष्ट्या अध्ययन केले जाते. नियमित चालणारी प्रक्रिया म्हणजे संशोधन. संशोधनाच्या निष्कर्षाअंती निवडलेल्या विषयाच्या संशोधनाला पूर्णविराम दिला जातो.

## ३.३ सामाजिक संशोधन

सामाजिक संशोधन कृती अथवा वर्तन, संस्कृती, इतिहास, धर्म, परंपरा, सामाजिक मनोवृत्ती इ. विविध बाबतीमध्ये केले जाते. नवीन तथ्ये शोधणे, जूने तथ्ये अथवा संकल्पना,

सिद्धांत यांचे परिक्षण करणे, त्यात सुधारणा करणे इत्यादीचा समावेश होतो. यामध्ये निरीक्षण, तथ्यांचे संकलन, वर्गीकरण, परिक्षण, निष्कर्ष इ. वैज्ञानिक पायऱ्यांचा उपयोग होतो.

**सामाजिक संशोधन व्याख्यांचा सारांश**

१. **श्रीमती पॉलीन व्ही. यंग** (Smt.Polin V.Young)

'' तार्किक आणि क्रमबद्ध या पद्धतीद्वारा नवीन तथ्यांचा शोध घेणे अथवा तथ्याचे पुन्हा परिक्षण करणे त्यांच्यात आढळून येणारे अनुक्रम, अंतःसंबंधी कार्यकारणभाव आणि त्यांना संचलित करणाऱ्या नैसर्गिक नियमांचे विश्लेषण हा आहे.''

२. **वेबस्टरच्या शब्दकोशानुसार** (Webster Dictonary)

'तथ्ये वा तत्वे शोधण्यासाठी केली जाणारी चिकित्सा म्हणजे संशोधन होय. एळादी बाब शोधण्यासाठी जाणीवपूर्वक व योग्य पद्धतीने केलेले प्रयत्न म्हणजे संशोधन.होय.

३. **बोगार्डस** (Bogardus)

' जीवनातील क्रियाशील अंतर्भूत प्रक्रियासंदर्भात केले जाणारे संशोधन.'

४. **हेरींग** (Herring)

'ज्ञान संपादनासाठीच नाही तर समजूती कालबाह्य ठरवण्यासाठी संशोधन असते. संशोधन संयमी प्रक्रिया असून सामाजिक शास्त्रात नकारात्मक प्रक्रिया सुद्धा आहे. '

५. **जे.डब्ल्यू.बेस्ट** (J.W.Best)

'संशोधन ही एक व्यवस्थित क्रिया होय, ज्याद्वारे शोध घेतला जातो आणि संघटित ज्ञानाच्या अंगाचा विकास केला जातो.'

वरील सारांशावरुन संशोधनविषयी माहिती, ज्ञान मिळते. सामाजिक घटना, सामाजिक समस्या, मानवसमुह संबंध इ. बाबतीत अध्यायनासाठी सामाजिक संशोधन ही वैज्ञानिक पद्धत उपयोगात आणली जाते. सामाजिक पद्धतीमध्ये अवैज्ञानिक पद्धतीचा आजीबात वापर केला जात नाही. बोगार्डसची व्याख्या सोपी असून सहज आकलन होणारी आहे. थोडक्यात समाजातील अंतर्गत गतीमान प्रक्रियांचे संशोधन म्हणजे सामाजिक संशोधन होय. सामाजिक संशोधन हे क्रमबद्ध व तार्किक आहे. सामाजिक संशोधन हे नवीन ज्ञान प्राप्तीसाठी केले जाते. जुने ज्ञान तपासून

पाहण्यासाठी अथवा विस्तृत करण्यासाठी उपयोगी असते. घटनांचा आढावा घेण्यासाठी नवीन तथ्ये अथवा तत्वे, जुन्या तथ्यांचे अथवा तत्वांचे परिक्षण करण्यासाठी, मानवी क्रिया–प्रतिक्रियातील कार्यकारण संबंधांचा शोधण्यासाठी सामाजिक संशोधन केले जाते.

वरील सर्वच व्याख्यांचा सारांश डॉ.प्रदिप आगलावे यांनी पुढीलप्रमाणे सांगितला आहे. ''सामाजिक संशोधन हे तार्किक व क्रमबद्ध पद्धतीवर निर्भर आहे. आणि या पद्धतीद्वारा सामाजिक जीवन व घडमोडींचा शोध घेतला जातो. पूर्वीच्या नियमांचे पुनर्परिक्षण करता येते आणि तथ्यांमध्ये आढळणाऱ्या अंतःसंबंध अनुक्रमांचे स्पष्टीकरण केले जाते.''[१]

## ३.४ : सामाजिक संशोधनाचे प्रकार

सामाजिक संशोधन हे विविध सामाजिक विषयात सामाजिक संशोधन केले जाते. ''सामाजिक संशोधन मानवी समाजाशी सहसंबंधीत असून संशोधनामागे अनेक उद्देश असतात. याच बरोबर हे संशोधन समाजात घडणाऱ्या घटनांशी संबंधीत असते. ज्या घटना भूतकाळात घडून गेलेल्या असतात, तर काही वर्तमान काळात घडत असतात.काही घटनांचे भावी स्वरुप जाणून घेण्याकरिता वर्तमानकाळात संशोधन करायचे असते.या घटना का घडतात? केव्हा घडतात? कोणत्या परिस्थितीत घडतात? इ. प्रश्नांचा शोध घ्यावयाचा असतो. या सर्व बाबींना अनुषंगून विशिष्ट लक्ष्याधारित दृष्टीकोनातून, संदर्भातून, परिप्रेक्षातून शोध घ्यायचा असतो'' [२] यावरुन विषयाच्या स्वरुपामध्ये, उद्दिष्टामध्ये वेगळेपण असते हे स्पष्ट होते. संशोधनाच्या स्वरुपानुसार आणि उद्दिष्टानुसार सामाजिक संशोधनाचे विविध प्रकार पडतात. ते प्रकार खालीलप्रमाणे आहेत.

**१. मुलभूत/ शुद्ध संशोधन** (Basic/Pure Research)

**२. उपयोजित संशोधन** (Applied Research)

**३. वर्णनात्मक संशोधन** (Descriptive Research)

४. **अन्वेषणात्मक/परिचयात्मक संशोधन**(Exploratory/formulative research)

५. **व्याख्यात्मक/कारणात्मक संशोधन** (Explanatory of Causal Research)

६. **प्रयोगात्मक संशोधन** (Experimental Research)

७. **क्रियात्मक संशोधन** (Action Research)

८. **मूल्यांकनात्मक संशोधन** (Evaluative Research)

## मुलभूत/ शुद्ध संशोधन (Basic Reserch)

संशोधनाचे संशोधनाच्या उद्देशानुसार व स्वरुपानुसार प्रकार पडतात. संशोधनाच्या विविध प्रकारामधील मुलभूत अथवा शुद्ध संशोधना महत्त्वाचा प्रकार आहे. या प्रकारास मौलिक संशोधन असेही म्हणतात.

हेरींग (Herring) ने मुलभूत अथवा शुद्ध संशोधनाची संकल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. '' मूलभूत संशोधनाचे सर्वाधिक महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे ज्ञानभांडारात वृद्धी घडवून आणणे. याचबरोबर आमच्या मस्तिष्कामध्ये असलेल्या विद्यमान शंकांचे आणि अव्यावहारिक सिद्धान्ताचे निराकरण करणे हे असते. '' हेरिंग ने शुद्ध संशोधनाचे महत्त्व वरीलप्रमाणे स्पष्ट केलेले आहे.

''सामाजिक जीवन आणि घटनांच्या संबंधात मौलिक सिद्धांत आणि नियमांचे संशोधन केले जाते. अशा संशोधनाचा उद्देश ज्ञान प्राप्त करणे, ज्ञानाची वृद्धी आणि जुन्या ज्ञानाची पुनर्परिक्षा करुन त्याचे शुद्धीकरण करणे हा आहे.''[3] याचा अर्थ मुलभूत अथवा शुद्ध संशोधन हे सिद्धांत आणि नियमांच्या बाबतीत केले जाते. समाजातील समस्या, नियम व तथ्ये यांच्याद्वारे सोडवल्या जातात. प्रत्यक्षदर्शी हे संशोधन समाजहिताकरिता उपयुक्त वाटत नसले तरीही अप्रत्यक्षरित्या या संशोधनातून मिळणारे ज्ञान समाजाच्या हिताचेच असते. या संशोधनात अभ्यासाची दिशा निर्धारित केली जाते. तथ्यांचे वर्गीकरण व तथ्यासंबंधीत भविष्यवाणी केली जाते.

## २. उपयोजित संशोधन (Applied Research)

हे संशोधन व्यावहारिक समस्या सोडवण्यासाठी केले जाते. ''मिळालेल्या ज्ञानाचा मानवी जीवनाच्या कल्याणाच्या हेतूने ह्या ज्ञानाचा व्यवहारिक उपयोग करावा हे या पद्धतीचे उद्दिष्ट आहे. या पद्धतीनुसार समस्यांचा शोध घेणे, समस्यानिर्मितीचा थांबवण्याचा प्रयत्न करणे आणि त्यांवर उपाययोजना सुचविणे ह्यावर भर असतो.''[४] याचा अर्थ उपयोजीत संशोधन हे समस्या शोधणे, समस्या निर्मितीस प्रतिबंध करणे आणि समस्या निर्माण झाल्यास उपाययोजना सुचविणे यासाठी केले जाते. सामाजिक व्यवस्था, जीवन, परिवर्तन इत्यादी बाबतीत ज्ञानाचा विकास करणे, तथ्यांचे प्रक्रीयात्मक अध्ययन करणे. नवनवीन सिद्धांतांचा शोध घेणे, जून्या संकल्पनांची पूर्ण व्याख्या करणे, नवीन संकल्पनांची निर्मिती करणे, इत्यादी संदर्भात उपयोजीत संशोधन केले जाते. श्रीमती पॉलीन यंग यांनी उपयोजीत संशोधनाच्या बाबतीत पुढील मत मांडले आहे. 'संशोधनाचा एक निश्चित संबंध लोकांच्या प्राथमिक आवश्यकता आणि कल्याणाशी असतो.' यावरुन मानवाच्या प्राथमिक गरजा आणि लोककल्याण याचा संबंध उपयोजीत संशोधनाशी आहे.

## ३. वर्णनात्मक संशोधन (Descriptive Reserch)

समस्यासंबंधी सत्य माहिती एकत्रित करुन क्रमबद्ध, तार्किक वर्णन केले जाते. '' या प्रकारचे ठळक वैशिष्ट्ये असे की, यामध्ये समाविष्ट असलेल्या परिवर्त्यावर (Variables) संशोधकाचे काहीही नियंत्रण नसते. त्याचे कार्य इतकेच की, जे काही घडले आहे किंवा घडत आहे यांची नोंद घेणे इतकेच, जसे लोकांना कोणत्या गोष्टी आवडतात, ते कोणता ब्रँड (उदा.साबण) जास्त प्रमाणात खरेदी करतात, कोणत्या प्रकारच्या मोटारीला जास्त प्रमाणात मागणी आहे. यात तुलनात्मक आणि सहबंधात्मक संशोधन प्रकाराचा समावेश होतो. ''[५] याचा अर्थ वर्णनात्मक संशोधनात परिवर्त्यावर संशोधनाचे नियंत्रण नसते. संशोधनकाचा दृष्टीकोन, संशोधकाची आवड इत्यादी बाबींचा प्रभाव संशोधनावर पडणार नाही ही काळजी संशोधकास घ्यावी लागते. या संशोधनात समग्र समस्येचा अभ्यास न करता अध्ययनासाठी समस्येचा एखादा पैलू निवडला जातो.

अभ्यासिन विषय वर्णनात्मक संशोधनमध्ये येतो. वरील डॉ.रा.र.बोरुडे यांच्या[५] संदर्भानुसार तुलनात्मक आणि सहसंबंधात्मक संशोधन हे वर्णनात्मक संशोधनात येते. या अभ्यासिन विषयाचे संशोधन वर्णनात्मक संशोधन प्रकारात मोडते.

### ४. **अन्वेषणात्मक /परिचयात्मक संशोधन** (Exploratory/Formulative Research)

''जेव्हा एखादा विषय किंवा समस्या यासंबंधी संशोधनात प्रारंभ केला जातो. तेव्हा जर त्या समस्येसंबंधी सामान्य माहिती उपलब्ध नसेल अशा अशा समस्येमागील कारणाचा शोध घ्यावयाचा असतो, तेव्हा अन्वेषणात्मक संशोधनाचा वापर केला जातो. प्राथमिक माहितीच्या आधारे तथ्य सामग्री एकत्रीत करुन गृहीतकाची निर्मिती करुन संशोधनाच्या दृष्टीकोनातून योजना तयार केली जाते.'' [६] याचा अर्थ अपरिचीत समस्या परिचय करुन घैण्यासाठी अन्वेषणात्मक अथवा परिचयात्मक संशोधनाचा वापर केला जातो. नवीन समस्याचे संशोधन करण्यासाठी हा संशोधन प्रकार उपयुक्त आहे.

### ५. **व्याख्यात्मक / कारणात्मक संशोधन** (Explanatory of causal Research)

सामाजिक घटनांमागील कारणांची परिकल्पना मांडण्यासाठी व्याख्यात्मक किंवा कारणात्मक संशोधन महत्त्वाचे असते. उदा. शेतकऱ्यांची गरिबी कमी का होऊ शकत नाही, बालविवाह  आणि समाज, कर्मचारी संघटना आंदोलनाचा मार्ग का निवडतात, इ. समस्यांचे संशोधन व्याख्यात्मक अथवा कारणात्मक संशोधनाद्वारे केले जाते.

### ६. **प्रयोगात्मक संशोधन** (Experimental Research)

चॅपिन (Chapin) यांच्या मते,'संशोधनात प्रयोगात्मक संशोधन नियंत्रीात्मक स्थिती अंतर्गत निरीक्षणाद्वारा मानवीय संबंधाचे अध्ययन करण्याकडे संकेत करते. ' याचा अर्थ प्रयोगात्मक संशोधनात मानवीय संबंधाचे अध्ययन नियंत्रणात्मक स्थितीत केले जाते. संशोधनाच्या वेळेस समुहावर नियंत्रण आणावे लागत असल्याने या संशोधनाची प्रयोगपश्चात परिक्षण, पूर्वपश्चात प्रयोग आणि कार्योत्तर तथ्य प्रयोग या तीन भागात मांडली जाते.

## ७.क्रियात्मक संशोधन (Action Reserch)

गुड आणि हॅट यांच्या मते, 'ज्या कार्यक्रमाचा विद्यमान स्थितीमध्ये परिवर्तन करणे हा उद्देश असतो. मग ती गलिच्छ वस्तीची स्थिती, वांशिक तणाव पूर्वग्रह किंवा एका संघटनेची प्रभावशीलता असो.'

गुडआणि हॅटच्या मतानुसार क्रियात्मक संशोधनाचा विद्यमान स्थितीमध्ये परिवर्तन करणे हा मुख्य उद्देश आहे. एखाद्या सामाजिक समस्या बाबतीत संशोधन करुन निष्कर्षाचा उपयोग सामाजिक परिवर्तन करण्यासाठी केला जातो. व्यावहारिक संशोधनाशी क्रियात्मक संशोधन हे मिळते जुळते असून व्यवहारिक व क्रियात्मक घटना क्रियात्मक संशोधनातून सोडवल्या जातात.

## ८.मूल्यांकनात्मक संशोधन (Evaluative Reserch)

शासकीय योजनांची फलीते पाहण्यासाठी मूल्यांकनात्मक संशोधन केले जाते. वर्तमान काळातील विविध शासकीय योजनांचे फलित काय आहे याचा शोध घेतला जातो. शासनाच्या योजनेचे उद्दिष्ट साध्य झाले किंवा नाही? याचे मूल्यमापन या संशोधनातून केले जाते. शिक्षण, आरोग्य, कृषी, अर्थ, बाल संरक्षण, दारिद्र्यनिर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन इत्यादी योजनेची परिणामकारकता शोधण्यासाठी मूल्यांकनात्मक संशोधन केले जाते.

सामाजिक संशोधनाच्या या प्रकाराबरोबरच खालील सामाजिक संशोधनाचे प्रकार आहेत.

९. **गुणात्मक संशोधन** (qualitative Reasearch)

१०. **संख्यात्मक संशोधन**(qualitative Reasearch)

११. **संकल्पनात्मक संशोधन** (Conceptual Reasearch)

१२. **अनुभवाधिष्ठीत संशोधन** (Empiracal Reasearch

संशोधनाचे विविध प्रकार आहेत. परंतु सर्वच संशोधन प्रकारांचा मूख्य हेतू समस्या निराकरण, नवीन ज्ञानाचा शोध, जुन्या ज्ञानाचे परिक्षण हा आहे. सर्वच सामाजिक संशोधनात माहितीवर प्रक्रिया करुन अचुक निष्कर्ष मांडतात.

## ३.५ वृत्तपत्र संशोधन/वृत्तविद्या संशोधन

वृत्तपत्रांची प्रमुख कार्य  माहिती देणे, विश्लेषण करणे, शिक्षण देणे आणि मनोरंजन करणे हे आहेत. वृत्तपत्राची कार्य हे मानवी जीवनाशी संबंधीत आहेत. विविध प्रकारच्या प्रसारमाध्यमांशी वृत्तपत्राला स्पर्धा करावी लागते. 'दुरचित्रवाणी माध्यमांशी स्पर्धा करतांना वृत्तपत्रे अधिक सखोल व समृद्ध बनत आहेत. समाजातील उच्च वर्गाची सेवा करणाऱ्या नियतकालिकांची संख्या वाढत आहे. त्याच्या खपात, स्थानात तसेच रचना व निर्मिती कार्यामध्ये संपूर्ण परिवर्तन घडून येत आहे.''[७] याचा अर्थ स्पर्धात्मक युगात वृत्तपत्रामध्ये परिवर्तन घडून आलेले आहे. म्हणून वृत्तपत्राशी निगडीत बाबींचे घटकांचे संशोधन होणे गरजेचे आहे. 'सामाजिक घटकाविषयी ज्ञानाच्या कक्षात ज्या संशोधनामुळे भर होऊ शकते, त्याला सामाजिक संशोधन म्हणतात. सामाजिक शास्त्रामध्ये अशा सामाजिक संशोधनाला फार महत्त्व असते. वृत्तपत्रविद्या समाजशास्त्राची ज्ञानशाखा आहे हे स्पष्ट होते.' [८] यावरुन वृत्तपत्रविद्या ही सामाजिक शास्त्राची पुरक ज्ञानशाखा आहे. वृत्तपत्रामुळे मानवाला विविध घटनांची माहिती होते. शिक्षण मिळते व मनोरंजन होते. म्हणून वृत्तपत्रीय संशोधन सामाजिक संशोधनाचा प्रकार आहे. '' वृत्तपत्र हे मुद्रित माध्यम असल्याने ते विश्वासार्ह जनमत तयार करते, त्याशिवाय या माध्यमाद्वारे पसंतीची प्रक्रिया बारकाईने अभ्यासता येते. समाजापुढे कोणते प्रश्न आहेत? ते कशा प्रकारे सोडवावेत, त्यातून प्राधान्यक्रम कशाप्रकारे ठरवायचा ते या माध्यमाच्या दिशादर्शनातून स्पष्ट होते.''[९] यावरुन समाजापुढील विविध प्रश्न, समस्यांचा प्राधान्यक्रम, समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना इ. विविध घटकांचे अध्ययन वृत्तपत्रीय संशोधनात करता येते.

वृत्तपत्रीय संशोधनात वृत्तपत्रातून अथवा नियतकालिकातून प्रकाशित आशय, विविध माहिती, बातम्या, लेखकांचे लेख, संपादकीय लेख इत्यादी सामुग्रीचा आशय समजावून घ्यावा लागतो. वाचक वर्ग अथवा वृत्तपत्राशी संबंधीतांचे सर्वेक्षण करावे लागते. वृत्तपत्र संशोधनासाठी वेगवेगळे प्रकार संशोधनाच्या स्वरुपानुसार व उद्दिष्टानुसार वापरावे लागतात. विषयाच्या स्वरुपानुसार आराखड्यातही वेगळेपण येते. वृत्तपत्राचे बदलते स्वरुप, वृत्तपत्राची इतर'' माध्यमांशी स्पर्धा, वृत्तपत्रातील आशय, त्याचा समाजजीवनावर होणारा परिणाम इ. अनेक

वृत्तविद्या विषयाशी संबंधीत घटकांचा अभ्यास सामाजिक संशोधनातून केला जातो. प्रस्तुत संशोधन हे वृत्तविद्या संशोधन विषयाचे आहे.

## ३.६ संशोधन आराखडा

कोणतेही काम यशस्वीपणे पार पाडायचे असल्यास त्या कामाचे परिपूर्ण नियोजन करावे लागते. नियोजनाशिवाय कोणतेही काम दिशाहीन होते म्हणून कामाच्या अथवा कार्याच्या यशस्वीतेसाठी नियोजन खूप गरजेचे आहे. '' सामाजिक संशोधनाचा प्रवास हा दीर्घकाळ चालणारा व बराचसा गुंतागुंतीचा असतो. या काळात संशोधकाला त्या अभ्यास विषयात स्वतःला पूर्णपणे गुंतवून ठेवावे लागते. अशा वेळी संशोधन कशा पद्धतीने पुढे जात राहील याचे नियोजन तयार करुन त्या बरहुकूम सगळ्या गोष्टी घडतात की नाही हे पाहत राहणे संशोधकाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.'' [१०] यावरुन सामाजिक संशोधनात संशोधन आराखड्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे हे सिद्ध होते. अध्ययन सुरु करण्यापूर्वीच संशोधन विषयाचा आराखडा तयार करावा लागतो. संशोधनाचा कालावधी, संशोधनात येणाऱ्या अडचणी, त्या सोडवण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, संशोधनाचा उद्देश, संशोधनासाठी आवश्यक माहिती गोळा करणे, माहितीचे विश्लेषण इ. अनेक घटकांचा विचार संशोधन आराखड्यात करावा लागतो. संशोधन आराखड्यामुळे संशोधनात सुसूत्रता येवून वेळ, पैसा, श्रम यांची बचत होते.

आराखड्याच्या बाबतीत प्रमुख व्याख्या खालीलप्रमाणे.

**विमल सहा :** ''आराखडा म्हणजे अभ्यासाची योजना असते. नियंत्रीत व अनियंत्रीत, व्यक्तीनिष्ठ व वस्तुनिष्ठ अशा प्रत्येक अभ्यासात योजना तयार केली जाते.''

**एफ.एन.केरलिंगर** (F.N.Kerlinger) : '' संशोधन आराखडा, संशोधनाची एक योजना, संरचना आणि एक अशी रणनिती आहे ज्याद्वारे संशोधन प्रश्नांची उत्तरे प्राप्त केली जातात आणि भिन्नत्व प्रसरणावर नियंत्रण ठेवले जाते.''

**ऐकॉफ :** (Ackoff) ''निर्णय कार्यान्वीत करण्याची स्थिती येण्यापूर्वीच निर्णय निर्धारित करण्याच्या क्रियेला आराखडा असे म्हणतात.''

वरील विविध व्याख्यावरुन संशोधन आराखड्याचा अर्थ स्पष्ट होतो. समस्येच्या निर्धारणापासून संशोधन अहवाल पूर्ण होईपर्यंतच्या विविध टप्प्यांचा बारकाईने विचार संशोधन

आराखड्यात होतो. संशोधन आराखड्यात अध्ययनाचा विषय, अध्ययनासाठी आवश्यक असणारे माहितीचे स्त्रोत, विषयाचे क्षेत्र व विश्व, माहितीचे विश्लेषण इत्यादी अनेक बाबींचा विचार सुक्ष्मपणे करावा लागतो.

''कोणत्याही संशोधन आराखड्याचे दोन मुलभूत उद्देश असतात. संशोधन समस्यांची उत्तरे पुरविणे किंवा प्राप्त करणे हा संशोधन आराखड्याचा पहिला उद्देश होय. ही उत्तरे विश्वसनीय, वस्तुनिष्ठ अचूक असावीत तसेच आथिकदृष्ट्या परवडणारी असावीत. संशोधन समस्यच्या संदर्भात अनुभवप्रामाण्य पुरावा आणण्यासाठी प्रसरणावर (Variance) नियंत्रण ठेवणे हा संशोधन आराखड्याचा दुसरा उद्देश होय. ''[११] याचा अर्थ संशोधन समस्यांची उत्तर पुरविणे आणि विभिन्न प्रसरणाचे नियंत्रण हे संशोधन आराखड्याचे प्रमुख दोन उद्देश आहेत. संशोधन आराखडा संशोधनात खूप उपयोगी आहे. अचुक अनुमानापर्यंत पोहचण्यासाठी, संशोधनासाठी उपलब्ध असणाऱ्या साधनांचा योग्य व प्रभावीपणे वापर करण्यासाठी, तथ्यांचे संकलन व अचुक निष्कर्षासाठी संशोधन आराखडा आवश्यक आहे.

''सामाजिक संशोधनात समाज तसेच समाजातील गट, उपगट, संस्था इत्यादीचे अध्ययन केले जाते. प्रत्येक अध्ययनाचे उद्दिष्ट, आधार, दृष्टीकोन, परिप्रेक्ष इ. वेगवेगळे असतात. संशोधन समस्याचे तसेच उद्देशाच्या भिन्नतेच्या आधारावर विविध विचारवंतांनी संशोधन आराखड्याचे प्रकार वर्णन केलेले आहेत. साधारणतः संशोधन आराखड्याच्या प्रकारांचे वर्गीकरण, संशोधनाचे उद्देश आणि संशोधनाचे दृष्टीकोन यावर केले जाते.''[१२] याचा अर्थ अध्ययनाच्या उद्देशाच्या आधारावर व अध्ययनाच्या दृष्टीकोनाच्या आधारावर संशोधन आरखड्याचे वर्गीकरण केले जाते. आराखड्याचे उद्दिष्टांच्या आधारे पुढीलप्रमाणे प्रकार पडतात.

१. अन्वेषणात्मक/परिचयात्मक संशोधन आराखडा.(Exploratory or Formulative Research Design)
२. वर्णनात्मक संशोधन आराखडा (Deseriptive Research Design)
३. निदानात्मक संशोधन आराखडा (Diagnostic Research Design)
४. प्रयोगात्मक संशोधन आराखडा (Experimntal Research Design)
५. वैयक्तिक अध्ययन संबंधीत संशोधन आराखडा

अध्ययनाच्या दृष्टीकोनाच्या आधारावर संशोधन आराखड्याचे पुढील प्रकारात वर्गीकरण केले जाते.

१. सर्वेक्षणात्मक संशोधन आराखडा
२. क्षेत्रअध्ययन संबंधीत आराखडा
३. प्रयोगासंबंधी संशोधन आराखडा
४. ऐतिहासिक संशोधन आराखडा
५. वैयक्तिक अध्ययन संबंधी संशोधन आराखडा

संशोधन आराखड्याचे वरीलप्रमाणे विविध प्रकार पडतात.

**अन्वेषणात्मक/परिचयात्मक संशोधन आराखडा** (Exploratory or formulative research design)

अन्वेषणात्मक अध्ययनामुळे संशोधकाला त्या विषयाशी संबंधीत असणाऱ्या विविध पैलूंची माहिती होते. तसेच त्या विषयाचे अध्ययन ज्या स्थितीत करण्याचा विचार असतो त्या स्थितीचीही चांगली माहिती होते. अध्ययनात येणाऱ्या अडचणींचीही जाणीव होते.[१३] यावरुन अज्ञात तथ्यांचा शोध घेवून मानवी ज्ञानाची वृद्धी करणे हे उद्दिष्ट अन्वेषणात्मक अथवा परिचयात्मक संशोधन आराखड्यात साध्य होते. अन्वेषणात्मक संशोधनाद्वारे विविध समस्या जाणून घेतल्या जातात.

टी.काटझ यांनी केलेल्या अन्वेषणात्मक आराखड्याच्या व्याख्येचा सारांश.

'' या अध्ययनामुळे संशोधन समस्येचे स्वरुपीकरण्यासाठी आवश्यक असणारेज्ञान संशोधनकर्त्यास प्राप्त होऊ शकते. असे ज्ञान पुढे ज्याची चाचणी घेण्यासाठी संशोधन करायचे आहे, अशा गृहितकृत्याच्या निर्मितीसाठी फायद्याचा ठरतो.''

अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याचा वापर करुन पुर्वनिर्धारित गृहितकृत्याचे तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात परिक्षण करता येते, अपरिचीत अभ्यास क्षेत्रात गृहितकृत्याचा आधार प्राप्त करुन देता येतो, महत्त्वाच्या समस्येकडे संशोधकाचे लक्ष वेधले जाते. इ. सह अनेक कार्य अन्वेषणात्मक आराखडा द्वारे पार पाडतात.

## १. **निदानात्मक संशोधन आराखडा** (Diagnostic Rearch Design)

''सामाजिक समस्येच्या कारणांचा किंवा निदानांचा शोध घेणे तसेच मिळालेल्या ज्ञानाच्या आधारे एखाद्या विशिष्ट समस्येच्या निराकरणाचे उपाय शोधून काढणे हे या (निदानात्मक) संशोधन आराखड्याचे उद्देश आहेत''[१४] यावरुन निदानात्मक संशोधन आराखड्यात समस्येचे कारण शोधून ती समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना सुचविली जाते.

प्रथम गृहितकृत्याची निर्मिती निदानात्मक संशोधन आराखड्यात केली जाते व त्यानंतर संशोधन पुढे जाते. सामाजिक व्यवस्था व सामाजिक संबंधातून तयार झालेल्या सामाजिक समस्यांना सोडवण्यासाठी व सामाजिक समस्यांचा कारणांचा शोध निदानात्मक संशोधन आराखड्याद्वारे घेतला जातो. निदानात्मक संशोधन आराखड्याचा वापर करणारा संशोधक हा 'संशोधक' या नात्याने फक्त समस्यावरील उपाययोजना सांगतो. या संशोधकाचे काम फक्तउपाययोजना सांगणे आहे. उपाययोजना प्रत्यक्षात अमलात आणण्याचे काम संबंधीत प्रशासनाचे अथवा नेते यांचे असते.

## २. **प्रयोगात्मक/परिक्षात्मक संशोधन आराखडा** (Experimental Research Design)

स्टुअर्ट चॅपिन (Stuart chapin) : ''संशोधनात प्रयोगात्मक आराखड्याची संकल्पना ही नियंत्रणाच्या अवस्था अंतर्गत निरीक्षणाद्वारा मानवीय संबंधाच्या व्यवस्थीत अध्ययनाकडे संकेत करते.'' नैसर्गिक शास्त्रात प्रयोगाचा उपयोग करुन संशोधन केले जाते. नैसर्गिक शास्त्राप्रमाणेच समाजशास्त्रात निरीक्षण परिक्षणाद्वारे घटनांचा पद्धतीर अभ्यास प्रयोगात्मक अथवा परिक्षणात्मक संशोधन आराखड्याद्वारे केला जातो.

प्रयोगात्मक अथवा परिक्षणात्मक संशोधन आराखडा तयार करतांना प्रायोगिक व नियंत्रीत गटाची निवड केली जाते. परायत चलाचे (Dependant variable) मापन करण्यासाठी लागणाऱ्या वेळेचे नियोजन या आराखड्यात केले जाते.

### ३. वर्णनात्मक संशोधन आराखडा (Descriptive Research Design)

डॉ.आगलावे यांच्या मते,''एखाद्या व्यक्ती, समुह, समाज, घटना किंवा कोणत्याही विषय वा समस्यांच्या वास्तविक तथ्यांचे, वैशिष्ट्यांचे वर्णनात्मक विवेचन प्रस्तुत करणे हा वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा मुख्य उद्देश आहे.''[१५] याचा अर्थ वर्णनात्मक आराखड्यात अभ्यास विषयातील समुह, व्यक्ती, विषय यांच्या लक्षणाचे वर्णन असते. अभ्यास विषयाचे विवेचन करता यावे म्हणून अभ्यास विषयाची संपुर्ण माहिती करुन घेणे गरजेचे असते.

वैज्ञानिक तंत्राच्या आधारे वापर करुन वर्णनात्मक आराखड्यात तथ्ये संकलित केली जातात. वर्णनात्मक आराखड्यात अध्ययन विषयाची निवड ही विचारपूर्वक करावी लागते. तथ्यांचे संकलन करण्यासाठी तथ्य संकलनाच्या योग्य तंत्राची निवड संशोधनकर्त्यास करावी लागते. वर्णनात्मक आराखडा तयार करतांना संशोधकास विषयासंबंधी संतुलित दृष्टिकोन ठेवून वस्तुनिष्ठता बाळगावी लागते.

वर्णनात्मक आराखड्यामध्ये विशिष्ट पायऱ्यांनुसार संशोधन करावे लागते. या पायऱ्या क्रमशः वापराव्या लागतात. यामध्ये सर्वप्रथम संशोधनाच्या उद्दिष्टांचे निरुपण करावे लागते. संशोधन विषयाचे उद्दिष्ट ठरविल्यानंतर तथ्य संकलनाच्या तंत्राची निवड ही पायरी असते. तथ्य संकलन तंत्राची निवड केल्यानंतर नमुना निवड केली जाते. त्यानंतर वैज्ञानिक तंत्राच्या आधारे तथ्यांचे संकलन करुन तपासणी केली जाते. तथ्यांचे संकलन झाल्यानंतर वर्गीकरण, सारणीकरण व अहवाल लेखन ही पायरी येते.

अभ्यासिन संशोधन विषयासाठी वर्णनात्मक आराखडा वापर करण्यात आला आहे. अभ्यासिन विषयाचे सर्वप्रथम उद्दिष्टे निश्चित करण्यात आले. आशय विश्लेक्षण, परिक्षण, वर्गीकरण इ. वर्णनात्मक  आराखड्याच्या सर्वच पायऱ्यांचा वापर क्रमशः अभ्यासिन विषयात करण्यात आला आहे.''अन्वेषणात्मक आराखड्याप्रमाणेच या (वर्णनात्मक) आराखड्याच्या प्रकारातही संशोधन विषयाशी बरीचशी माहिती वेगवेगळ्या बाहेरील तथ्यांच्या माध्यमातून संशोधकाला असणे अपेक्षित आहे. या प्रकारच्या आराखड्यामध्ये संशोधनातील इतर सर्व मुद्यांचा सविस्तर आढावा संशोधकाने घेणे महत्त्वाचे असते.''[१६] याप्रमाणे संशोधन विषयाच्या सर्व मुद्यांचा सविस्तर आढावा संशोधकाने घेतला आहे.

## ३.७ गृहितकृत्ये (Haypothesis)

संशोधन समस्येबाबत प्रारंभिक  स्वरुपाचे ज्ञान, अनुभव संशोधकास असतात. याच ज्ञानाच्या, अनुभवानुसार संशोधन समस्येच्या अनेक बाबींबाबत अनुमाने विधानाच्या स्वरुपात मांडले जातात. संभाव्य उत्तरामुळे अथवा अनुमानामुळे संशोधक आपले लक्ष आवश्यक तथ्यांवर केंद्रित करतो. या संभाव्य उत्तरास अथवा अनुमानास 'गृहितकृत्ये' संबोधले जाते.

गृहितकृत्यास उपकल्पना असेही म्हणतात. ''उपकल्पना म्हणजे ज्याच्या आधारावर संशोधन करायचे असते असे कार्यवाहक कामचलावू अनुमान होय''[१७] याचा अर्थ गृहितकृत्यानुसारसंशोधनअसून  गृहितकृत्ये सत्यच ठरतात असे नाही. गृहितकृत्ये तथ्यांच्या आधारावर सत्य अथवा असत्य ठरु शकतात.

**पॉलीन व्ही. यंग** (Polin V. Young) : ''गृहहितकृत्याची निर्मिती वैज्ञानिक संशोधनाचे अंतिम उद्दिष्ट नाही. अध्ययनाचा विषय सत्य आहे हे सिद्ध करण्यासाठी संशोधनकार्यात गृहितकृत्य  निर्माण केले जात नाही. वैज्ञानिक संशोधनाचे अंतिम उद्दिष्ट हे सत्याचा शोध घेणे हा आहे.''

**गुडआणि हॅट** (Goode and Hatt) : ''गृहितकृत्य म्हणजे असे विधान आहे की, ज्याची समप्रमाणता ठरविण्यासाठी परक्षिण करतात व ते परिक्षण संशोधनासाठी उपयुक्त असते.''

**बोगार्डस** (Bogardes) : परिक्षण केल्या जाणाऱ्या विधानांना गृहितकृत्य संबोधले जाते.

समाजशास्त्रीय व्याख्यावरुन गृहितकृत्याची संकल्पना सपष्ट होते. गृहितकृत्ये हे कामचलावू अनुमान, अथवा कल्पना असतात. संशोधनाची दिशा गृहितकृत्यामुळे निश्चित होते..

''सामान्यतः एक श्रेष्ठ, आदर्श, चांगले किंवा उपयोगी गृहितकृत्य त्यास म्हणता येईल की, जे उपलब्ध पद्धतीच्या माध्यमातून जास्तीत जास्त तथ्यांना एकत्रित करण्यास सहाय्यक होऊ शकेल आणि कमीत कमी प्रस्तुती करील.'' [१८] डॉ.दिलीप खैरनार यांच्या

मतानुसार,आदर्श, श्रेष्ठ गृहितकृत्य हे जास्तीत जास्त तथ्यांना एकत्रित करणारे आणि कमीत कमी प्रस्तुती करणारे असावे.

गृहितकृत्य स्पष्ट स्वरुपात असावे. गृहितकृत्य हे अध्ययन विषयाशी संबंधीत आणि संशोधन कार्याला मार्गदर्शक असावे. गृहितकृत्य हे विशिष्ट पैलूशी संबंधीत आणि अनुभवयोग्य असावेत. समस्येचे पर्यायी उत्तर आणि साधे, सरळ असावे. गृहितकृत्यात क्लिष्ट, गोंधळ घालणारे शब्द नसावेत. गृहितकृत्य हे वैज्ञानिक व वस्तुनिष्ठ असावे.

आपले वैयक्तिक अनुभव, विचार, ज्ञान, परिस्थिती, साहित्य, सामाजिक संबंधातून संशोधकाला गृहितकृत्ये सुचत असतात.

लुंडबर्ग (Lundberg) : यांच्या मते ''एका उपयोगी गृहितकृत्याच्या शोधात आपण कविता, साहित्य, मानवजाती शास्त्र, कलाकारांचे काल्पनिक सिद्धान्तात किंवा अशा गंभीर विचारांच्या सिद्धान्ताच्या संपूर्ण जगात विहार करु शकतो. ज्यांनी मनुष्याच्या सामाजिक संबंधाच्या गहन अध्ययन कार्यात आपल्यास वाहून घेतले आहे.''

लुंडबर्ग यांनी गृहितकृत्यांचे स्त्रोत सांगितले आहेत. यामध्ये वैयक्तिक अथवा खाजगी स्त्रोत आणि बाह्य स्त्रोत यांचा अंतर्भाव होतो. संशोधकाची अंतदृष्टी, कल्पना,विचार, अनुभव, अभ्यास इत्यादीचा समावेश वैयक्तिक अथवा खाजगी स्त्रोतांमध्ये होतो. बाह्य स्त्रोताअंतर्गत कल्पना, कथा, कविता, साहित्य, तत्वज्ञान, सिद्धांत, नाटक, कादंबरी इत्यादीचा समावेश होतो. व्यक्तीगत अनुभवांच्या आधारावर केलेली गृहितकृत्याची निर्मिती ही वैयक्तिक स्त्रोतामुळे होते. अन्य व्यक्तिच्या विचाराच्या आधारावर केलेली गृहित कृत्याची निर्मिती ही बाह्य स्त्रोतामुळे होते.

एम.एच.गोपाल यांनी गृहितकृत्याची एकूण सहा प्रमुख स्त्रोत सांगितले आहेत. यामध्ये सांस्कृतिक पर्यावरण, लोकबुद्धी किंवा प्रचलित विश्वास आणि प्रभा, विशेष विज्ञान, सादृश्यता, स्वीकृत सिद्धांचा अपवाद, व्यक्तिगत अनुभव आणि मौलिक प्रतिक्रिया इत्यादीस्त्रोतांचा समावेश होतो.

वेगवेगळे प्रकार अनेक विचारवंतांनी सांगितले आहेत. हेज (Hays), मॅक्गयूगण (Macguigan), गुड आणि हॅट (James black and dean champion), जेम्स ब्लॅक व चॅम्पियन, हेज (Hays) यांनी सरळ गृहीत कृत्य (Simple hypothesis) व

जटील गृहित कृत्य (Complex hypothesis), गुड आणि हॅट यांनी अनुभवाधिष्ठीत एकरुपतेशी संबंधीत गृहितकृत्य, जटिल आदर्श प्रारुपाशी संबंधीत गृहीतकृत्य, विश्लेषणात्मक चलांशी संबंधित गृहितकृत्य इत्यादी विचारवंतांनी कृहितकृत्याचे प्रकार स्पष्ट केले आहेत.

गृहितकृत्य संशोधनात मोलाची कामगिरी पार पाडतात. संशोधकास संशोधनकार्यात दिशादर्शक भूमिका गृहितकृत्य पार पाडतात.

पूर्वी माहिती असणणाऱ्या अभ्यासातून जुळवलेल्या तथ्यांच्या आधारावर गृहितकृत्याची पडताळणी करण्याचे काम अभ्यासक करतो. '' अप्रकटपणे का होईना पण अशा गृहितकृत्यांची मांडणी केल्याखेरीज संशोधन कार्य पुढे सरकणेच कठीण असते. कारण गृहितकृत्ये ही संशोधन कार्यास निश्चित दिशा दाखविण्याचे कार्य करीत असतात.'' [१९] याचा अर्थ गृहितकृत्याविना संशोधन यशस्वी होऊ शकत नाही.

गृहितकृत्ये अध्ययनास निश्चितता प्राप्त करुन देतात, संशोधनाची दिशा निर्धारित करतात, अभ्यास विषयास मर्यादित करण्याचा प्रयत्न गृहितकृत्य करतात.

वृत्तपत्रीय संशोधनातही गृहितकृत्य महत्त्वाची भूमिका पार पाडतात. वृत्तपत्र संशोधकास गृहितकृत्य संशोधन विषयाची व्याख्या करण्यास गृहितकृत्य सहाय्यभूत ठरतात. वृत्तपत्र संशोधन कार्यात निश्चितता आणण्यासाठी गृहितकृत्य महत्त्वाची असतात. संशोधन विषयात तथ्य संकलन कार्यात, निष्कर्ष शोधण्याच्या कार्यात गृहितकृत्य सहाय्यभूत ठरतात.

संशोधन विषयाचे गृहितकृत्य खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत.''

## गृहितकृत्ये

१. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमातील मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य मुलांच्या संदर्भात असणाऱ्या विविध बाबींचा विचार करुन निवडले जाते.

२. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य मुलांच्या वेगवेगळ्या साहित्य प्रकारास कमी–अधिक प्रमाणात स्थान देतात.

३. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य अभ्यासक्रमातील विविध विषयांशी संबंधीत असते.

४. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या साहित्यामुळे मुलांच्या भाषीक कौशल्य (क्षमता) विकसनास मदत होते.

५. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य वाचनामागील मुलांचा हेतू वेगवेगळा असतो.

६. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य मुलांवर मुल्यसंस्कार करण्यासाठी उपयोगी आहे.

## २.८ मुलाखत

'मुलाखत' या शब्दाचा वारंवार वापर मानवाच्या जीवनात नेहमी होतो. एखाद्या बाबीवरील चर्चा, नोकरी मिळवतांना दिलेली 'इंटरव्ह्यु' इ. बाबींना आपण मुलाखत म्हणतो. ''मुलाखत तंत्राचे एक अतिशय महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या तंत्राचा उपयोग करतांना संशोधनकर्ता व ज्यांच्याकडून माहिती मळवायची आहे अशा व्यक्तींचा (मुलाखतदाता) प्रत्यक्ष 'समोरासमोर' (face to face) संबंध येत असतो. मुलाखतदात्यांशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करुनच त्याच्या भावना आणि मनोवृत्तीचे क्रमबद्ध अध्ययन केले जाते.''[२०] यावरुन मुलाखत तंत्रामध्ये संशोधक व मुलाखतदाता यांचा संबंध येत असल्याने मुलाखत दात्याच्या भावना आणि मनोवृत्तीचेही अध्ययन करता येते.

**एम.एन.बसू** (M.N.Basu) : ''मुलाखतीची अशी व्याख्या करता येईल की, काही विषयावर व्यक्तींची समोरासमोर झालेली बैठक होय.'' याचा अर्थ समोरासमोर काही विषयावर झालेली चर्चा म्हणजे मुलाखत होय.

**हँडर आणि लिंडमन** (Hader and lindman) : ''मुलाखतीत दोन किंवा अधिक व्यक्तीमधील संवाद किंवा मौखिक प्रतिसाद असतो.'' यावरुन दोन किंवा अधिक व्यक्तींच्या संवादाला मुलाखत म्हणतात.

संशोधनात मुलाखत तंत्राद्वारे व्यक्तीच्या भावना, विचार, प्रवृत्ती इत्यादी प्रत्यक्ष चर्चा आणि संवाद करुन जाणून घेता येतात.

प्रत्यक्ष आणि समोरासमोरील संपर्कातून माहितीचे संकलन मुलाखत तंत्राद्वारे करता येते. मुलाखतीद्वारे व्यक्तिगत आणि गुणात्मक तथ्यांचे ज्ञान संशोधनकर्त्यास मुलाखत दात्याकडून मिळते.

प्रस्तुत अध्ययन विषयात किशोर व छावा संपादकाच्या मुलाखती घेण्यात येणार आहे. अभ्यासिन विषयाच्या संपादकाच्या मुलाखतीतून मिळालेली वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारे

संशोधन कार्य पुढे जाणार आहे. माहितीचे संकलन करुन विश्लेषण व निष्कर्ष काढण्यात येणार आहे. त्या आधारे उद्दिष्टांची पूर्तता होईल व गृहितकृत्यांची पडताळणी करण्यात येणार आहे.

### ३.९ प्रश्नावली

''प्रश्नावलीच्या माध्यमातून केवळ प्रश्नांची उत्तरेच अपेक्षिली जात नाहीत तर एखाद्या प्रश्नाविषयी पालकांची मते काय आहेत, याचाही अभ्यास त्याद्वारे केला जातो. म्हणजेच उत्तरदात्यांची मते, भूमिका, अभिवृत्ती, आवडी–निवडी हे सर्व समजण्यासाठी प्रश्नावली सारखे प्रभावी माध्यम वापरले जाते.'' [२१] यावरुन प्रश्नावलीद्वारे प्रश्नांच्या उत्तराबरोबरच उत्तरदात्यांची मते, भूमिका, आवडीनिवडी समजून घेतल्या जातात.

वेगवेगळ्या विचारवंतांनी प्रश्नावलीचे विविध प्रकार सांगितले आहेत. प्रश्नावलीची रचना, प्रश्नांचे स्वरुप आणि तथ्यांचे स्वरुप या आधारावर प्रश्नावलीचे विविध प्रकार पडतात. प्रश्नांच्या स्वरुपाच्या आधारावरुन प्रश्नावलीचे चार प्रकार पडतात. यामध्ये

१) बंदिस्त प्रश्नावली (Closed questionnaive)

२) मुक्त प्रश्नावली (Open questionnaive)

३) चित्रमय प्रश्नावली (Pictorial questionnaive)

४) मिश्रीत प्रश्नावली (Mixed questionnaive)

या प्रकारांचा समावेश होतो. या संशोधनासाठी बंदिस्त प्रश्नावली (Closed questionnaive) वापरण्यात येणार आहे.

चारशे शिक्षकांना बंदिस्त प्रश्नावली देण्यात येणार आहे. नाशिक विभागातील प्रत्येक जिल्ह्यातील प्रत्येकी ऐंशी शिक्षकांनी प्रश्नावली भरुन घेण्यात येणार आहे.

| | | |
|---|---|---|
| अहमदनगर | : | ८० शिक्षक |
| नाशिक | : | ८० शिक्षक |
| जळगाव | : | ८० शिक्षक |
| धुळे | : | ८० शिक्षक |
| नंदुरबार | : | ८० शिक्षक |

वरील प्रमाणे शिक्षकांकडून बंदिस्त प्रश्नावली सोडवून घेतली जाणार आहे..

शिक्षकांच्या व पालकांच्या मदतीने बंदिस्त प्रश्नावली सोडवून घेतली जाणार आहे. शिक्षकांनी भरलेल्या माहितीच्या आधारे माहिती संकलन करण्यात येणार आहे. यानंतर विश्लेषण व निष्कर्ष मांडण्यात येणार आहेत.

| | | |
|---|---|---|
| अहमदनगर | : | १२० विद्यार्थी |
| नाशिक | : | १२० विद्यार्थी |
| जळगाव | : | १२० विद्यार्थी |
| धुळे | : | १२० विद्यार्थी |
| नंदुरबार | : | १२० विद्यार्थी |

प्रश्नावलीच्या सहाय्याने संशोधन करण्यात येईल.प्राथमिक शिक्षकांकडून, शिक्षक व पालक यांच्या सहाय्याने मुलांकडून प्रश्नांची उत्तरे मिळवण्यात अडचण येणार नाही.

बंदिस्त प्रश्नावलीमध्ये सर्व उत्तरे पर्यायाच्या स्वरुपामध्ये द्यावे लागते. उत्तरदात्याला उपलब्ध पर्यायामधील उत्तर निवडून खूण करावी लागते. उत्तरदात्याला स्वतः मत, विचार नोंदवण्याची सोय नसते. बंदिस्त प्रश्नावलीचे उत्तरे द्यायला सोपे जाते. त्यामुळे उत्तरदाता सर्वच प्रश्नांची उत्तरे देतो. उत्तरदात्याकडून मिळालेल्या उत्तरातून माहिती प्राप्त होते. सदरील माहितीचे वर्गीकरण सहजपणे करता येते. मात्र सर्वच प्रकारच्या समाजशास्त्रीय संशोधनात बंदिस्त प्रश्नावली वापरता येत नाही.

### ३.१० संशोधन मर्यादा

संशोधनातील अभ्यासिन मुद्रित माध्यमांचा कालावधी दि.१ जानेवारी २००८ ते ३१ डिसेंबर २०१८ हा आहे. या संशोधनात संपूर्ण मुलांच्या माध्यमाचा अभ्यास करण्यात आलेला नाही.

### ३.११ समारोप

वैज्ञानिक दृष्टीने संशोधन पद्धती सर्वात महत्त्वाची आहे. संशोधन पद्धतीमध्ये संशोधनाच्या संबंधीत घटकांचा अंतर्भाव होतो. संशोधन म्हणजे काय, या प्रश्नापासून निष्कर्षापर्यंत सर्व पायऱ्या संशोधन पद्धतीशी संबंधीत असतात.

या प्रकारामध्ये माध्यमाशी संबंधीत असणाऱ्या संशोधन पद्धतीच्या विचारवंतांनी केलेली व्याख्या व सामाजिक संशोधनाची व्याख्या प्रस्तुत प्रकरणात मांडली आहे.

संशोधनाचे वेगवेगळे प्रकार, वृत्तपत्र संशोधन, संशोधन आराखडा संबंधीत असणाऱ्या घटकांचा सखोल अभ्यास या प्रकरणात मांडला आहे.

गृहितकृत्याच्या स्पष्टीकरणासह विषयाचे गृहितकृत्य स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहेत. संशोधनाच्या अनुषंगाने अभ्यासिन मासिकांच्या संपादकाच्या मुलाखती, शिक्षकांसाठी प्रश्नावली, मुलांसाठी प्रश्नावली यांचा अभ्यासही प्रस्तुत प्रकरणात केला आहे. संशोधनाच्या दृष्टीकोनातून हे प्रकरण महत्त्वपूर्ण असून संशोधन पद्धतीचा आढावा या प्रकरणात घेतला आहे.

## संदर्भ


१. डॉ.आगलावे प्र.(२०१०) सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे. नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन.पान १९

२. डॉ.खैरनार दि. (२०११) प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी. पुणे : डायमंड पब्लीकेशन्स. पान : ३०

३. डॉ.आगलावे वे.प्र. उपरोक्त : पान २६

४. प्रा.घाटोळे रा.ना. (२००९) समशास्त्रीय संशाधेन तत्व पद्धती. नागपूर : श्री मंगेश प्रकाशन. पान १० आणि ११

५. डॉ.बोरुडे रा.र.(२००८)संशोधन पद्धतीशास्त्र.पुणे :पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन पान ४

६. डॉ.खैरनार दि. (२०११) उपरोक्त  पान : ३५ व ३६

७. डॉ.धारुरकर वि.ल. (२००८)  जनसंवाद सिद्धान्त. औरंगाबाद : चैतन्य प्रकाशन.पान–८७.

८. पाटील ज.स.(२०११) पीएच.डी.प्रबंध : आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील वृत्तपत्रांवर झालेला परिणाम. पान ५०

९. डॉ.धारुरकर वि.ल.(१९९९)माध्यम दृष्टीकोन.औरंगाबादः चैतन्य प्रकाशन.पान ३६.

१०. डॉ.मायी सु. (२००८), सामाजिक संशोधन पद्धती.पुणे : डायमंड पब्लिकेशन्स. पान ४३

११. डॉ.आगलावे प्र. (२०१०) उपरोक्त : पान १५७

१२. डॉ.खैरनार (२०११) दि.: उपरोक्त : पान १५३

१३. प्रा.घोटाळे रा.ना. (२०११) : उपरोक्त : पान ५७

१४. डॉ.खैरनार दि. (२०११) : उपरोक्त : पान १६०

१५. डॉ.आगलावे प्र.(२००८): उपरोक्त : पान १६८

१६. डॉ.मायी सु. (२००८):उपरोक्त : पान ५२

१७. प्रा.घोटाळे रा.ना. (२००९) : उपरोक्त : पान ४०

१८. डॉ.खैरनार दि. (२०१०) : उपरोक्त : पान १३४

१९. सानप ना.प्र. पीएडी शोध प्रबंध (२००२) : मराठवाड्यातील सहकारी साखर कारखान्याचा जनसंपर्क : बीड जिल्ह्यातील साखर कारखान्याचा विशेष अभ्यास डॉ.बा.आं.मराठवाड विद्यापीठ पान ५९.

२०. डॉ.आगलावे प्र. (२०१०) : उपरोक्त : पान २४९

२१. डॉ.मायी सु (२००८) : उपरोक्त : पान १३६.

प्रकरण : ४

# माहिती संकलन व आशय विश्लेषण

१. प्रस्तावना

२ माहिती संकलन : छावा

३ माहिती संकलन : किशोर

४ पृष्ठसंख्या व मुखपृष्ठ : विश्लेषण (छावा व किशोर)

५ आशय विश्लेषण : छावा

अ.प्रसिद्ध साहित्याच्या प्रकारानुसार आशय विश्लेषण

ब.घटकनिहाय प्रसिद्ध मजकूर : आशय विश्लेषण

६ आशय विश्लेषण : किशोर

अ.प्रसिद्ध साहित्याच्या प्रकारानुसार आशय विश्ले

ब.घटकनिहाय प्रसिद्ध मजकूर : आशय विश्लेषण

७ शिक्षक सर्वेक्षण : तथ्यांचे विश्लेषण

८ मुलांचे सर्वेक्षण : तथ्यांचे विश्लेषण

९ अभ्यासिन मासिक संपादकाच्या मुलाखती : आशय विश्लेषण

१० समारोप

११ संदर्भ

**प्रस्तावना**

विषय पूर्णत्वापर्यंत पोहचण्यासाठी अभ्यासिन घटकाच्या माहितीचे एकत्रीकरण करावे लागते. माहिती मिळवणे आणि तिच्यावर प्रक्रिया करणे विषयाच्या अचुक निष्कर्षासाठी आवश्यक असते. अनुसुची, प्रश्नावली, निरीक्षण आणि दुय्यम साधनांचा वापर माहिती मिळवण्यासाठी होतो. प्राथमिक स्त्रोत (Primary Sources) व द्वितीयक स्त्रोताचा (Secondary Sources) उपयोग प्रस्तुत अभ्यासिन संशोधनासाठी केला आहे.

नियम मांडणे अथवा अंतिम निष्कर्ष काढण्यासाठी एकत्रित केलेल्या माहितीवर शास्त्रीय पद्धतीने प्रक्रिया करावी लागते. मिळालेल्या माहितीचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करावे लागते. या घटकात माहिती गोळा करुन तिच्यावर अचुक पद्धतीने प्रक्रिया केली आहे.

मासिक किशोर वर्षनिहाय ११ अंक प्रकाशित करते. यामध्ये ऑक्टोबर व नोव्हेंबर हा दिवाळी विशेषांक म्हणून दोन महिन्याचा एकच अंक प्रकाशित होते. त्यामुळे किशोर मासिकाच्या ११ वर्षांच्या १२१ अंकाचा अभ्यास, माहिती संकलन व आशय विश्लेषण प्रस्तुत पाठामध्ये केलेले आहे.

मासिक छावा जानेवारी २००८ ते जून २०१५ पर्यंत मासिक म्हणून प्रकाशित झाले. छावा मासिकाच्या जानेवारी २००८ ते जून २०१५ पर्यंतच्या एकूण ९० अंकाचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला. जुलै २०१५ पासून मासिक छावा साप्ताहिक म्हणून प्रसिद्ध होऊ लागले. जुलै २०१५ ते डिसेंबर २०१८ अखेर प्रसिद्ध झालेल्या एकूण साप्ताहिक अंकाचा अभ्यास, माहिती संकलन व आशय विश्लेषण प्रस्तुत प्रकरणामध्ये केलेले आहे.

नाशिक विभागातील ४०० शिक्षकांना, आणि ६०० विद्यार्थ्यांना प्रश्नावली देवून सर्वेक्षणाचे संकलन व आशय विश्लेषण केले. अभ्यासिन मुद्रित प्रसार माध्यमांच्या संपादकाच्या मुलाखतीचे आशय विश्लेषणाचाही समावेश प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

माहिती संकलित करणे व आशय विश्लेषण समाजशास्त्रीय संशोधन खुप महत्त्वाचे असते. मिळालेल्या माहितीच्या आधारे आशयाचे विश्लेषण प्रस्तुत प्रकरणात केले आहे.

## २. माहिती संकलन : छावा

शहरी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केंद्रभूत माणून छावा प्रसिद्ध होतो. मराठी आणि इंग्रजी भाषेच्या साहित्याला छावामध्ये प्रसिद्धी दिली जाते. छावाच्या मजकुराचा साहित्यवार आणि विषयवार अभ्यास केला. साहित्याची व विषयाची विभागणी करण्यात आली. विभागणीनुसार माहिती एकत्रित केली. संशोधनासाठी मासिक छावाचे माहिती संकलन दोन प्रकारे केले आहे. ते प्रकार खालील प्रमाणे.

**अ. प्रसिद्ध साहित्याच्या प्रकारानुसार**

**ब.विषयवार प्रसिद्ध मजकूरानुसार**

### अ.प्रसिद्ध साहित्य प्रकारानुसार माहिती संकलन :

छावा मासिक वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य मुलांसाठी प्रसिद्ध करीत असते. या साहित्यामध्ये कथा, कविता, चित्रकथा, कृतियूक्त साहित्य इ. प्रकारच्या साहित्याचा समावेश होतो.

सर्वप्रथम छावाचे अंक मिळवण्यात आले. जे अंक मिळाले नाही ते अंक 'केसरीवाडा पुणे' येथील 'केसरी मराठा' ग्रंथालयात अभ्यास करण्यासाठी मिळाले.

सर्वप्रथम जानेवारी २००८ ते डिसेंबर २०१८ पर्यंतच्या सर्व अंकाचा अभ्यास केला. जानेवारी २००८ ते डिसेंबर २०१८ या ११ वर्षाच्या कालावधीतील अंकाचा अभ्यास केल्यानंतर संबंधित अंकामध्ये कोणकोणत्या साहित्यास स्थान दिले याचा अभ्यास करुन नोंदी घेण्यात आल्या. मासिक छावाने २००८ ते डिसेंबर २०१८ पर्यंतच्या अंकामध्ये वेगवेगळ्या कथा, वेगवेगळ्या कविता, चित्रकथा, विनोद, माहितीपर लेख, वेगवेगळ्या प्रकारचे कोडे, सामान्य ज्ञानावर आधारित माहिती इ. साहित्याचा अंतर्भाव आहे.

मासिक छावाच्या मुलांसाठीच्या साहित्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्यात आली.

१. **कथा :**छावा मासिक वेगवेगळ्या कथा मुलांसाठी प्रसिद्ध करत असते. मराठी व इंग्रजी भाषेमध्ये प्रसिद्ध केलेल्या कथांचा समावेश यामध्ये करण्यात आला. बोधकथा,

साहसकथा, धाडशी कथा, चातुर्यकथा, ऐतिहासिक कथा इ. सर्व प्रकारचे साहित्य 'कथा' या साहित्य प्रकारात समाविष्ट केले आहे.

२. **कविता :** कविता, बडबडगीते, बालगीते, समूहगीते इत्यादीच्या समावेश 'कविता' या साहित्यामध्ये केला आहे.

३. **मुलांचे लिखाण :** मुलांनी काढलेली चित्रे, मुलांनी निर्मित केलेल्या कथा व कविता, मुलांचे पत्र व अभिप्राय, मुलांनी मांडलेले विचार इ. प्रकारच्या साहित्याचा समावेश 'मुलांचे लिखाण' यामध्ये करण्यात आलेला आहे.

४. **विनोद :** विनोदामध्ये शाब्दीक विनोद, व्यंगचित्रात्मक विनोद, संवादात्मक विनोद, छोटा आकाराचा कथात्मक विनोद इत्यादी प्रकारचे साहित्याचा समावेश केला.

५. **लेख :** लेख या साहित्य प्रकारामध्ये माहितीपर लेख, इतिहासपर लेख, विज्ञानपर लेख, पक्षीपरिचय, व्यक्तीपरिचय, समीक्षात्मक लेख, संगणक माहितीवर लेख इ. चा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

६. **चित्रकथा :** वेगवेगळ्या चित्रांचा, व्यंगचित्रांचा उपयोग करुन कथा लिहीली जाते त्यास चित्रकथा म्हणतात. चित्रांचा, व्यंगचित्रांचा उपयोग करुन लिहीलेल्या सर्व कथांचा समावेश यामध्ये केलेला आहे.

७. **नाट्य :** मुलांसाठीच्या नाटीका, एकांकिका यांचा समावेश नाट्यामध्ये केलेला आहे.

८. **कोडे :** चित्रकोडे, शब्दकोडे, भाषिक खेळ, काव्यकोडी, कथात्मक कोडे (पहचान कौन) इ. साहित्याचा 'कोडे' या साहित्य प्रकारात अभ्यास करण्यात आलेला आहे.

९. **कृतियुक्त साहित्य :** रंगभरणाचे चित्रे, अनेक कृती, रस्ता शोधा, वेगवेगळ्या वस्तु तयार करणे, निरीक्षणात्मक साहित्य इ. सर्व प्रकारचे कृतीवर आधारित असलेले साहित्य 'कृतियूक्त साहित्य' अथवा मजकुरमध्ये घेतले आहे.

१०. **इतर साहित्य :** मुलांसाठी उपयुक्त असलेले आणि वरील ९ प्रकारात ज्याचा समावेश नाही अशा प्रकारचे साहित्य हे 'इतर साहित्य' यामध्ये घेतले आहे. यामध्ये संपादकाचे मनोगत, पत्रे, सामान्य ज्ञानावरील साहित्य, पुस्तक परिचय, संदेश इ. वेगवेगळ्या घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

वरीलप्रमाणे १० साहित्याचा सखोल अभ्यास केला. कोणत्या साहित्यास किती चौसेमी स्थान दिले. याच्या नोंदी घेण्यात आल्या. दिलेल्या स्थानाची (जागा) नोंद महिनानिहाय नोंदविण्यात आली. त्यानंतर  या बारा महिन्याची नोंद एकत्रित करण्यात आली. वर्षनिहाय एकत्रित करण्यात आलेल्या नोंदीवरुन वर्षनिहाय आशय विश्लेषण करण्यात आले.

**ब. विषयवार प्रसिद्ध मजकुरानुसार माहिती संकलन :**

शिक्षण हे वेगवेगळ्या माध्यमांतून (मराठी माध्यम, इंग्रजी माध्यम) दिले जाते. सर्वच माध्यमातील (भाषेमधील) विषय हे एकच असतात, फक्त माध्यमाची भाषा वेगळी असते. उदा. मराठी भाषेतील सर्वच विषय मराठी भाषेमध्ये असतात. मुद्रीत प्रसारमाध्यमांची भाषा ही वेगवेगळी असते. वेगवेगळ्या भाषेमध्ये प्रसिद्ध झालेल्या मुलांच्या मुद्रीत प्रसार माध्यमातील मजकूर मुलांच्या अभ्यासक्रमातील वेगवेगळ्या विषयांशी निगडित असते. उदा.मराठी भाषेमध्ये प्रसिद्ध होत असलेला छावामधील मजकूर भूगोल, इतिहास, कला, भाषा (मराठी) इत्यादी मुलांच्या अभ्यासक्रमांतील विषयांशी निगडित असतो. प्रस्तुत माहिती संकलनामध्ये छावाचा प्रसिद्ध झालेला मजकूर अभ्यासक्रमातील ज्या विषयांशी संबंधित आहे. त्या विषयांमध्ये मजकूराचा समावेश करण्यात आलेला आहे. साहित्य प्रकारानुसार मासिक छावाचा अभ्यास व वर्षनिहाय नोंदी पुर्ण झाल्यानंतर विषयवार प्रसिद्ध मजकूराचा अभ्यास करण्यात आला. त्यानंतर मजकूर विषयवार विभागण्यात आला.

मासिक छावाच्या प्रसिद्ध केलेल्या मजकूराची विभागणी पुढील विषयामध्ये करण्यात आली.

१. **भाषा (मराठी) :**मुलांच्या अभ्यासक्रमांमध्ये भाषा (मराठी) हा विषय (पाठ्यक्रम) असतो. भाषा (मराठी) अभ्यासक्रमातील विषयांमध्ये कविता, कथा, चित्रकथा, लेख, कोडे, विनोद इत्यादींचा अंतर्भाव असतो. छावा या मुद्रित प्रसारमाध्यमातील मराठी विभागामधील कथा, कविता, चित्रकथा इत्यादी साहित्य मुलांच्या अभ्यासक्रमातील भाषा(मराठी) विषयांशी निगडित आहेत म्हणून या साहित्याचा अथवा मजकूराचा समावेश भाषा (मराठी) या अभ्यासक्रमातील विषयांमध्ये केला आहे.

२. **सामान्यज्ञान :**छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांमध्ये सामान्य ज्ञानावर आधारित मजकूर मराठी व इंग्रजी मध्ये प्रसिद्ध होतो. मराठी व इंग्रजी भाषांमध्ये प्रसिद्ध झालेल्या सामान्य ज्ञानावरील मजकूराचा समावेश सामान्य ज्ञान या विषयामध्ये केला आहे. भाषेतील विविध सामान्य ज्ञानावर आधारित मजकूराचा समावेश सामान्य ज्ञान विषयामध्ये करण्यात आलेला आहे.

३. **भाषा (इंग्रजी) :**छावामधील मजकूर प्रामुख्याने मराठी व अंशतः इंग्रजीभाषेमध्ये प्रसिद्ध होतो. इंग्रजी भाषेमध्ये प्रसिद्ध झालेल्या कथा, कविता, विनोद, लेख इत्यादी साहित्याचा समावेश हा भाषा (इंग्रजी) या मुलांच्या अभ्यासक्रमाशी संबंधित विषयामध्ये केला आहे.

४. **कला :** यामध्ये मुलांनी काढलेली चित्रे, रंगभरणासाठी असणारे चित्रे इ. मराठी व इंग्रजी विभागातील साहित्याचा समावेश 'कला' या विषयात करण्यात आलेला आहे.

५. **कार्यानुभव :** विविध ओरोगामी कृती, वेगवेगळ्या कागदी वस्तु बनवणे, इतर प्रकारच्या वस्तु बनवण्याची कृती इ. मराठी व इंग्रजी विभागातील साहित्याचा समावेश कार्यानुभव या विषयात केलेला आहे.

६. **शारीरिक शिक्षण :** यामध्ये जगभरातील विविध खेळांचे माहितीपर लेख, खेळाडूंची माहिती, खेळांसबंधी लेख इ. मराठी व इंग्रजी विभागातील साहित्याचा समावेश शारीरिक शिक्षण या विषयात केला आहे.

७. **इतिहास :** ऐतिहासिक माहिती, ऐतिहासिक लेख, इतिहासाची माहिती इ. मराठी व इंग्रजी विभागातील साहित्याचा समावेश इतिहास या विषयात करण्यात आला आहे.

८. **भुगोल :** भुगोल विषयाशी संबंधीत असणारी माहिती, लेख मराठी व इंग्रजी विभागातील साहित्याचा समावेश भुगोल विषयात केलेला आहे.

९. **विज्ञान :** प्रयोग, विज्ञान विषय लेख, शास्त्रज्ञविषयीची माहिती इ. मराठी व इंग्रजी विभागातील साहित्याचा समावेश विज्ञान विषयात केलेला आहे.

१०. **गणित :** गणिताचे लेख, गणिती उदाहरणे इ. मराठी व इंग्रजी विभागातील साहित्याचा गणिती माहिती गणित विषयामध्ये आलेली आहे.

११. **भाषा (संस्कृत) :** संस्कृत भाषेचे सुभाषिते, पाठांतरासाठी प्रसिद्ध केलेला मजकूर इ. मजकूर संस्कृत या विषयात समाविष्ट करण्यात आला.

१२. **इतर :** वरील विषयामध्ये समाविष्ट न होणारा मराठी व इंग्रजी विभागातील साहित्याचा मजकूर अथवा कृतीचा इतर मध्ये अंतर्भाव केला.

वरीलप्रमाणे मासिक छावाची विषयनिहाय विभागणी केली. छावाने प्रसिद्ध केलेल्या मजकूराची अंकनिहाय, विषयनिहाय नोंद घेण्यात आली. या नोंदी विषयास दिलेल्या एकूण स्थानाच्या क्षेत्रफळामध्ये मांडण्यात आल्या. प्रत्येक अंकनिहाय नोंदी महिनावार मांडण्यात आल्या. बारा महिन्याची नोंद एकत्रित करण्यात आली. वर्षनिहाय एकत्रित करण्यात आलेल्या वर्षनिहाय नोंदीचे वर्षनिहाय विश्लेषण करण्यात आले.

### ३. माहिती संकलन : किशोर

मुलांना पुरक वाचनासाठी साहित्य उपलब्ध व्हावे म्हणून इ.स. १९७१ साली किशोर मासिकाची सुरुवात झाली. मासिक किशोरने अनेकाधिक साहित्य मुलांसाठी प्रसिद्ध केले.ते साहित्य वाचकाच्या आवडीस उतरले.

या संशोधन विषयाचा अभ्यास करतांना मासिक किशोरचे जानेवारी २००८ ते डिसेंबर २०१८ पर्यंतच्या अंकाचा अभ्यास केला. जानेवारी २००८ ते डिसेंबर २०१८ पर्यंतच्या ११ वर्षांचे एकूण १२१ अंकाचा अभ्यास करण्यात आला.

किशोर मासिकाच्या माहितीचे संकलन संशोधनासाठी दोन प्रकारे केले.

**अ.प्रसिद्ध साहित्याच्या प्रकारानुसार माहिती संकलन.**

**ब. विषयवार प्रसिद्ध मजकुरानुसार माहिती संकलन.**

### अ.प्रसिद्ध साहित्याच्या प्रकारानुसार माहिती संकलन

इ.स.१९७१ पासून मासिक किशोर वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य प्रसिद्ध करते. यामध्ये कथा, कविता, विनोद, लेख, पत्रे इ. साहित्याचा समावेश होतो.

मासिक किशोरचे साहित्यानुसार माहितीचे संकलन करतांना सर्वप्रथम मासिक किशारचे जानेवारी २००८ ते २०१८ पर्यंत अंक उपलब्ध केले. जे अंक मिळाले नाहीत ते अंक जिल्हापरिषद शाळेकडून अभ्यासासाठी मागवण्यात आले. जानेवारी २००८ ते डिसेंबर २०१८ अखेर ११ वर्षांचे एकूण १२१ अंकांचा सखोल अभ्यास करण्यात आला. साहित्याचे वेगवेगळे गट करण्यात आले. यामध्ये कथा, कविता, चित्रकला, विनोद, लेख इ. प्रसिद्ध साहित्याचे वर्गीकरण करण्यात आले. प्रत्येक साहित्यासाठी दिलेल्या जागेचे क्षेत्रफळ काढून त्याची महिनावार नोंद घेण्यात आली.

मासिक किशोरच्या साहित्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले आहे.

१ **कथा : किशोर** मासिक वेगवेगळ्या कथा मुलांसाठी प्रसिद्ध करत असते. मराठी व इंग्रजी भाषेमध्ये प्रसिद्ध केलेल्या कथांचा समावेश यामध्ये करण्यात आला. बोधकथा, साहसकथा, धाडशी कथा, चातुर्यकथा, ऐतिहासिक कथा इ. सर्व प्रकारचे साहित्य 'कथा' या साहित्य प्रकारात समाविष्ट केले आहे.

२ **कविता :** कविता, बडबडगीते, बालगीते, समूहगीते इत्यादीच्या समावेश 'कविता' या साहित्यामध्ये केला आहे.

३ **मुलांचे लिखाण :** मुलांनी काढलेली चित्रे, मुलांनी निर्मित केलेल्या कथा व कविता, मुलांचे पत्र व अभिप्राय, मुलांनी मांडलेले विचार इ. प्रकारच्या साहित्याचा समावेश 'मुलांचे लिखाण' यामध्ये करण्यात आलेला आहे.

४ **विनोद :** विनोदामध्ये शाब्दीक विनोद, व्यंगचित्रात्मक विनोद, संवादात्मक विनोद, छोटा आकाराचा कथात्मक विनोद इत्यादी प्रकारचे साहित्याचा समावेश केला.

५ **लेख :** लेख या साहित्य प्रकारामध्ये माहितीपर लेख, इतिहासपर लेख, विज्ञानपर लेख, पक्षीपरिचय, व्यक्तीपरिचय, समीक्षात्मक लेख, संगणक माहितीवर लेख इ. चा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

६ **चित्रकथा :** वेगवेगळ्या चित्रांचा, व्यंगचित्रांचा उपयोग करुन कथा लिहीली जाते त्यास चित्रकथा म्हणतात. चित्रांचा, व्यंगचित्रांचा उपयोग करुन लिहीलेल्या सर्व कथांचा समावेश यामध्ये केलेला आहे.

७ **नाट्य :** मुलांसाठीच्या नाटीका, एकांकिका यांचा समावेश नाट्यामध्ये केलेला आहे.

८ **कोडे :** चित्रकोडे, शब्दकोडे, भाषिक खेळ, काव्यकोडी, कथात्मक कोडे (पहचान कौन) इ. साहित्याचा 'कोडे' या साहित्य प्रकारात अभ्यास करण्यात आलेला आहे.

९ **कृतियुक्त साहित्य :** रंगभरणाचे चित्रे, अनेक कृती, रस्ता शोधा, वेगवेगळ्या वस्तु तयार करणे, निरीक्षणात्मक साहित्य इ. सर्व प्रकारचे कृतीवर आधारित असलेले साहित्य 'कृतियूक्त साहित्य' अथवा मजकुरमध्ये घेतले आहे.

१० **इतर साहित्य :** मुलांसाठी उपयुक्त असलेले आणि वरील ९ प्रकारात ज्याचा समावेश नाही अशा प्रकारचे साहित्य हे 'इतर साहित्य' यामध्ये घेतले आहे. यामध्ये संपादकाचे मनोगत, पत्रे, सामान्य ज्ञानावरील साहित्य, पुस्तक परिचय, संदेश इ. वेगवेगळ्या घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

मासिक किशोरच्या साहित्याचे वर्गीकरण पुढील प्रमाणे केले आहे.

वरीलप्रमाणे मासिक किशोरमध्ये प्रसिद्ध केलेल्या साहित्याचे वर्गीकरण केले. अंकनिहाय साहित्यनिहाय किती जागा मिळाली याचे क्षेत्रफळ काढून नोंद घेतली. प्रत्येक महिन्याच्या नोंदी एकत्र करुन वार्षिक अंकनिहाय नोंदी केल्या. प्रत्येक वर्षाच्या ११ अंकाची एकत्रित सारणीमध्ये नोंद घेवून आशय विश्लेषणासाठी माहिती तयार केली.

**'ब' विषयनिहाय प्रसिद्ध मजकूरानुसार माहिती संकलन**

शिक्षण हे वेगवेगळ्या माध्यमांतून (मराठी माध्यम, इंग्रजी माध्यम दिले जाते.) सर्वच माध्यमातील विषय हे एकच असतात, फक्त माध्यमाची भाषा वेगळी असते. उदा. मराठी भाषेतील सर्वच विषय मुद्रीत प्रसारमाध्यमांची भाषा ही वेगवेगळी असते. वेगवेगळ्या भाषेमध्ये प्रसिद्ध झालेल्या मुलांच्या मुद्रीत प्रसार माध्यमाचे मजकूर मुलांच्या अभ्यासक्रमातील वेगवेगळ्या विषयांशी निगडित असते. उदा.मराठी भाषेमध्ये प्रसिद्ध होत असलेला किशोरमधील मजकूर भूगोल, इतिहास, कला, भाषा (मराठी) इत्यादी मुलांच्या अभ्यास क्रमांतील विषयांशी निगडित असतो. प्रस्तुत माहिती संकलनामध्ये किशोरचा प्रसिद्ध झालेला मजकूर अभ्यासक्रमातील ज्या विषयांशी संबंधित आहे. त्या विषयांमध्ये मजकूराचा समावेश करण्यात आलेला आहे. मासिक किशोरच्या जानेवारी २००८ ते डिसेंबर २०१८ या ११ वर्षातल्या एकूण १२१ अंकाचा अभ्यास केला. या अंकातील मजकुराची विषयनिहाय विभागणी पुढीलप्रमाणे केली.

१. **भाषा (मराठी) :** मुलांच्या अभ्यासक्रमांमध्ये भाषा (मराठी) हा विषय (पाठ्यक्रम) असतो. भाषा (मराठी) अभ्यासक्रमातील विषयांमध्ये कविता, कथा, चित्रकथा, लेख, कोडे, विनोद इत्यादींचा अंतर्भाव असतो. किशोर या मुद्रित प्रसारमाध्यमातील मराठी विभागामधील कथा, कविता, चित्रकथा इत्यादी साहित्य मुलांच्या अभ्यासक्रमातील भाषा(मराठी) विषयांशी निगडित आहेत म्हणून या साहित्याचा अथवा मजकूराचा समावेश भाषा (मराठी) या अभ्यासक्रमातील विषयांमध्ये केला आहे.

२. **सामान्यज्ञान :** किशोर या मुद्रित प्रसारमाध्यमांमध्ये सामान्य ज्ञानावर आधारित मजकूर मराठी व इंग्रजी मध्ये प्रसिद्ध होतो. मराठी व इंग्रजी भाषांमध्ये प्रसिद्ध झालेल्या सामान्य ज्ञानावरील मजकूराचा समावेश सामान्य ज्ञान या विषयामध्ये केला आहे. भाषेतील विविध सामान्य ज्ञानावर आधारित मजकूराचा समावेश सामान्य ज्ञान विषयामध्ये करण्यात आलेला आहे.

३. **भाषा (इंग्रजी) :** किशोरमधील मजकूर प्रामुख्याने मराठी व अंशतः इंग्रजीभाषेमध्ये प्रसिद्ध होतो. इंग्रजी भाषेमध्ये प्रसिद्ध झालेल्या कथा, कविता, विनोद, लेख

इत्यादी साहित्याचा समावेश हा भाषा (इंग्रजी) या मुलांच्या अभ्यासक्रमाशी संबंधित विषयामध्ये केला आहे.

४. **कला :** यामध्ये मुलांनी काढलेली चित्रे, रंगभरणासाठी असणारे चित्रे इ. मराठी व इंग्रजी विभागातील साहित्याचा समावेश 'कला' या विषयात करण्यात आलेला आहे.

५. **कार्यानुभव :** विविध ओरोगामी कृती, वेगवेगळ्या कागदी वस्तु बनवणे, इतर प्रकारच्या वस्तु बनवण्याची कृती इ. मराठी व इंग्रजी विभागातील साहित्याचा समावेश कार्यानुभव या विषयात केलेला आहे.

६. **शारीरिक शिक्षण :** यामध्ये जगभरातील विविध खेळांचे माहितीपर लेख, खेळाडूंची माहिती, खेळांसबंधी लेख इ. मराठी व इंग्रजी विभागातील साहित्याचा समावेश शारीरिक शिक्षण या विषयात केला आहे.

७. **इतिहास :** ऐतिहासिक माहिती, ऐतिहासिक लेख, इतिहासाची माहिती इ. मराठी व इंग्रजी विभागातील साहित्याचा समावेश इतिहास या विषयात करण्यात आला आहे.

८. **भुगोल :** भुगोल विषयाशी संबंधीत असणारी माहिती, लेख मराठी व इंग्रजी विभागातील साहित्याचा समावेश भुगोल विषयात केलेला आहे.

९. **विज्ञान :** प्रयोग, विज्ञान विषय लेख, शास्त्रज्ञविषयीची माहिती इ. मराठी व इंग्रजी विभागातील साहित्याचा समावेश विज्ञान विषयात केलेला आहे.

१०. **गणित :** गणिताचे लेख, गणिती उदाहरणे इ. मराठी व इंग्रजी विभागातील साहित्याचा गणिती माहिती गणित विषयामध्ये आलेली आहे.

११. **भाषा (संस्कृत) :** संस्कृत भाषेचे सुभाषिते, पाठांतरासाठी प्रसिद्ध केलेला मजकूर इ. मजकूर संस्कृत या विषयात समाविष्ट करण्यात आला.

१२. **इतर :** वरील विषयामध्ये समाविष्ट न होणारा मराठी व इंग्रजी विभागातील साहित्याचा मजकूर अथवा कृतीचा इतर मध्ये अंतर्भाव केला.

वरील प्रमाणे मासिक किशोरची विषयवार विभागणी केली. अंकनिहाय वरील विषयांना दिलेले स्थान मोजण्यात आले. अंकनिहाय व विषयनिहाय नोंदी घेतल्या. नोंदीचे वर्षनिहाय एकत्रिकरण करुन आशय विश्लेषणासाठी माहिती संकलित केली.

## ४. पृष्ठसंख्या व मुखपृष्ठः आशय विश्लेषण (किशोर व छावा)

### मुखपृष्ठ विश्लेषण :

मुखपृष्ठ हा प्रत्येक ग्रंथाचा, मुद्रित प्रसारमाध्यमांचा आत्मा असतो. मुखपृष्ठामध्ये मुद्रित प्रसारमाध्यमांतील आशयाची अथवा मजकुराची प्रतिमा दिसणे गरजेचे असते.

मुखपृष्ठ हा मुलांच्या मुद्रित प्रसारमाध्यमातील महत्वाचा घटक आहे. मुले मुद्रित प्रसारमाध्यमाकडे आकर्षिक होण्यासाठी मुद्रित प्रसारमाध्यमाचे मुखपृष्ठही आकर्षक असणे गरजेचे असते. मुलांच्या मुद्रित प्रसारमाध्यमातून मजकुराचा आशय लक्षात घेवून मुखपृष्ठाची निर्मिती करणे आवश्यक असते. मुखपृष्ठ पाहताक्षणी आतील मजकुराची कल्पना येईल अशा दृष्टीने तयार करणे गरजेचे असते.

किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांच्या मुखपृष्ठांचा अभ्यास करुन त्याचे विश्लेषण प्रस्तुत उपघटकात केले आहे. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांची मुखपृष्ठे आतील मजकुराचे प्रतिनिधीत्व करतात. महिन्यातील सण,उत्सव, परंपरा, महत्त्वाच्या घटना, महिन्यानुसार निसर्ग, सुविचार, प्रतिमा यांच्या आधारे किशोर व छावाच्या मुखपृष्ठाची निर्मिती होते. प्रसंगानुरुप आकर्षक, सुंदर व रेखीव मुखपृष्ठे मुलांच्या पसंतीस पडतात. यामुळे मुले प्रस्तुत मुद्रित प्रसारमाध्यमाकडे आकर्षित होवून आतील मजकूर वाचण्यासाठी प्रवृत्त होतात.

### पृष्ठसंख्या विश्लेषण :

मुद्रित प्रसारमाध्यमामध्ये पृष्ठसंख्या हा महत्त्वाचा घटक आहे. पृष्ठसंख्या ही आतील मजकुरावर अवलंबून असते. संशोधन विषयातील छावा व किशोर या मुद्रित प्रसार माध्यमाच्या पृष्ठसंख्येचा अभ्यास प्रस्तुत घटकामध्ये केला आहे. किशोर या मुद्रित प्रसारमाध्यमाच्या अंकांची पृष्ठसंख्या ही ५२ असून ऑक्टोंबर व नोव्हेंबर हा जोड दिवाळी अंकाची पृष्ठसंख्या १३२ आहे. छावाच्या मासिकांसाठी पृष्ठसंख्या ३२ अथवा २४ असून प्रसंगानुरुप व आतील मजकूरानुसार पृष्ठसंख्यामध्ये बदल आढळतो. छावाच्या मे २०१३ च्या अंकापासून छावाच्या

आकारामध्ये बदल झालेला आहे. मोठ्या आकारामध्ये छावा मे २०१३ च्या अंकापासून प्रकाशित होवू लागला आहे. नवीन आकाराच्या अंकाची पृष्ठसंख्या १२ असून अपवादात्मक वेळी त्यामध्ये आवश्यक बदल झालेला आहे.

किशोर व छावा या मुद्रित प्रसार माध्यमांची अंकनिहाय पृष्ठसंख्या व अंकनिहाय मुखपृष्ठ विश्लेषण पुढील सारणीद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

**पृष्ठसंख्या व मुखपृष्ठ विश्लेषण :किशोर**

**सारणी क्र.१ :**

**किशोर या मुद्रित प्रसारमाध्यमाची पृष्ठसंख्या व मुखपृष्ठ विश्लेषण.**

| अ.क्र. | अंक | एकूण पृष्ठसंख्या | मुखपृष्ठ विश्लेषण |
|---|---|---|---|
| १ | जानेवारी २००८ | ५२ | मुलीच्या डोक्यावरील धान्याच्या गाठोड्यावर टपून बसलेल्या चिमण्या –चित्रात्मक मुखपृष्ठ |
| २ | फेब्रुवारी २००८ | ५२ | शास्त्रज्ञ फोटो व विज्ञान विषयक मुखपृष्ठ |
| ३ | मार्च २००८ | ५२ | होळी/ रंगपंचमी सण विषयक मुखपृष्ठ |
| ४ | एप्रिल २००८ | ५२ | प्रदुषण विषयक चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ५ | मे २००८ | ५२ | मुलांचे छंद विषयक चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ६ | जून २००८ | ५२ | शाळा सुरु विषयक मुखपृष्ठ |
| ७ | जुलै २००८ | ५२ | श्रावण महिना व पाऊस विषयक मुखपृष्ठ |
| ८ | ऑगस्ट २००८ | ५२ | सैनिकांना रक्षाबंधन सण विषयक मुखपृष्ठ |
| ९ | सप्टेंबर २००८ | ५२ | शिक्षकदिन विषयक कविता असणारे मुखपृष्ठ |
| १० | ऑक्टो / नोव्हें २००८ | १३२ | प्रदुषण टाळा जागृती विषयक मुखपृष्ठ |
| ११ | डिसेंबर २००८ | ५२ | संत गाडगेबाबा स्वच्छता संदेश मुखपृष्ठ |
| १२ | जानेवारी २००९ | ५२ | ग्रामीण संस्कृती दर्शविणारे मुखपृष्ठ |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | फेब्रुवारी २००९ | ५२ | गिर्यारोहण असणारे  चित्रात्मक मुखपृष्ठ |
| १४ | मार्च २००९ | ५२ | गुढीपाडवा सण विषयक मुखपृष्ठ |
| १५ | एप्रिल २००९ | ५२ | उद्यान व निसर्ग दाखविणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| १६ | मे  २००९ | ५२ | सुगरण पक्षी खोपा दाखविणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| १७ | जून २००९ | ५२ | शाळा सुरु विषयक चित्रात्मक मुखपृष्ठ |
| १८ | जुलै २००९ | ५२ | निसर्गाच्या सानिध्यातील खेळ कृतियुक्त मुखपृष्ठ |
| १९ | ऑगस्ट २००९ | ५२ | भारतीय वेशभूषा विविधता दर्शक मुखपृष्ठ |
| २० | सप्टेंबर २००९ | ५२ | चिमणी पक्षी असणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| २१ | ऑक्टो / नोव्हें २००९ | १३२ | ग्रामीण दिवाळी दर्शक चित्रात्मक मुखपृष्ठ |
| २२ | डिसेंबर २००९ | ५२ | पक्षी दर्शक चित्रात्मक मुखपृष्ठ |
| २३ | जानेवारी २०१० | ५२ | पाण्यांचे कारंजे असणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| २४ | फेब्रुवारी २०१० | ५२ | शिल्पकला असणाारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| २५ | मार्च २०१० | ५२ | ऐतिहासिक चर्चा विषयक मुखपृष्ठ |
| २६ | एप्रिल २०१० | ५२ | शाळा सुट्टी आनंददर्शक मुखपृष्ठ |
| २७ | मे  २०१० | ५२ | ऊन व पाणीटंचाई दाखविणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| २८ | जून २०१० | ५२ | बेडूक गाणे (पावसासाठी) असणारे मुखपृष्ठ |
| २९ | जुलै २०१० | ५२ | आकर्षक दबदबा असणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ३० | ऑगस्ट २०१० | ५२ | शिरीषकुमार प्रतिमा चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ३१ | सप्टेंबर २०१० | ५२ | पक्षी प्रतिमा असणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ३२ | ऑक्टो / नोव्हें २०१० | १३२ | प्रदुषणविरहीत दिवाळी असणारे संदेशात्मक मुखपृष्ठ |
| ३३ | डिसेंबर २०१० | ५२ | ख्रिसमस सण विषयक संदेशात्मक मुखपृष्ठ |
| ३४ | जानेवारी २०११ | ५२ | पोपट पक्षी प्रतिमा चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ३५ | फेब्रुवारी २०११ | ५२ | पक्षी प्रतिमा चित्रात्मक मुखपृष्ठ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ | मार्च २०११ | ५२ | बाळावरील प्रेम (चिमणी) प्रेमदर्शक मुखपृष्ठ |
| ३७ | एप्रिल २०११ | ५२ | पोपट–कावळा संवादात्मक मुखपृष्ठ |
| ३८ | मे २०११ | ५२ | मुर्ती शिल्पकला दर्शक कलात्मक मुखपृष्ठ |
| ३९ | जून २०११ | ५२ | आकर्षक पाने रचनात्मक मुखपृष्ठ |
| ४० | जुलै २०११ | ५२ | सदाफुली प्रतिमा असणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ४१ | ऑगस्ट २०११ | ५२ | भगतसिंग, राजगुरु व सुखदेव चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ४२ | सप्टेंबर २०११ | ५२ | आकर्षक मांजर प्राणी असणारे मुखपृष्ठ |
| ४३ | ऑक्टो / नोव्हें २०११ | १३२ | भाऊबीज सण विषयक चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ४४ | डिसेंबर २०११ | ५२ | फुले व फुलपाखरु असणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ४५ | जानेवारी २०१२ | ५२ | सुर्योदयदर्शक चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ४६ | फेब्रुवारी २०१२ | ५२ | हसरी मुलगी असणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ४७ | मार्च २०१२ | ५२ | सुंदर मुले असणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ४८ | एप्रिल २०१२ | ५२ | हसणारा मुलगा असणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ४९ | मे २०१२ | ५२ | हसणारा मुलगा असणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ५० | जून २०१२ | ५२ | फुले घेतलेली मुलगी असणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ५१ | जुलै २०१२ | ५२ | निसर्गात आई आणि मुलगा असणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ५२ | ऑगस्ट २०१२ | ५२ | देशभक्तांचे फोटो व मशाल असणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ५३ | सप्टेंबर २०१२ | ५२ | तबलावादक मुलगा असणारा मुखपृष्ठ |
| ५४ | ऑक्टो / नोव्हें २०१२ | १३२ | पणत्या व मुलगी दिवाळी सणविषयक मुखपृष्ठ |
| ५५ | डिसेंबर २०१२ | ५२ | हत्ती प्राणी असणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ५६ | जानेवारी २०१३ | ५२ | हातात ध्वज असणारी मुलगी प्रसंगानुरुप मुखपृष्ठ |
| ५७ | फेब्रुवारी २०१३ | ५२ | शिवजयंती निमित्त प्रसंगानुरुप मुखपृष्ठ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५८ | मार्च २०१३ | ५२ | झोक्यावरील मुलगी चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ५९ | एप्रिल २०१३ | ५२ | मातीचे भांडे असणारे मुखपृष्ठ |
| ६० | मे २०१३ | ५२ | शेतीचे कामे कृतीआधारित मुखपृष्ठ |
| ६१ | जून २०१३ | ५२ | चित्र काढणारी मुलगी असणारे मुखपृष्ठ |
| ६२ | जुलै २०१३ | ५२ | पाण्याशी खेळणारा मुलगा चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ६३ | ऑगस्ट २०१३ | ५२ | सैनिक व मुलगा प्रसंगानुरुप मुखपृष्ठ |
| ६४ | सप्टेंबर २०१३ | ५२ | आठवणीमध्ये रममाण झालेली मुलगी मुखपृष्ठ |
| ६५ | ऑक्टो / नोव्हें २०१३ | १३२ | रांगोळी काढणारी मुलगी सण विषयक मुखपृष्ठ |
| ६६ | डिसेंबर २०१३ | ५२ | सुंदर मुलगी असणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ६७ | जानेवारी २०१४ | ५२ | भारतीय नृत्य सादर करणारी स्त्री मुखपृष्ठ |
| ६८ | फेब्रुवारी २०१४ | ५२ | छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमा प्रसंगानुरुप मुखपृष्ठ |
| ६९ | मार्च २०१४ | ५२ | आकर्षक फुलांचे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ७० | एप्रिल २०१४ | ५२ | पाण्यात विहार करणारा बदक असणारे मुखपृष्ठ |
| ७१ | मे २०१४ | ५२ | हस्तकला निर्मित वस्तू कलाविषयक मुखपृष्ठ |
| ७२ | जून २०१४ | ५२ | शाळेत निघालेला हसतमुख बालक चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ७३ | जुलै २०१४ | ५२ | नभाने भरलेले ग्रामीण भागातील आकाश मुखपृष्ठ |
| ७४ | ऑगस्ट २०१४ | ५२ | ध्वजारोहणानिमित्त विविध कवायती प्रसंगानुरुप मुखपृष्ठ |
| ७५ | सप्टेंबर २०१४ | ५२ | आकर्षक फुलदाणी कलात्मक मुखपृष्ठ |
| ७६ | ऑक्टो / नोव्हें २०१४ | १३२ | किशोरचे वाचन करणारे विद्यार्थी मुखपृष्ठ |
| ७७ | डिसेंबर २०१४ | ५२ | स्वच्छता मोहीम संदेशात्मक मुखपृष्ठ |
| ७८ | जानेवारी २०१५ | ५२ | पतंग उडविणारे मुले आनंददायी मुखपृष्ठ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७९ | फेब्रुवारी २०१५ | ५२ | विज्ञानाचे प्रयोगात्मक मुखपृष्ठ |
| ८० | मार्च २०१५ | ५२ | रंगपंचमी/होळी सणविषयक मुखपृष्ठ |
| ८१ | एप्रिल २०१५ | ५२ | शाळेत चाललेल्या ग्रामीण मुली मुखपृष्ठ |
| ८२ | मे २०१५ | ५२ | महाराष्ट्र दाखविणारी मुलगी प्रसंगानुरुप मुखपृष्ठ |
| ८३ | जून २०१५ | ५२ | शाळेत निघालेले मुले प्रसंगानुरुप मुखपृष्ठ |
| ८४ | जुलै २०१५ | ५२ | पावसात भिजणारी मुलगी ऋतुविषयक मुखपृष्ठ |
| ८५ | ऑगस्ट २०१५ | ५२ | ध्वज घेवून धावणारे विद्यार्थी मुखपृष्ठ |
| ८६ | सप्टेंबर २०१५ | ५२ | ओळख गुरुविषयक कृतज्ञता दर्शक मुखपृष्ठ |
| ८७ | ऑक्टो / नोव्हें २०१५ | १३२ | आनंदात दिवाळी साजरी करणाऱ्या मुली मुखपृष्ठ |
| ८८ | डिसेंबर २०१५ | ५२ | धनगरी नृत्य सादर कलात्मक मुखपृष्ठ |
| ८९ | जानेवारी २०१६ | ५२ | नव वर्ष स्वागत करणारे मुखपृष्ठ |
| ९० | फेब्रुवारी २०१६ | ५२ | शाळेत निघालेले विद्यार्थी चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ९१ | मार्च २०१६ | ५२ | होळी/रंगपंचमी सणविषयक मुखपृष्ठ |
| ९२ | एप्रिल २०१६ | ५२ | शाळा सुट्टीचा झालेला आनंद दर्शक मुखपृष्ठ |
| ९३ | मे २०१६ | ५२ | निसर्गाच्या सानिध्यात खेळ कृतीयुक्त मुखपृष्ठ |
| ९४ | जून २०१६ | ५२ | मराठी कन्या नासा भरारी मुखपृष्ठ |
| ९५ | जुलै २०१६ | ५२ | श्रावणातील पावसातील मुलगा ऋतुविषयक मुखपृष्ठ |
| ९६ | ऑगस्ट २०१६ | ५२ | भारतीय ध्वज असणारे प्रसंगानुरुप मुखपृष्ठ |
| ९७ | सप्टेंबर २०१६ | ५२ | निसर्गातील मुले व पालक चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ९८ | ऑक्टो / नोव्हें २०१६ | १३२ | मुलीला सायकल शिकविणारे वडील चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ९९ | डिसेंबर २०१६ | ५२ | पाण्यात तरंग उडविणारा मुखपृष्ठ |
| १०० | जानेवारी २०१७ | ५२ | पाण्यामध्ये विहार करणारा वाघ असणारा मुखपृष्ठ |

| | | | |
|---|---|---|---|
| १०१ | फेब्रुवारी २०१७ | ५२ | बालभारती पुस्तक वाचणारे विद्यार्थी मुखपृष्ठ |
| १०२ | मार्च २०१७ | ५२ | रंगपंचमी/होळी सणविषयक मुखपृष्ठ |
| १०३ | एप्रिल २०१७ | ५२ | शालेय प्रगतीसाठी स्वार झालेला विद्यार्थी मुखपृष्ठ |
| १०४ | मे २०१७ | ५२ | आनंददायी सायकल सफारी दर्शक मुखपृष्ठ |
| १०५ | जून २०१७ | ५२ | भौमितीक आकारातून विद्यार्थी चित्र मुखपृष्ठ |
| १०६ | जुलै २०१७ | ५२ | पावसातील विद्यार्थी ऋतुविषयक मुखपृष्ठ |
| १०७ | ऑगस्ट २०१७ | ५२ | भारतीय वेशभूषेतील विविधता असणाारे मुखपृष्ठ |
| १०८ | सप्टेंबर २०१७ | ५२ | वासुदेव पारंपारिक लोककलादर्शक मुखपृष्ठ |
| १०९ | ऑक्टो / नोव्हें २०१७ | १३२ | पावसातील फुटबॉल खेळणारे मुले मुखपृष्ठ |
| ११० | डिसेंबर २०१८ | ५२ | ग्रामीण विभागाचे दर्शक मुखपृष्ठ |
| १११ | जानेवारी २०१८ | ५२ | होडीवर ध्वजारोहण करणारे कोळी प्रसंगानुरुप मुखपृष्ठ |
| ११२ | फेब्रुवारी २०१८ | ५२ | विज्ञान व खगोलशास्त्र प्रयोगात्मक मुखपृष्ठ |
| ११३ | मार्च २०१८ | ५२ | मुलींचे चित्र असणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ११४ | एप्रिल २०१८ | ५२ | पळसाचा संदेश देणारे संदेशात्मक मुखपृष्ठ |
| ११५ | मे २०१८ | ५२ | फळाचा राजा आंबा प्रसंगानुरुप मुखपृष्ठ |
| ११६ | जून २०१८ | ५२ | पावसात छत्री घेवून उभा असणारा मुलगा मुखपृष्ठ |
| ११७ | जुलै २०१८ | ५२ | नजर रोखून असलेला वाघ चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ११८ | ऑगस्ट २०१८ | ५२ | भारतीय ध्वज घेतलेली मुलगी प्रसंगानुरुप मुखपृष्ठ |
| ११९ | सप्टेंबर २०१८ | ५२ | भिंतीच्या आडोशाने बघणारा मुलगा चित्रात्मक मुखपृष्ठ |
| १२० | ऑक्टो / नोव्हें २०१८ | १३२ | दिवाळी साजरी करणारे कुटूंब सणविषयक मुखपृष्ठ |
| १२१ | डिसेंबर २०१८ | ५२ | सामाजिक माध्यमामध्ये बंदिस्त मुलगा समस्यादर्शक मुखपृष्ठ |

किशोर या मुद्रित प्रसारमाध्यमाच्या पृष्ठसंख्यांचा अभ्यास केला असता विविध वैशिष्ट्यपूर्ण बाबी स्पष्ट झाल्या. किशोर हे मुद्रित प्रसारमाध्यम एका कॅलेंडर वर्षामध्ये एकूण ११ अंक प्रकाशित करते. आक्टोंबर व नोव्हेंबर या दोन महिन्यासाठी एकच दिवाळी जोडअंक किशोर प्रसिद्ध करते. दिवाळी जोडअंकाची पृष्ठसंख्या कायमस्वरुपी १३२ पृष्ठे अशी राहीली आहे. दिवाळी अंक वगळता इतर सर्व अंकांची पृष्ठसंख्या कायमस्वरुपी ५२ आहे. यावरुन किशोरच्या पृष्ठसंख्येमध्ये समानता आहे हे सिद्ध होते.

किशोर या मुद्रित प्रसारमाध्यमाच्या मुखपृष्ठाच्या अभ्यासावरुन अनेक महत्वपूर्ण बाबी स्पष्ट झाल्या. किशोरच्या मुखपृष्ठाचे अनेक वैशिष्ट्ये आहेत. मुखपृष्ठाद्वारे किशोरने अनेक विषयांना जागा दिल्याचे स्पष्ट होते. संदेश, जागृती करण्याचे काम किशोर मुखपृष्ठाद्वारे करीत असल्याचे सिद्ध होते. शाळा विषयक, विद्यार्थी विषयक, पर्यावरण विषयक, सण व उत्सवविषयक, माहितीविषयक, प्रसंगानुरुप इत्यादी अनेक विषय मुखपृष्ठाद्वारे किशोरने मुलांसमोर मांडले आहेत. देशभक्तीपर, चित्रात्मक, आतील मजकुरांशी संबंधित, प्राणी व वनस्पतीविश्व या विषयांनाही किशोरने मुखपृष्ठाद्वारे स्थान दिलेले आहे.

**वरील अभ्यासावरुन किशोर या मुद्रित प्रसारमाध्यमाचे मुखपृष्ठहे मजकुराशी निगडित, प्रसंगानुरुप, विविध विषय मांडणारे चित्रात्मक व आकर्षक असते हे सिद्ध होते.**

## पृष्ठसंख्या व मुखपृष्ठ विश्लेषण : छावा

### सारणी क्र.२

### छावा या मुद्रित प्रसारमाध्यमाची पृष्ठसंख्या व मुखपृष्ठ विश्लेषण.

| अ.क्र. | अंक | एकूण पृष्ठसंख्या | मुखपृष्ठ विश्लेषण |
|---|---|---|---|
| १ | जानेवारी २००८ | २४ | हिमालयातील एव्हरेस्ट पर्वतरांग चित्रात्मक मुखपृष्ठ |
| २ | फेब्रुवारी २००८ | २४ | जगप्रसिद्ध नायगरा धबधबा चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ३ | मार्च २००८ | २४ | मांजर व मुलीचे चित्र असणारे चित्रात्मक मुखपृष्ठ |
| ४ | एप्रिल २००८ | २४ | गुढीपाडवा सण विषयक मुखपृष्ठ |
| ५ | मे २००८ | ३२ | बोधकथा विषयक विविध चित्र असणारे मुखपृष्ठ |
| ६ | जून २००८ | २४ | जहाज, आगबोट असणारे माहितीविषयक मुखपृष्ठ |
| ७ | जुलै २००८ | २४ | पॅराशुट, होड्या असणारे माहितीविषयक मुखपृष्ठ |
| ८ | ऑगस्ट २००८ | ३२ | बिजींग २००८ स्पर्धा विषयी मुखपृष्ठ |
| ९ | सप्टेंबर २००८ | ३२ | लो.टिळक व गणशोत्सव विषयक मुखपृष्ठ |
| १० | ऑक्टोबर २००८ | ३२ | दिवाळी सणविषयक मुखपृष्ठ |
आवश्यक बाबीचा संग्रह हा खूप महत्वाचा असतो. मुलामध्ये संग्रह वृत्ती असणे गरजेचे आहे. मुद्रित प्रसारमाध्यमांतील (किशोर/छावा/इतर) साहित्य मुले कात्रणाच्या स्वरुपात अथवा इतर स्वरुपात संग्रहित करतात का? याचा अभ्यास केला असता पुढील स्थिती समोर आली.

**सारणी क्र. १२**

**आपण मुद्रित प्रसार माध्यमाचा (किशोर/छावा/इतर) किंवा त्यातील महत्वाच्या बाबींचा संग्रह करता का?**

| अ.क्र. | पर्यायी उत्तरे | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३५५ | ६१% |
| २ | नाही | ११६ | २०% |
| ३ | कधीतरी | १११ | १९% |

**आलेख क्र.१२**



वरील स्थितीवरून ६१ टक्के मुले मुद्रित प्रसार माध्यमातील (किशोर/छावा/इतर) महत्वाच्या बाबींचा संग्रह करतात. २० टक्के मुले कधीच संग्रह करत नाहीत तर १९ टक्के मुले कधीतरी संग्रह करतात.

यावरुन मुद्रित प्रसार माध्यमे (किशोर/छावा/इतर) मुलामध्ये संग्रह वृत्ती वाढीस लावण्यासाठी मदत करतात.

## ९. संपादकांच्या मुलाखती : तथ्यांचे विश्लेषण

सामाजिक संशोधनामध्ये माहिती संकलनासाठी मुलाखत ही उत्कृष्ट पद्धत आहे. मुलाखतीद्वारे मुलाखतदाराच्या (उत्तरदाता) भावना, अभिवृत्ती, मनोवृत्ती,अनुभव या बाबतची माहिती मुलाखतीद्वारे संकलत केली जाते. ''मुलाखत तंत्राचे एक अतिशय महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या तंत्राचा उपयोग करतांना संशोधनकर्ता व ज्यांच्याकडून माहिती मिळवायची आहे अशा व्यक्तींचा (मुलाखत दाता) प्रत्यक्ष 'समोरासमोर' संबंध येत असतो.'' [१५]. याचा अर्थ मुलाखत घेणारा व मुलाखतदाता प्रत्यक्ष एकमेकांच्या समोरासमोर असल्याने प्रत्यक्ष संबंध निर्माण होतो. प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाल्यामुळे मुलाखतदाराच्या भावना, मनोवृत्ती, अनुभव इत्यादीचे क्रमबद्ध अध्ययन करता येते.

मुलाखत हे माहिती संकलनाचे एक अतिशय गरजेचे आणि महत्त्वपूर्ण तंत्र आहे. "Interview या इंग्रजी शब्दाचा मराठी अनुवाद म्हणजे मुलाखत होय.' Interview हा शब्द Inter आणि view या दोन इंग्रजी शब्दांपासून बनलेला आहे. यामधील Inter या शब्दाचा अर्थ 'आंतरिक' आणि view या शब्दाचा अर्थ ध्यानपूर्वक निरीक्षण करणे असा आहे. म्हणून आंतरिक दृष्टीकोन जाणून घेण्यासाठी ध्यानूपर्वक केलेले निरीक्षण म्हणजे मुलाखत होय. व्यक्तिगत माहिती, निर्मितीसाठी माहिती, गुणात्मक तथ्ये प्राप्त करण्यासाठी, आंतरिक किंवा खाजगी व गुप्त माहिती इत्यादी माहिती मुलाखतीद्वारे सहज मिळवता येते.

मुलाखत पद्धतीचे वेगवेगळे प्रकार आहेत. संशोधनाच्या उद्दिष्टानुसार निदानात्मक मुलाखत, उपचारात्मक मुलाखत, संशोधनात्मक मुलाखत हे प्रकार पडतात. अध्ययन पद्धतीनुसार संरचित अथवा नियंत्रित मुलाखत, असंरचित किंवा अनियंत्रीत मुलाखत, त्याचप्रमाणे उत्तरदात्याच्या संख्येनुसार वैयक्तिक मुलाखत व सामुहिक मुलाखत हे प्रकार पडतात. हे सर्वच

प्रकार महत्त्वाचे आहेत. मुलाखतीच्या सर्वच प्रकारामध्ये मुलाखतकर्त्याचे स्थान केंद्रिय स्वरुपाचे असते. मुलाखतकर्ता आवश्यक माहिती मिळवतो.

संशोधनासाठीव्यक्तीगत मुलाखती घेतल्या. यामध्ये मासिक किशोरचे संपादक श्री किरण केंद्रे व साप्ताहिक छावाच्या संपादिका गिताली टिळक–मोने यांच्या मुलाखती संशोधनाच्या हेतूनुसार आवश्यक असणारी माहिती मुलाखतीमार्फत मिळवण्यात आली. ही माहिती खालीलप्रमाणे आहे.

**किरण केंद्रे :**

किशोर मासिकाचे कार्यकारी संपादक श्री.किरण केंद्रे यांची मुलाखत प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टपुर्तीसाठी घेण्यात आली होती. मुलाखतीमध्ये विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांची कल्पना कार्यकारी संपादक किरण केंद्रे यांना देण्यात आली. मुलाखतीमध्ये त्यांना संशोधनाच्या अनुषंगाने प्रश्न विचारण्यात आले. मुलाखतीद्वारे मिळालेली माहिती लिखीत स्वरुपात शब्दबद्ध करण्यात आली. लिखीत स्वरुपात शब्दबद्ध केलेली माहिती पुढीलप्रमाणे मुलाखतीमध्ये पुढील प्रश्न विचारुन मुलाखतदाते किरण केंद्रे यांच्याकडून खालील माहिती मिळविण्यात आली.

१. आपले शिक्षण काय झाले आहे? या प्रश्नाचे उत्तर देतांना किरण केंद्रे म्हणाले ''माझे शिक्षण हे एम.ए., एम.फील या बरोबरच पत्रकारितेतील पदवी (बीजे), नेट–सेट झाले आहे. तसेच या बरोबरच संधी व आवश्यकता वाटेल तेंव्हा नवीन शिक्षण घेण्याचा प्रयत्न करत असतो.''
२. लेखन, कला व इतर क्षेत्रातील आपले योगदान काय आहे? या प्रश्नाचे उत्तर पुढीलप्रमाणे मिळाले ''विविध माध्यमातून वृत्तपत्र, मासिक, साप्ताहिक इत्यादी मधून सातत्याने लेखन सुरु आहे. वेगवेगळे विषय विविध माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न चालू असतो.''
३. किशोरचे कार्यकारी संपादक म्हणून कधीपासून कार्यरत आहात? कार्यकारी संपादक कार्यकाल कधीपासून सुरु झाला याप्रश्नाचे उत्तर देतांना म्हणाले ''किशोर मासिकाचे कार्यकारी संपादक म्हणून दि.१९ सप्टेंबर २०१४ पासून आज अखेर काम पाहत आहेत.''

४. किशोरपूर्वी किंवा आजअखेर इतर मुद्रित प्रसारमाध्यमांचे संपादक आहात का? असल्यास कोणत्या? या प्रश्नाचे उत्तर पुढील प्रमाणे मिळाले, ''किशोरसह लोकराज्य या प्रसारमाध्यमांचा सहसंपादक म्हणून कर्तव्य पार पाडत आहे''

५. कोणते उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून किशोर मासिक सुरु करण्यात आले? या प्रश्नाचे उत्तर देतांना म्हणाले, ''किशोर हे महाराष्ट्रातील मुलांचे प्रमुख मासिक आहे, मुलांमध्ये अवांतर वाचनाची आवड निर्माण व्हावी, अभ्यासक्रमाबाहेरचे ज्ञान मिळावे, मुलांच्या संवेदनशील मनावर उत्तम मुल्यांचे संस्कार व्हावेत ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून बालभारती किशोर मासिक प्रकाशित करते. गेल्या ४८ वर्षात किशोर मासिकाने अनेक पिढ्यांवर वाचनाचे, ज्ञान, विज्ञानाचे व मुल्यांचे संस्कार केले आहेत. अनेक चित्रकारांची चित्रे, कलाकृती, कवींच्या वेगवेगळ्या विषयांवरील कविता, लेखकांच्या वेगवेगळ्या कथांनी किशोर मासिकाला सजवले आहे.''

६. आज किशोर मासिकाचे किती अंक प्रकाशित होतात? या प्रश्नाचे उत्तर पुढीलप्रमाणे मिळाले,''किशोरच्या प्रकाशित अंकाची संख्या वाढत असून वाचक विद्यार्थी चांगला प्रतिसाद देतात. किशोर मासिकाचे एकूण ७६ हजार अंक प्रकाशित होतात.''

७. एकून प्रकाशित अंकापैकी किशोरचे किती अंक मोफत दिले जातात? या प्रश्नाचे उत्तर देतांना म्हणाले की, ''किशोर मुलांच्या व वाचकांच्या पसंतीस पडलेले मुलांचे मुद्रित प्रसारमाध्यम आहे. मात्र किशोर मासिकाचा एकही अंक मोफत दिला जात नाही.''

८. एकुण प्रकाशित अंकापैकी किशोरच्या किती अंकाची विक्री होते?याविषयी बोलतांना ते म्हणाले की, ''किशोर मासिकास चांगला प्रतिसाद मिळतो. एकूण प्रकाशित होणाऱ्या सर्व अंकांची विक्री होते.''

९. किशोरमध्ये कोणकोणत्या साहित्य प्रकारास अधिक प्राधान्य दिले जाते? या प्रश्नाचे उत्तर देतांना म्हणाले की, ''किशोरमध्ये सर्व प्रकारातील साहित्य प्रकाशित करण्यास प्राधान्य दिले जाते. ज्या साहित्यामध्ये मुले रस दाखवतील असे दर्जेदार

साहित्य प्राधान्याने निवडले जाते. मुलांवर सकारात्मक परिणाम करणारे व कृतिशील बनविणाऱ्या साहित्याला प्राधान्य दिले जाते.''

१०. किशोरसाठी साहित्य कसे निवडले जाते? या प्रश्नाचे उत्तर देतांना म्हणाले की, ''काही प्रसंगानुसार व अथवा विशेषांकांवेळी मान्यवर व्यक्ती आणि त्या–त्या विषयातील तज्ञाकडून किशोरसाठी लेखन मागविले जाते त्यामुळे संबंधित विषयाची सखोल माहिती मुलाला मिळते.इतर वेळी जे साहित्य किशोर मासिककडे येते त्यामधून दर्जेदार व चांगले साहित्य निवडले जाते.''

११. किशोर मासिकासाठी साहित्य निवडतांना कोणते निकष लावले जातात? या महत्वाच्या प्रश्नाचे उत्तर देतांना म्हणाले की, ''किशोर मासिकाची गुणवत्ता टिकविणे यासाठी काही निकष लावले आहेत. साधारणपणे सर्वच मुद्रित प्रसारमाध्यमे हे निकष लावतात. यामध्ये सर्वात महत्वाचा निकष म्हणजे साहित्याची गुणवत्ता हा होय, निवडलेले साहित्य हे गुणवत्तापुर्ण असणे गरजेचे आहे, साहित्याची भाषा, साहित्याचा दर्जा, साहित्याची काठिण्यपातळी, मुलांच्या आकलन क्षमतेस पुरक हे निकष साहित्य निवडतांना लावले जातात. मुलांच्या सर्वांगिण विकासास पुरक असणारे साहित्य निवडले जाते.''

१२. किशोर मासिक इतर मुद्रित प्रसारमाध्यम प्रकाशित करते का? असल्यास कोणत्या नावाने? या प्रश्नाचे उत्तर पुढीलप्रमाणे मिळाले, ''किशोर मासिक हे बालभारती प्रकाशित करते, त्यामुळे किशोर मासिक इतर कोणत्याही प्रकारचे मुद्रित प्रसारमाध्यम प्रकाशित करत नाही.''

१३. मुलांच्या मुद्रित माध्यमाविषयी (किशोरसह इतर) आपल्या सूचना कोणत्या आहेत? त्यांनी मांडलेल्या सुचना पुढीलप्रमाणे, ''आज वेगवेगळ्या भाषेमध्ये मुलांचे मुद्रित प्रसारमाध्यमे प्रकाशित होतात, मात्र मराठी भाषेत मुलांसाठी असणारे मुद्रित प्रसार माध्यमे खूपच कमी आहेत. मुलांच्या मुद्रित प्रसारमाध्यमांची संख्या वाढविणे खूप गरजेचे आहे. ग्रामीण भागातील, दुर्गम व अति दुर्गम भागात राहणाऱ्या मुलांपर्यंत मुद्रित प्रसारमाध्यमे व त्यातील बालसाहित्य पोहोचायला हवे. नामवंत लेखकांनी मोठ्यांसाठी लेखन करणाऱ्या मान्यवर लेखकांनी, कवींनी लहान

मुलांसाठी लेखन करायला हवे. वेगवेगळ्या मुलांच्या मुद्रित प्रसारमाध्यमात यशस्वी खेळाडू, शास्त्रज्ञ, कलाकार, उद्योजक यांनी मुलांसाठी प्रेरणादायी लेखन करावे.''

वरीलप्रमाणे किशोर या मुद्रित प्रसारमाध्यमाचे कार्यकारी संपादक किरण केंद्रे यांची अभ्यास विषयाच्या दृष्टीने विस्तृत मुलाखत घेतली आहे.

किशोर मासिकाचे कार्यकारी संपादक किरण केंद्रे यांच्या मुलाखतीमधील खालील माहिती संशोधन विषयाच्या उद्दिष्टपुर्तीसाठी महत्वपूर्ण ठरते.

– किशोरचे संपादक उच्चशिक्षीत असून विविध माध्यमातून सातत्याने त्यांचे लिखाण सुरु असते.

– किशोरचे कार्यकारी संपादन करीत असतांना 'लोकराज्य'चे सहसंपादक म्हणून काम करतात.

– मुलांमध्ये अवांतर वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञान मिळावे, संवेदनशील मनावर उत्तम मूल्यांचे संस्कार व्हावेत ही उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून किशोर मासिक सुरु झाले.

– किशोर मासिकासाठी फक्त काही वेळा मान्यवर व्यक्ती आणि संबंधीत विषयातील तज्ञ व्यक्तीकडून साहित्य मागवले जाते. परंतु इतर वेळा जास्तीत जास्त आलेल्या साहित्यामधून निवडले जाते.

–साहित्याची गुणवत्ता हा निकष किशोर मासिकासाठी साहित्य निवडतांनालावला जातो. गुणवत्ता पाहत असतांना साहित्याची भाषा, दर्जा, काठीण्य पातळी, मुलांच्या आकलन क्षमतेस पुरक मुलांच्या सर्वांगीण विकासास सहाय्यभूत या निकषांचा विचार केला जातो.

– किशोर मासिकाचा खप ७६ हजार असून सर्व अंकांची विक्री होते.

– मराठी भाषिक माध्यमांची संख्या कमी असून खेडोपाडी राहणाऱ्या मुलांपर्यंत बालसाहित्य पोहचणे आवश्यक आहे.

**डॉ.गिताली टिळक – मोने :**

छावा मासिकाच्या संपादिका डॉ.गीताली टिळक–मोने यांची मुलाखत प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी घेण्यात आली. मुलाखतीमध्ये विचारण्यात येणाऱ्या प्रश्नाची कल्पना छावाच्या संपादिका डॉ.गिताली टिळक मोने यांना देण्यात आली. मुलाखतीमध्ये त्यांना संशोधन विषयाच्या अनुषंगाने प्रश्न विचारण्यात आले. मुलाखतीद्वारे मिळालेल्या प्रश्नांची उत्तरे लिखित स्वरुपात शब्दबद्ध करण्यात आली. लिखित स्वरुपात शब्दबद्ध केलेली माहिती पुढीलप्रमाणे

मुलाखतीमध्ये पुढील प्रश्न विचारुन मुलाखतदात्या डॉ.गिताली टिळक–मोने यांच्याकडून विषयाच्या अनुषंगाने पुढील माहिती मिळाली.

१. आपले शिक्षण काय झाले आहे? या प्रश्नाचे उत्तर पुढील प्रमाणे प्राप्त झाले. ''माझे शिक्षण हे वेगवेगळ्या विषयामध्ये झाले आहे. अनेक विषयाच्या पदव्या प्राप्त केलेल्या आहेत. यामध्ये बीसीएस व्यवस्थापनशास्त्रातील एम.बी.ए., पत्रकारिता मधील एम.जे. (मुद्रित माध्यम),पत्रकारिता व व्यवस्थापन विषयात स्वतंत्रपणे पीएचडी, डी.लिट. सर्टिफिकेट–२ डी आणि ३ डी ॲनिमेशन, ज्युडो ब्लॅक बेल्ट, असोसिएट मास्टर इकेबाना इत्यादींसह अनेक शिक्षण पूर्ण केलेले आहेत. वेगवेगळ्या विषयाचे ज्ञान मिळविण्यासाठी वेगवेगळ्या विषयाचे शिक्षण होत असते.''

२. लेखन, कला व इतर क्षेत्रातील आपले योगदान काम आहे? या प्रश्नाचे उत्तर पुढील प्रमाणे मिळाले. ''लेखनाची आवड व छंद आहे. वेगवेगळ्या विद्यार्थी,समाज विषयी आवश्यक व महत्वपूर्ण माहिती मांडण्याचा प्रयत्न नेहमी चालू असतो. इकेबीना या कलेची जोपासना तसेच ज्युडो क्षेत्रातही योगदान दिले आहे.''

३. छावा या मुद्रित प्रसारमाध्यमाच्या संपादिका म्हणून कधीपासून कार्यरत आहात? या प्रश्नाचे उत्तर देताना म्हणाल्या. ''छावा हे मुद्रित प्रसारमाध्यम अनेक वर्षांपासून मुलांच्या मनावर राज्य करते. छावाची संपादिका म्हणून सन २०१३ पासून मी कार्यरत आहे. त्यापूर्वी छावाचे संपादक मा.डॉ.दिपक टिळक होते.''

४. छावापूर्वी अथवा आज  अखेर इतर मुद्रित प्रसारमाध्यमाच्या संपादिका आहात का? असल्यास, कोणत्या या प्रश्नाचे उत्तर पुढील प्रमाणे प्राप्त झाले. ''छावापूर्वी अथवा आजअखेर इतर मुद्रित प्रसारमाध्यमाच्या संपादिका आहे मराठा त्रैमासिक (ISSN 0076-257) या मुद्रित प्रसारमाध्यमाची कार्यकारी संपादक म्हणून काम पाहत आहे. यामध्ये वेगवेगळ्या विषयांना, संशोधन लेखांना प्रकाशित केले जाते.''

५. कोणते उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून छापा मासिक सुरु करण्यात आले? या प्रश्नाचे उत्तर देतांना डॉ.गीताली टिळक मोने म्हणाल्या. ''छावा या मुद्रित प्रसारमाध्यमाची वाटचाल सुनिश्चित दिशेने चालू आहे. इ.स. १९८३ पूर्वी लहान मुलांसाठी विशेष असे मुद्रित प्रसारमाध्यम नव्हते. त्यामुळे बालवाचक डोळ्यासमोर ठेवून छावा मासिकाची सुरुवात झाली. शालेय मुलांना डोळ्यासमोर ठेवून छावा मासिकाची सुरुवात झाली. मुलांवर योग्य संस्कार व्हावेत, कलागुणांना वाव मिळावा. त्याच्यामध्ये वेगवेगळे कौशल्य विकसित व्हावेत. त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून छावा हे मुद्रित प्रसारमाध्यम चालवले जाते.''

६. आज अखेर छावा मासिकाचे किती अंक प्रकाशित होतात? या प्रश्नाचे उत्तर पुढील प्रमाणे प्राप्त झाले. ''छावा हे मुद्रित प्रसार माध्यम आता साप्ताहिक रुपाने प्रसिद्ध होते. आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी छावा हे मुद्रित प्रसारमाध्यम प्रकाशित होते. छावा हे सद्यस्थितीत दैनिक केसरी सोबत प्रकाशित होते. दैनिक केसरीच्या शनिवारच्या अंकाएवढे छावाचे अंक प्रकाशित होतात.''

७. एकूण प्रकाशित अंकापैकी छावाचे किती अंक मोफत दिले जातात? या प्रश्नाचे उत्तर देतांना म्हणाल्या ''छावाचा एकही अंक मोफत दिला जात नाही''

८. एकूण प्रकाशित अंकापैकी किती अंकांची विक्री होते? या प्रश्नाचे उत्तर पुढील प्रमाणे मिळाले. ''छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांविषयी वाचक मुलांमध्ये गोडी निर्माण झाली आहे मुले छावा मिळावा म्हणून शनिवारच्या दै.केसरीची आतुरतेने वाट पाहत असतात यामुळे प्रकाशित झालेल्या सर्वच अंकांची विक्री होते.''

९. छावामध्ये कोणकोणत्या साहित्य प्रकारास अधिक प्राधान्य दिले जाते ? या प्रश्नाचे उत्तर पुढीलप्रमाणे प्राप्त झाले. ''मुलांच्या सर्वांगीण व कौशल्यपूर्ण विकासासाठी सर्वच प्रकारचे साहित्य प्रकाशित होणे आवश्यक असते. मुलांच्या कौशल्य विकासास पुरक,

सकारात्मकता वाढीस लावणारे साहित्य, मुलांना प्रेरणा देणारे, तसेच मुलांना चालना देणाऱ्या साहित्य प्रकारास छावामध्ये प्राधान्य दिले जाते. यामध्ये प्रामुख्याने कथा, कविता, माहितीवर लेख, कोडी, करुन पहा, कला कौशल्य, शालेय अभ्यासक्रम या साहित्यप्रकारास प्राधान्य दिले जाते''

१०. छावासाठी साहित्य कसे निवडले जाते? या प्रश्नाचे उत्तर देतांना डॉ.गीताली टिळक म्हणाल्या. ''छावासाठी साहित्याची निवड ही अंकानुसार ठरते. दिवाळी अंकापूर्वी आणि विशेष अंकाकरिता आवश्यक साहित्य विषयातील तज्ज्ञ व अभ्यास व्यक्तीकडून मागवले जाते. इतर अंकासाठी छावाकडे आलेल्या मजकूरातून योग्य मजकूर निवडला जातो''

११. छावासाठी साहित्य निवडतांना कोणते निकष लावले जातात? या महत्वपूर्ण प्रश्नाचे उत्तर पुढीलप्रमाणे प्राप्त झाले ''मुलांच्या मुद्रित प्रसारमाध्यमाचा दर्जा टिकवणे खुप महत्वाचे असते. उत्तम दर्जा असणारे साहित्य, शालेय मुलांच्या सर्व वयोगटाला योग्य, मुलांच्या कौशल्य विकसनास सहाय्यभूत, मुलांना सहज आकलनीय व योग्य काठिण्यपातळी, मुलांच्या भावनिक, मानसिक, सामाजिक इत्यादी सर्वांगिण विकासाला पुरक हे निकष छावासाठी साहित्य निवडतांना लावले जातात.''

१२. छावा इतर मुद्रित प्रसारमाध्यम प्रसिद्ध करते का? असल्यास कोणत्या नावाने? या प्रश्नाचे उत्तर देतांना त्या म्हणाल्या''छावा हे मुद्रित प्रसारमाध्यम इतर कोणत्याही प्रकारचे मुद्रित प्रसारमाध्यम प्रकाशित करत नाही''

१३. छावाच्या प्रकाशन कालावधीमध्ये बदल करण्यामागचा हेतु कोणता होता? या प्रश्नाचे उत्तर देतांना म्हणाल्या. ''छावा हे मुलांचे आवडते मुद्रित प्रसारमाध्यम आहे. त्यामुळे छावाची मागणी वाढली होती. मुलांमधून छावामध्ये अधिक साहित्य असावे अशी मागणी होती. म्हणून मुलांमधील छावाची लोकप्रियता लक्षात घेवून किंमत ५ रुपये ठेवून मासिक छावा साप्ताहिक म्हणून प्रकाशित होवू लागला ही सकारात्मकता ठेवून छावााच्या प्रकाशन कालावधीमध्ये बदल करण्यात आला''

१४. मुलांच्या मुद्रित प्रसार माध्यमांविषयी आपल्या सुचना कोणत्या आहेत? या प्रश्नाचे उत्तर पुढीलप्रमाणे प्राप्त झाले. ''आज मुलांसाठी मासिक, साप्ताहिक पाक्षिक इत्यादी नियतकालिक प्रसिद्ध होतात. मुले ही संवेदनशील असतात म्हणून त्यांच्या मनावर सहज

संस्कार होतात. यामुळे मुलांच्या माध्यमातील साहित्य हे संस्कारक्षम असावे. मुद्रित माध्यमाने मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने योग्य असणाऱ्या साहित्याला स्थान द्यावे. मुलांच्या एकाधिक बुद्धिमत्ता लक्षात घेवून बुद्धिमत्तेला पुरक असणारे साहित्य निवडावे''

छावाच्या संपादिका डॉ.गिताली टिळक–मोने यांच्या मुलाखतीमधील खालील माहिती प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी महत्वपुर्ण ठरते. डॉ.गिताली टिळक–मोने यांच्या मुलाखतीमधून प्राप्त झालेल्या माहितीमधील महत्त्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे.

– छावा मासिकाचे संपादिका उच्चशिक्षीत असून विविध मासिकातून, दैनिकातून लिखाण करतात.

– छावा मासिकाचे संपादन करीत असतांना 'मराठा' त्रैमासिकाचे संपादन करतात.
– शालेय मुलांकरिता मासिक असावे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर छावा मासिक सुरु झाले.
– छावा मासिकासाठी दिवाळी अंकासाठी आणि विशेष अंकाकरिता तज्ज्ञ व्यक्तीकडून साहित्य मागीतले जाते. मात्र इतर वेळी आलेल्या साहित्यामधून निवडक साहित्य छापले जाते.
– शालेय मुलांना योग्य निकष छावा मासिकासाठी साहित्य निवडतांना लावले जातात. शालेय मुलांना योग्य म्हणजे मुलांच्या वयानुरुप भाषा, मुलांच्या आकलनास योग्य होय.
– मुलांच्या माध्यमांसाठी साहित्य निवडतांना मुलांच्या सर्वांगीण विकासास पुरक, मुलांची बुद्धिमत्ता लक्षात घेवून साहित्य निवडावे.

किशोर मासिक व छावा मासिक संपादकांच्या मुलाखतीवरुन मार्गदर्शक बाबी समोर आल्या. दोन्ही संपादक उच्चशिक्षीत असून मुद्रित माध्यमामध्ये लेखनाचा अनुभव असल्याचे स्पष्टहोते. मुलांच्या वयानुरुप योग्य, आकलनास सोपे, सर्वांगीण विकासास सहाय्यभूत, संस्कारक्षम, मुल्याधिष्ठित हे निकष किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमातील साहित्य निवडतांना लावले जातात हे सिद्ध होते.

## ९. समारोप

माहिती संकलन व आशय विश्लेषण प्रकरणामध्ये संशोधन विषयाशी संबंधीत उद्दिष्टानुसार माहिती संकलन केले आहे. छावा मासिकाच्या माहितीचे संकलन, किशोर मासिकाच्या माहितीचे संकलन, शिक्षक व मुलांच्या प्रश्नावलीद्वारे संपादकांच्या मुलाखत माहितीचे संकलन प्रस्तुत प्रकरणात केलेले आहे.

सारणीमध्ये संकलित माहिती वर्षवार नोंदवण्यात आली. नोंदवलेल्या माहितीच्या आधारावर टक्केवारी काढून आलेख काढण्यात आले. आलेखाच्या आधारे आशय विश्लेषण करण्यात आले. शिक्षक व विद्यार्थी प्रश्नावलीसाठी सारणीचा वापर करुन आलेखाच्या आधारे विश्लेषण मांडण्यात आले. संपादकांच्या मुलाखतीततून मिळालेल्या तथ्यांचे विश्लेषण करण्यात आले.

## संदर्भ


१. प्रा.घोटाळे रा.ना. (२००९), समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती. नागपूर : श्री मंगेश प्रकाशन, पान : १७३

२. प्रा.डॉ.खैरनार दि.(२००९). प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी. पुणे : डायमंड पब्लीकेशन्स, पान : २८९

३. डॉ.आगलावे प्र. (२००९). प्रगत सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे. नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन. पान क्र.३७६

४. डॉ.आगलावे प्र. (२००७) : उपरोक्त : पान क्र.३७६

५. प्रा.डॉ.मायी सु. (२००८). सामाजिक संशोधन पद्धती. पुणे : डायमंड पब्लिकेशन. पान क्र.२०३

६. प्रा.डॉ.खैरनार दि. (२००९) : उपरोक्त : पान क्र.२९०

७. संपादक : इनामदार मनोहर (२०१८), प्रेरणादायी उपक्रमांची प्रयोगशाळा अहमदनगर : शब्दगंध प्रकाशन, पान :५

८. डॉ.जोशी सुनिता (१९९०), शिक्षण प्रवा, (लेख), पुणे : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे. (पान : २५) (लेख)

९. आलेगावर प.म. (२००५), अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र, पुणे : सुविचार प्रकाशन मंडळ, पान : १५७

१०. आंबेकर नी.श.(१९९०) शिक्षणप्रवाह (मूल्यांचे शिक्षण) (लेख)

११. डॉ.ससाणे मनोहर (२०१४) मूल्यसंस्कार, पाचवड (ता.वाई): सानिया पब्लिकेशन, पान :२८

१२. अतुल प्र.कुलकर्णी : पान १

१३. श्री. मंडलिक विश्वास (१९९९), विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची साधना, नाशिक : योग चैतन्य प्रकाशन, पान : २२

१४. धुमाळ वाणी : लेख : प्रेरणादायी

प्रकरण : ५

# सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

१. प्रस्तावना

२. सारांश

३. निष्कर्ष

४. गृहितकृत्य पडताळणी

५. शिफारशी/सुचना

६. पुढील संशोधनाची दिशा

## १. प्रस्तावना

विषयाला अनुसरुन असणारी माहिती अभ्यासक गोळा करतो. जमा झालेली आवश्यक माहिती विषयाप्रमाणे व उपविषयाप्रमाणे विभागली जाते. जमा झालेल्या माहितीचे समानतेच्या आधारावर वर्गीकरण केले जाते. माहितीचे वर्गीकरण केल्यानंतर माहितीवर शास्त्रीय पद्धतीने प्रक्रिया करावी लागते. वेगवेगळ्या स्वरुपाची माहितीचा आलेख, स्तंभीकरण, आकृत्या, चित्रमालिका यांचा आधार घेवून विश्लेषण करावे लागते.

वाचकाला समजेल अशा स्वरुपात आणि शास्त्रीय पद्धतीने माहिती मांडली जाते. या प्रक्रियेमधून निष्कर्ष निघतात. हे निष्कर्ष अभ्यासक समाजासमोर मांडत असतो. निष्कर्ष हे समाजाच्या हिताचे तसेच मानवाची प्रगती साधणारी असणे अपेक्षित असतात. समाजाच्या अडचणी सोडवण्यासाठी समस्याची उकल करण्यासाठी, संशोधन महत्त्वाचे असते.

संशोधनातील सर्वच आवश्यक टप्प्यांची पुर्तता अभ्यासात केलेली आहे. सामान्यपणे गृहितकाच्या मांडणीपासून प्रारंभ झालेला अभ्यास निष्कर्ष मांडणी अंती संपतो. संशोधनात प्राप्त झालेले निष्कर्ष नियम म्हणून अस्तित्वात येतात. यामुळे समाजातील अथवा विषयातील जुने नियम खोडले जातात. अज्ञात घटक निष्कर्ष मांडणीमधून समोर येतो. म्हणून निष्कर्षाची मांडणी अचूक पद्धतीने, सर्वांना समजेन अशा सोप्या पद्धतीत करणे आवश्यक आहे.

संशोधनातील निष्कर्ष समाजासाठी व भविष्यातील अभ्यासकांसाठी या प्रकरणात मांडले आहेत. गृहितकृत्याची तपासणी करुन विषयाशी निगडीत घटकांच्या बाबतीत अभ्यासाची पुढील दिशा या प्रकरणात स्पष्ट केली आहे.

## २. सारांश :

भारतामध्ये मुद्रण सुरु करण्याचे श्रेय पाश्चिमात्य लोकांना जाते. घटना,घडामोडी, बातम्या देण्याबरोबरच ज्ञान, मनोरंजन, प्रबोधन करण्याचे कामही मुद्रित माध्यमे निभावतात. भारतात मुलांसाठी स्वतंत्र वृत्तपत्र अस्तित्वात असून ती नियमीतपणे छापली जातात.

मुलांच्या ज्ञानात भर टाकण्याचे, विविध प्रकारची माहिती देण्याचे, मनोरंजन करण्याचे, मुलांना क्रियाशील बनवण्याचे कार्य मुलांच्या वृत्तपत्राद्वारे घडत असते. वृत्तपत्रामध्ये नाविन्य असून मजकूरातही वेगळेपणा असतो. मजकूर बालकांना केंद्रित मानून छापलेला असतो. मुलांचे लक्ष घापलेल्या मजकूराकडे वेधण्यासाठी माध्यमे नेहमी प्रयत्नशील असतात. वेगवेगळ्या

कल्पना माध्यमातून मांडून खप वाढवण्याचा प्रयास करणे चालू असते. यामध्ये काही चुकीच्या बाबी मजकुरात अंतर्भाव होण्याची शक्यता असते. चांगल्या बाबीच्या वृद्धीसाठी आणि अनावश्यक व नकारात्मक बाबींच्या शोधासाठी वृत्तपत्रातील संशोधन आवश्यक असते.

प्रस्तुत संशोधन विषयाशी निगडीत असणाऱ्या सर्वच घटकाचे सुक्ष्म अध्ययन संशोधकाने केले आहे. संशोधन विषय, उद्दिष्टे, अभ्यासिन मासिकावर दृष्टीक्षेप इत्यादी घटकांचा सुक्ष्म अभ्यास केला आहे.

भारतीय वृत्तपत्रांचा आढावा, बंगालीसह सर्वच स्वदेशी भाषीक वृत्तपत्रांचा अभ्यास संशोधनात केला. चित्रलिपी, लोकनाट्य, बखर, पत्रे, पारंपारिक साधनावर दृष्टीक्षेप टाकला.

**या विषयाचा सारांश प्रबंधाच्या सुरुवातीस स्वतंत्रपणे आणि सविस्तरपणे मांडला आहे.**

**३. निष्कर्ष :**

समाजातील घटकांकडून माहिती जमा करुन संशोधन केले जाते. जमा झालेल्या माहितीमधील अनावश्यक भाग वगळला जातो. आवश्यक माहितीवर अभ्यासाच्या आवश्यकतेनुसार प्रक्रिया करुन निष्कर्ष प्राप्त केले जातात. निष्कर्ष संशोधनाचा आत्मा असून नवीन नियमांना जन्म घालतात.

विषयाचा अभ्यास योग्य पद्धतीने केल्यावर अचुक निष्कर्ष प्राप्त होतात. निष्कर्ष हे अंतिम सत्य असून त्याचे पुनर्परिक्षण अथवा तपासणी करता येते. संशोधनाची सुरुवात गृहितकृत्याच्या निश्चितीपासून वेगवेगळे टप्पे पार पाडत निष्कर्षापर्यंत येवून थांबते. घटकातील अदृश्य माहिती नियम निष्कर्षामुळे समाजासमोर येतात.

या अभ्यासातून प्राप्त झालेले निष्कर्ष खालील प्रमाणे :

१. मुलांच्या वयानुरुप योग्य, आकलनास सोपे, विकासास सहाय्यभूत, संस्कारक्षम, मूल्याधिष्ठीत हे निकष किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमासाठी साहित्य निवडतांना लावले जातात.
२. सन २००८ ते २०१८ अखेर किशोरने कथा या साहित्य प्रकारास ३८.६२ टक्के स्थान दिले. यावरुन अभ्यासीन कालावधीमधये किशोरने कथा या साहित्य प्रकारास सर्वाधिक स्थान दिले. छावाने सन २००८ ते सन २०१५ अखेर कथा या साहित्य प्रकारास ३८.३० टक्के स्थान दिले. सन २००८ ते २०१८ अखेर लेख या साहित्य

प्रकारास २७.२४ टक्के स्थान दिले. यावरुन छावाने सन २००८ ते सन २०१५ अखेर कथा या साहित्य प्रकारास आणि सन २०१६ ते २०१८ अखेर लेखन या साहित्य प्रकारास सर्वाधिक स्थान दिले.

३. सन २००८ ते २०१८ अखेर भाषा (मराठी) विषयाला किशोरने ७९.७४ टक्के व छावाने भाषा (मराठी) विषयाला ५०.४३ टक्के स्थान दिले. यावरुन अभ्यासीन कालावधीमध्ये किशोर व छावाने भाषा (मराठी) विषयास सर्वाधिक स्थान दिले असा निष्कर्ष निघतो.

४. संशोधनातील सहभागी शिक्षकापैकी अनुक्रमे ९६ टक्के व ९५ टक्के शिक्षक किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमातील मुलांच्या साहित्यामुळे मुलांच्या भाषीक क्षमता विकसनात मदत होते असे स्पष्ट करतात. यावरुन मुलांच्या भाषीक क्षमता विकसनामध्ये माध्यमातील साहित्य सहाय्यभूत ठरते असा निष्कर्ष निघतो. वाचन क्षमता विकसनात साहित्याची सर्वाधिक मदत होते.

५. संशोधनातील सहभागी शिक्षकांपैकी अन्रुकमे ९१ टक्के शिक्षक व ९० टक्के शिक्षक किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमातील मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या साहित्यामध्ये मूल्ये असतात असे स्पष्ट करतात. किशोर व छावा या  मुद्रित प्रसारमाध्यमाने मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य मूल्याधिष्ठीत असते आणि मुलांवर उच्च दर्जाच्या मूल्यसंस्कारासाठी त्याचा उपयोग होतो.

६. ज्ञान व माहिती मिळवण्यासाठी अनुक्रमे ५४ टक्के व ५३ टक्के मुले किशोर व छावा या मुद्रित प्रसरमाध्यमाचे वाचन करतात. ज्ञान व माहिती मिळवणे हा मुलांच्या माध्यमातील साहित्य वाचनामागील मुख्य हेतू आहे. मनोरंजन हा छंद हे साहित्य वाचनामागचे पुरक उद्देश आहेत.

७. किशोर व छावा या मुद्रित माध्यमातील चित्रकथा अनुक्रमे  ३० टक्के मुलांना व ३२ टक्के मुलांना सर्वाधिक आवडतात. किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमातील चित्रकथा हा साहित्य प्रकार मुलांना सर्वाधिक आवडतो.

८. संशोधनात सहभागी केलेल्या शिक्षकांपैकी फक्त १ टक्के शिक्षक मुलांसाठी मुद्रित प्रसार माध्यमात (किशोर/छावा/इतर) लिखान करतात. मुलांसाठी मुद्रित माध्यमात अत्यल्प शिक्षक लिखाण करतात.

९. संशोधनात सहभागी झालेल्या ७७ टक्के विद्यार्थ्यांना मुद्रित प्रसारमाध्यमाचे (किशोर/छावा/इतर) वाचन करण्यासाठी शिक्षक प्रोत्साहन देतात. शिक्षक मुलांना माध्यमातील साहित्य वाचनासाठी सर्वाधिक प्रोत्साहन देतात.

**४.गृहितकृत्ये पडताळणी :**

विषयाच्या अभ्यासाचे गृहितकृत्ये प्रकरण ३ मध्ये नमूद केले आहेत. विषयाचे एकूण सहा गृहितकृत्ये मांडले असून त्याची तपासणी या उपघटकात केली.

गृहितकृत्ये फक्त अनुमान राहू नयेत म्हणून त्यांची तपासणी करावी लागते. गृहितकृत्याचे परीक्षण झाले नाही तर अंदाज म्हणून राहतात. विषयाबाबतीत जमा केलेल्या तथ्यांच्या मदतीने गृहितकृत्याची तपासणी करावी लागते. तपासणीपश्चात गृहितकृत्ये सत्य अथवा असत्य आहेत हे स्पष्ट होते. गृहितकृत्ये खरे आहेत की खोटे हे तथ्यांच्या मदतीने तपासून पाहणे म्हणजे गृहितकृत्य पडताळणी होय.

तपासणी गृहितकृत्यांची केली जात नसून त्याच्या परिणामांची केली जाते. यामध्ये वेगवेगळ्या घटकांचा समावेश होतो. गृहितकृत्य अभ्यासास निश्चित व ठराविक दिशा देण्याचे काम करतात. अनेक पुराव्यांच्या आधारावर गृहितकृत्य खरे आहे की असत्य ठरवले जाते. गृहितकृत्य तयार करतांना विचारमूल्ये, दृष्टीकोन बाजूला ठेवावे लागतात. यामुळे गृहितकृत्याची व्यावहारिकता पडताळता येते. या अभ्यासामध्ये वैचारिक पातळीवर गृहितकृत्याची तपासणी केली आहे. विषयाच्या गृहितकृत्याच्या पडताळणीसाठी वेगवेगळ्या घटकांचा वापर केला जातो.

विषयाच्या गृहितकृत्याची पडताळणी खालीलप्रमाणे.

**गृहितकृत्ये १ : किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमातील मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य मुलांच्या संदर्भात असणाऱ्या विविध बाबींचा विचार करुन निवडले जाते.**

प्रकरण ४ मधील अभ्यासीन संपादकांच्या मुलाखतीच्या आशय विश्लेषणानुसार हे गृहितकृत्ये सिद्ध झाले आहे.

**गृहितकृत्य २ :किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य मुलांच्या वेगवेगळ्या साहित्य प्रकारास कमी–अधिक प्रमाणात स्थान देतात.**

प्रकरण ४ मधील किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमाच्या साहित्यनिहाय आशय विश्लेषणानुसार हे गृहितकृत्ये सिद्ध झाले आहे.

**गृहितकृत्य३ : किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य अभ्यासक्रमातील विविध विषयांशी संबंधीत असते.**

प्रकरण ४ मधील किशोर व छावा या मुद्रीत प्रसाार माध्यमाच्या विषयनिहाय आशय विश्लेषणानुसार हे गृहितकृत्य सिद्ध झाले आहे.

**गृहितकृत्य ४ :किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या साहित्यामुळे मुलांच्या भाषीक कौशल्य (क्षमता) विकसनास मदत होते.**

प्रकरण ४ मधील शिक्षक सर्वेक्षणातील क्र.५ अ व ६ अ नुसार हे गृहित कृत्य सिद्ध झाले आहे.

**गृहितकृत्य ५ : किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य वाचनामागील मुलांचा हेतू वेगवेगळा असतो.**

प्रकरण ४ मधील मुलांच्या सर्वेक्षणातील क्र.६ व ७ नुसार हे गृहित कृत्य सिद्ध झाले आहे

**गृहितकृत्य ६ : किशोर व छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य मुलांवर मुल्यसंस्कार करण्यासाठी उपयोगी आहे.**

प्रकरण ४ मधील शिक्षक सर्वेक्षणातील क्र.३ व ४ नुसार हे गृहितकृत्य सिद्ध झाले आहे.

वरीलप्रमाणे अभ्यासाच्या दृष्टीने गृहितकृत्याची तपासणी पुर्ण केली.

## ५.शिफारशी / सुचना :

माध्यम समाजाच्या प्रतिक्रियांचा आरसा असतो. समाज प्रगतीपथावर जाण्यासाठी माध्यमांनी कणखर भूमिका घेणे गरजेचे असते. आजच्या मुलांचे भवितव्य, पुढील भविष्यकाळातील वाटचाल प्रभावी होण्यासाठी त्यांचे माध्यमे प्रभावी असणे गरजेचे आहे. म्हणून या संशोधनातून खालील शिफारशी मांडल्या.

१. किशोर,छावा व इतर मुद्रित माध्यमांमध्ये शालेय अभ्यासक्रमातील सर्व विषयांना सर्व समावेशक जागा मिळावी.
२. किशोर,छावा व इतर मुद्रित माध्यमांमध्ये उपयुक्ततेनुसार साहित्यास जागा मिळावी.
३. किशोर,छावा व इतरमुद्रित माध्यमामध्ये मुलांच्या कथेचा आशय चित्रकथांच्या रुपाने छापण्यात यावा.
४. शासकीय स्तरावरुनप्राथमिक शाळांना मुलांचे नियतकालीक पुरवण्यात यावेत.
५. किशोर,छावा व इतरमुद्रित माध्यमांनी व शासकीय स्तरावरुन शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या नियतकालीकात लिखाणासाठी प्रेरित करावे.
६. मुले क्रियाशील बनावेत म्हणूनकिशोर,छावा व इतरमुद्रित माध्यमात कृती आधारित घटकांना स्थान द्यावे.
७. मुलांची एकाग्रता, निरीक्षण क्षमता वाढीस लागावी म्हणूनकिशोर,छावा व इतरमुद्रित माध्यमात उपयुक्त साहित्य छापण्यात यावे
८. मुलांच्या मुद्रित माध्यमांनी अभ्यासक्रमातील विषयाच्या संकल्पना स्पष्ट करण्यासाठी प्रयत्न करावा.

## ६.पुढील संशोधनाची दिशा :

विषयाच्या घटकाचा अभ्यास करण्यासाठी अनेकाधिक संशोधनाची आवश्यकता असते. घटकामध्ये अनेक सुक्ष्म उपघटक असतात. सर्वच उपघटक एका संशोधनात समाविष्ट करणे अशक्य असते. माध्यमातील वेगवेगळ्या घटकांवर संशोधन कण्यासाठी प्रचंड वाव आहे. वृत्तपत्रविद्यामध्ये तसेच शिक्षणशास्त्र, बालमानसशास्त्रामधील अभ्यासक खालील घटकाच्या संदर्भात संशोधन करु शकतात.

१. शिक्षण आणि माध्यमे.

२. बालविकास आणि माध्यमे

३. मुलांच्या नियतकालिकातील साहित्याचे विविध घटकांच्या संदर्भात संशोधन.

४. माध्यमांचा समाजावरील परिणाम

५. मुलांच्या नियतकालिकातील जाहिराती

६. मासिक किशोरमधील बडबडगीते

७. साहित्य आणि माध्यम

८. माध्यमातील कवितांचे बदलते रुप

९. वेगवेगळ्या नियतकालिकांचा अभ्यास

१० मूल्ये संस्कार आणि नियतकालिके

११. वृत्तपत्र आणि लेखक

१२.साहित्याचे बदलते रुप

१३.छावाची वाङ्मयीन वाटचाल

१४.नियतकालिकातील परिणामकारक चित्रे

वरील क्षेत्रामध्ये विविध उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून अभ्यास करणे शक्य आहे. या क्षेत्रात समाजशास्त्रीय अभ्यासकास संधी उपलब्ध आहे. अभ्यासक स्वतः कल्पनाशक्तीनुसार यामध्ये बदल करुन संशोधन करु शकतो.

## संदर्भ/ग्रंथ सुची


१. डॉ.धारुरकर वि.ल. (२००८) जनसंवाद सिद्धांत, औरंगाबाद : चैतन्य प्रकाशन.

२. आलेगावकर प.म. (२००५) अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र. पुणे : सुविचार प्रकाशन, मंडळ.

३. लेले रा.के. (१९८४) : मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पुणे कॉन्टीनेन्टल प्रकाशन.

४. प्रा.डॉ.मायी सुनिल (२००८).सामाजिक संशोधन पध्दती. पूणे : डायमंड पब्लिकेशन्स.

५. डॉ. आगलावे प्रदिप (२००७). सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे. नागपूर : श्रीसाईनाथ प्रकाशन.

६. मंडलीक वि. (१९९९). विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाची साधना नाशिकः योग चैतन्य प्रकाशन.

७. डॉ. ससाणे म. (२०१२). मूल्यसंस्कार. पाचवड (जि.सातारा) : सानिया पब्लिकेशन्स.

८. प्रा. डॉ. खैरनार दि. (२००९). प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यिकी. पूणे : डायमंड पब्लिकेशन्स

९. डॉ. हंडिबाग भा. व डॉ.सरकटे स. (२०१४) दृकश्राव्य माध्यमांसाठी लेखन कौशल्ये. औरंगाबाद : एज्युकेशन पब्लिशर्स अॅण्ड डिस्ट्रब्युटर्स.

१०.कोल्हाटकर सं.व. कुलकर्णी प्र. (२००९) महाराष्ट्रातील प्रसारमाध्यमे, काल आणि आज. पुणे : डायमंड पब्लिकेशन्स पान क्र.१०२

११.बर्वे उ. (२००८) : जनसंज्ञापन व आधुनिक प्रसारमाध्यमे. नाशिक : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ

१२.डॉ.भोसले डी.एम. (२००९) इंटरनेट व वेब वृत्तपत्रे. औरंगाबाद : साक्षात प्रकाशन.

१३.डॉ.टिळक दि.ज. (२०१५) मासिक छावा, ९ मे २०१५ अंकातील लेख क्र. २

१४.प्रा.डॉ.राजा दीक्षित (२०१०) माणसाची गोष्ट (इ. ३ री) राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रमसंशोधन मंडळ

१५. नाईक बा. (१९८०) भारतीय ग्रंथमुद्रण पुणेः डॉ.सौ.शकुंतला लाटकर

१६.मेहेंदळे व्ही (२००५) मिडीया, पुणे, अनुबंध प्रकाशन.

१७.धारुरकर वि.ल. (२०११) पत्रकारितेचा दीपस्तंभ : आ.बाळशास्त्री जांभेकर. मुंबई :

भारतीय समाज विकास अकॅडमी.

१८. शेळके बी. (२०१२) : प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा, पुणे : स्नेहवर्धन प्रकाशन.

१९.गोळवलकर : पोटदुखे आर. (२०१४) : जनसंवाद सिद्धांत आणि व्यवहार, नागपूर : श्री मंगल प्रकाशन.

२०.देशपांडे अ.ना. (१९६६), मराठी वाङ्मयाचा इतिहास, पुणे.

२१.कानडे रा.गो. (१९३८) : मराठी नियतकालिकांचा इतिहास, मुंबई २ : कर्नाटक पब्लीशिंग हाऊस.

२२.जोशी वि.कृ. आणि लेले रा.के (१९५१). वृत्तपत्राचा इतिहास मुंबई : युगवाणी प्रकाशन.

२३.लेले रा.के. (२००४). मराठी वृत्तपत्राचा इतिहास (दुसरा भाग), पुणे : कॉन्टनेन्टल प्रकाशन.

२४.डॉ.धर्मेंद्र बी.आर. (२००६) हिंदी पत्रकारिता और प्रमुख पत्रकार, दिल्ली : अचिन्त्य प्रकाशन

२५.राजवाडे वि.का. : मराठ्यांच्या इतिहासाचे साधने : भाग १

२६.प्रियोळकर अ.का. (१९७४) हिंदुस्थानचे दोन दरवाजे मुंबई : गोवा हिंदु असोसिएशन

२७.उपाध्ये नि. (२००२) : युगप्रवर्तक बाळशास्त्री जांभेकर : काळ आणि कर्तृत्व पुणे : श्रीविद्या प्रकाशन.

२८.प्रियोळकर अ.का. (१९४७) : संपादक रावसाहेब दादोबा पांडूरंग.मुंबई : पान १८७, १८८.

२९.शेजवळकर त्र्यं.श.:एक शतकापुर्वीची मराठी वृत्तपत्रे.किर्लोस्कर.नोव्हें.१९३७ दिवाळी अंक

३०. बोरोले अ.सु. (२०१२), दुर्भ भ्रमंती नाशिकची. पुणे : स्नेहल प्रकाशन.

३१.डॉ.पवार ज.भा. (१९९९), शिवाजी व शिवकाल. कोल्हापूर : फडके प्रकाशन.

३२.कुलकर्णी अ.रा. (१९९९). अशी होती शिवशाही. पुणे : राजहंस प्रकाशन.

३३.काळे भ. (१९८८) संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज. जालना : संकेत प्रकाशन

३४.डॉ.सावळे/मोरे दी.दि. (२०१३) मराठ्यांचा इतिहास, औरंगाबाद एज्युकेशनपब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स

३५. शिंदे सरकार अ. (२०००) मराठे व प्राचीन महाराष्ट्र, इस्लामपुर : सह्याद्रीप्रकाशन संस्था.
३६. डॉ.मोरे स.व इतर (२०१६). इतिहास व नागरिकशास्त्र इयत्ता सहावी. पुणेः .महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ
३७.डॉ.देगलूरकर गो.बं. (१९९९). दुर्गमदुर्ग देवगिरी. मुंबई : पुरातत्व वस्तु संग्रहालय संचलनालय, महाराष्ट्र शासन.
३८.पुरंदरे बा. (२०१०) राजा शिवछत्रपती, पुर्वार्ध, पुणे. पुरंदरे प्रकाशन
३९.शिंदे सरकार अ.(२००५) हिंदवी स्वराज्याचा शिल्पकार, राजमाता जिजाऊ साहेब यांचे चरित्र : एक चिकित्सा. पुणे : सह्याद्री प्रकाशन.
४०.महेंदळे ग.भा. (१९९९). श्री राजा शिवछत्रपती, भाग १. पुणे : डायमंडपब्लिकेशन
४१.डॉ.देशपांडे प्र.नं. (२००२). छत्रपती शिवाजी महाराज मुंबई : महाराष्ट्र राज्यसाहित्य आणि संस्कृती मंडळ.
४२.कुलकर्णी अ.रा. (२०११) मध्ययुगीन महाराष्ट्र. पुणेःराजहंस प्रकाशन.
४३.डॉ.कुंटे भ.ग. (१९८२). गुलशने इब्राहिमी. मुंबई :महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मंत्रालय.
४४.कुलकर्णी अ.रा./ खरे ग.ह. (१९८४) मराठ्यांचा इतिहास भाग दुसरा. पुणे :कॉन्टीनेन्टल प्रकाशन.
४५.कुलकर्णी अ.रा. (२०००) कंपनी सरकार (ईस्ट इंडिया कंपनी). पुणे : राजहंस प्रकाशन
४६.गिरासेवि.आणि पाटील रा. (२०१६) भुगोल. पुणे : युनिक अकॅडमी पब्लिकेशन्स प्रा. लि.,
४७.डॉ.कठारे अ., डॉ.पाटील सु आणि डॉ.बैसाणे अ. (२०११) शिवकाळ व पेशवाईतील दुष्काळाचा इतिहास. कंधारःपूनम प्रकाशन.
४८.डॉ.तावडे मो., सावंत सं आणि अमृते वि.ग. (१९९२). महाराष्ट्राचा भुगोल (इयत्ताचौथी). पुणे : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ.
४९.डॉ.तावडे मो., सावंत सं आणि अमृते वि.ग. (२००९) महाराष्ट्राचा भुगोल (इयत्ता चौथी). पुणे : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ
५०. गिरासे वि. (२०१६) : उपरोक्त : पान १२७

५१.महाराष्ट्राचा भुगोल, इयत्ता पाचवी (२००६). पुणे : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तकनिर्मिती अभ्यासक्रम संशोधन मंडळ.

५२.डॉ.जोग सु.रा. व इतर (२००८) भुगोल इयत्ता तिसरी, नाशिक जिल्हा. मुंबई :महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (२००८)

५३.जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६, जिल्हा अहमदनगर.

५४.डॉ.जोग सु.रा. व इतर (२००८) भुगोल इयत्ता तिसरी, नाशिक जिल्हा. मुंबई :महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,

५५.डॉ.तावडे मो., सावंत सं आणि अमृते वि.ग. (२००९) (नवीन) महाराष्ट्राचा भुगोल (इयत्ता चौथी). पुणे : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ.

५६.डॉ.शर्मा के.के. (२००५) संदर्भ महाराष्ट्र खंड –१, भोपाळ : इंटलेक्चुअल बुक ब्युरो

५७.डॉ.पवार सु. (१९८८) वृत्तपत्र व्यवसायाकडे वाटचाल, नाशिक : जयश्री प्रकाशन.

५८.दाते शं.ग.व इतर (१९६९) मराठी नियतकालिकांची सुचिव, मुंबई : मुंबई मराठी ग्रंथालय.

५९.डॉ.खैरनार दि. (२०११) प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी. पुणे : डायमंड पब्लीकेशन्स

६०.प्रा.घाटोळे रा.ना.(२००९) समशास्त्रीय संशाधेन तत्व पद्धती. नागपूर : श्री मंगेश प्रकाशन.

६१.डॉ.बोरुडे रा.र. (२००८) संशोधन पद्धतीशास्त्र. पुणे : पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन

६२.डॉ.धारुरकर वि.ल. (१९९९) माध्यम दृष्टीकोन. औरंगाबाद : चैतन्य प्रकाशन.

६३.डॉ.मायी सु. (२००८) , सामाजिक संशोधन पद्धती. पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.

६४.संपादक : इनामदार मनोहर (२०१८), प्रेरणादायी उपक्रमांची प्रयोगशाळा अहमदनगर : शब्दगंध प्रकाशन

६५.डॉ.जोशी सुनिता (१९९०), शिक्षण प्रवा, (लेख), पुणे : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे. (लेख)

६६.आंबेकर नी.श.(१९९०) शिक्षणप्रवाह (मूल्यांचे शिक्षण) (लेख)

६७.डॉ.ससाणे मनोहर (२०१४) मूल्यसंस्कार, पाचवड (ता.वाई): सानिया पब्लिकेशन,

६८www.kishor.ebhalbharti.in

६९ https://nashik.gov.in

७०. https://dhule.gov.in

७१. https://www.loksatta.comरविवार, दि.१४ जून २००९

७२. टिळक गिताली (२०१८). पीएचडी शोधप्रबंध, 'A study of content analysis of marathi chlidren periodicals for enhancing mulitiple skill among chlidren' टिळक विद्यापीठ पूणे.

७३.भटकर सु.भ. : खानदेशातील वृत्तपत्रांचा इतिहास. पीएचडी थीसिस : २००५ :

७४.पाटील ज.स. (२०११) पीएच.डी.प्रबंध : आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील वृत्तपत्रांवर झालेला परिणाम.

७५.सानप ना.प्र. पीएचडी शोध प्रबंध (२००२) : मराठवाड्यातील सहकारी साखरकारखान्याचा जनसंपर्क : बीड जिल्ह्यातील साखर कारखान्याचा विशेष अभ्यास डॉ.बा.आं.मराठवाडा विद्यापीठ.

७६.पुरंदरे ली.ना.: पीएचडी  शोध प्रबंध (१९८५) : मराठीतील मुलांची मासिके (संदर्भ आनंद) एक अभ्यास १८५५ ते १९८० :

७७.शिंदे सु.भा. : पीएचडी प्रबंध (१९९३)  : 'बालबोधमेवा' चे बाल साहित्यविषयक कार्य (इ.स.१८७३ ते १९९०),

७८. प्रा.टिळक वि. : पीएचडी प्रबंध (१९९५) : 'बालबोधमेवा' मासिकाचे वाङ्मयीन कार्य

७९. सौ.घोलप ल.रा. : पीएचडी प्रबंध (२००९) :  'किशोर' मासिकाचे वाङ्मयीन कार्य (प्रारंभ ते २०००)

**मासिक/साप्ताहिक सुची**

## मासिक किशोर :

प्रस्तुत संशोधनासाठी मासिक किशोर या मुद्रित प्रसारमाध्यमाचा अभ्यास करण्यात आला. जानेवारी २००८ ते डिसेंबर २०१८ अखेर प्रकाशित झालेल्या १२१ अंकांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. मासिक किशोरच्या अभ्यासिन कालावधीतील विविध साहित्याचा

## नाशिक विभाग संशोधन क्षेत्र नकाशा



## किशोर अंक मुखपृष्ठ



छावा अंक मुखपृष्ठ


केसरी
शनिवार दि. १ डिसेंबर २०१२
केसरी-मराठा संस्थेचे
मुलांसाठी मराठी मासिक
छावा
संपादक : डॉ. दीपक ज. टिळक
REDMI NOTE 5 PRO
MI DUAL CAMERA

# शिक्षकांसाठी प्रश्नावली

नाव ----------- ---

कार्यरत जिल्हा--------- तालुका--

१) आपण किशोर या मुद्रित प्रसारमाध्यमांनी प्रसिद्ध केलेले साहित्य वाचता का?

होय

नाही

कधीतरी

२)आपण छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी प्रसिद्ध केलेले साहित्य वाचता का?

होय

नाही

कधीतरी

३) किशोर या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य शैक्षणिक मूल्यांवर आधारित असते का?

होय

सांगता येत नाही

नाही

४) छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य शैक्षणिक मूल्यांवर आधारित असते का?

होय

सांगता येत नाही

नाही

५) अ) किशोर या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या साहित्यामुळे मुलांचा भाषिक क्षमता (श्रवण भाषण वाचन लेखन) विकसित होण्यास मदत होते का?

होय

नाही

सांगता येत नाही

ब)होय असल्यास ,कोणती क्षमता विकसित होण्यासाठी सर्वाधिक मदत होते?

श्रवण

भाषण

वाचन

लेखन

६) अ)छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या साहित्यामुळे मुलांचा भाषिक क्षमता (श्रवण भाषण वाचन लेखन) विकसित होण्यास मदत होते का?

होय

नाही

सांगता येत नाही

ब)होय असल्यास ,कोणती क्षमता विकसित होण्यासाठी सर्वाधिक मदत होते?

श्रवण

भाषण

वाचन

लेखन

७)किशोर या मुद्रित प्रसारमाध्यमांने मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य आकर्षक असते का?

होय

नाही

सांगता येत नाही

८)छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांने मुलांसाठी प्रसिद्ध केलेले साहित्य आकर्षक असते का?

होय

नाही

सांगता येत नाही

९)किशोर या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या साहित्यचा दर्जा कसा असतो?

सर्वोत्तम

चांगला

साधारण

असमाधानकारक

सांगता येत नाही

१०)छावा या मुद्रित प्रसारमाध्यमांनी मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या साहित्यचा दर्जा कसा असतो?

सर्वोत्तम

चांगला

साधारण

असमाधानकारक

सांगता येत नाही

११) मुद्रित प्रसारमाध्यमांनी (किशोर/छावा/इतर) मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या साहित्यामुळे मुलाना वाचनाची सवय लागते का?

होय

नाही

सांगता येत नाही

१२)मुद्रित प्रसारमाध्यमांनी (किशोर/छावा/इतर) मुलांसाठी प्रसिद्ध केलेल्या साहित्यचा अध्यापनात उपयोग करता का?

होय

नाही

कधीतरी

१३) तुम्ही मुलांच्या मुद्रित प्रसारमाध्यमाचे (किशोर/छावा/इतर) वर्गणीदार आहेत का?

होय, नाही, अनियमित

१४) तुम्ही मुलांसाठी मुद्रित प्रसारमाध्यमांमध्ये (किशोर/छावा/इतर) किती वेळा लिखाण केले आहे?

नाही

क ते तीन वेळा

चार ते सहा वेळा

सात ते नऊ वेळा

दहापेक्षा जास्त / नियमित

कधीतरी

## मुलांसाठी प्रश्नावली

नाव-----------------------इयत्ता--------------

जिल्हा ------------ तालुका-----------

१)आपण किशोर या मुद्रित प्रसारमाध्यमाचे वाचन करता का?

होय

नाही

कधीतरी

२)आपण छावा या मुद्रित प्रसारमाध्यमाचे वाचन करता का?

होय

नाही

कधीतरी

३)आपण किशोर हे मुद्रित प्रसारमाध्यम कोठे वाचता?

घर

शाळेत

मित्राकडे

वाचनालयात

घरी शाळेत मित्राकडे वाचनालयात

इतर ठिकाणी

४)आपण छावा हे मुद्रित प्रसारमाध्यम कोठे वाचता?

घर

शाळेत

मित्राकडे

वाचनालयात

घरी शाळेत मित्राकडे वाचनालयात

इतर ठिकाणी

५) आपण वाचत असलेल्या किशोर या मुद्रित प्रसारमाध्यमाची भाषा कशी आहे?

सोपी

अवघड

संमिश्र (काही सोपी काही अवघड)

सांगता येत नाही

६) आपण वाचत असलेल्या छावा या मुद्रित प्रसारमाध्यमाची भाषा कशी आहे?

सोपी

अवघड

संमिश्र (काही सोपी काही अवघड)

सांगता येत नाही

७)तुम्ही किशोर हे मुद्रित प्रसारमाध्यम का वाचता?

ज्ञान/माहिती मिळवण्यासाठी

मनोरंजन म्हणून

छंद म्हणून

रिकामा वेळ घालवण्यासाठी

इतर मित्र वाचतात म्हणून

सांगता येत नाही

८) तुम्ही छावा हे मुद्रित प्रसारमाध्यम का वाचता?

ज्ञान/माहिती मिळवण्यासाठी

मनोरंजन म्हणून

छंद म्हणून

रिकामा वेळ घालवण्यासाठी

इतर मित्र वाचतात म्हणून

सांगता येत नाही

९) तुम्हाला किशोर या मुद्रित प्रसारमाध्यमातील कोणते साहित्य सर्वाधिक आवडते?

कथा

कविता

विनोद

लेख

नाट्य

चित्र कथा

कोडे

कृतीयुक्त साहित्य/मजकूर

मुलांचे लिखाण

इतर

१०) तुम्हाला छावा या मुद्रित प्रसारमाध्यमातील कोणते साहित्य सर्वाधिक आवडते?

कथा

कविता

विनोद

लेख

नाट्य

चित्र कथा

कोडे

कृतीयुक्त साहित्य/मजकूर

मुलांचे लिखाण

इतर

११) तुम्हाला मुलांच्या मुद्रित प्रसारमाध्यमाच`(किशोर/छावा/इतर) वाचन करण्यासाठी कोण प्रेरित करते ?

शिक्षक

पालक

मित्र

स्वतः

इतर व्यक्ती

१२) आपण मुद्रीत प्रसारमाध्यमांचा (किशोर/छावा/इतर) किंवा त्यातील महत्वाच्या बाबीचा संग्रह करता का?

होय

नाही

कधीतरी

## संपादक मुलाखत

१. शिक्षण :

२. इतर क्षेत्रातील योगदान (लेखन,कला इ.) :

३. संपादक म्हणून कधीपासून कार्यरत आहातः

४. आजअखेर इतर मुद्रित प्रसार माध्यमाचे संपादक आहात का?असल्यास कोणत्या?

५. कोणते उद्दिष्टे डोळयासमोर ठेवूनमासिक सुरु करण्यात आले?

६. आज आपल्या मासिकाचे किती अंक (संख्या) प्रकाशित होतात?

७. एकूण प्रकाशित अंकापैकी किती अंक मोफत दिले जातात?

८. एकूण प्रकाशित अंकापैकी किती अंकांची विक्री होते?

९. आपल्या मासिकात कोण कोणत्या साहित्य प्रकारास अधिक प्राधान्य दिले जाते?

१०. आपल्या मासिकासाठी ठराविक लेखकांकडून साहित्य मागविले जाते की, कोणत्याही लेखकांनी पाठविलेल्या साहित्यामधून मासिकासाठी साठी साहित्य निवडले जाते? असे करण्यामागील कारण कोणते ?

११. मासिकासाठी साहित्य निवडतांना कोण कोणते निकष लावले जातात?

१२. मासिकाच्या प्रकाशन कालावधीमध्ये बदल करण्यामागचा हेतू कोणता होता? (छावा)

१३. मासिक इतर मुद्रित प्रसार माध्यम प्रसिध्द करते का? असल्यास कोणत्या नावाने?